# भारतातील प्राथमिक शिक्षण



ज. पां. नाईक

# भारतातील प्राथमिक शिक्षण



T15·2
NAI
13047

ज. पां. नाईक

# भारतातील प्राथमिक शिक्षण

# भारतातील प्राथमिक शिक्षण

ज. पां. नाईक

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन
(विद्याभारती)
१२८/२, कर्वे रस्ता, कोथरुड, पुणे ४११ ०२९.

भारतातील प्राथमिक शिक्षण

• • •

© इंडियन इन्स्टिटचूट ऑफ एज्युकेशन, पुणे

• • •

प्रथमावृत्ती : नोव्हेंबर १९८०

• • •

प्रकाशक
देवदत्त दाभोलकर
संचालक
इंडियन इन्स्टिटचूट ऑफ एज्युकेशन
१२८/२, कर्वे रस्ता, कोथरुड,
पुणे ४११ ०२९

• • •

मुद्रक
सर्जेराव घोरपडे
प्रिंटेक्स्ट,
४६१/१, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

• • •

मुखपृष्ठ
मधू पाटील

• • •

मूल्य १० रुपये

# भूमिका

प्रा. ज. पां. नाईक यांच्यासारख्या जागतिक कीर्तीच्या मौलिक शिक्षणतज्ज्ञाच्या विचारधनाचा मराठी वाचकांना परिचय व्हावा या दृष्टीने आमच्या संस्थेने यापूर्वी त्यांच्या Non-Formal Education : Some Perspectives या पुस्तकाचा अनुवाद 'अनौपचारिक शिक्षण : काही पैलू' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केला आहे. यानंतर 'जनतंत्र समाजा'च्या (सिटिझन्स फार डेमाक्रसी) वतीने Eduation for Our People या नावाने जी शिक्षण योजना तयार करण्यात आली तिचाही अनुवाद 'भारतीय जनतेचे शिक्षण' या शीर्षकाखाली आमच्या संस्थेने प्रसिद्ध केला. त्या योजनेतील विचारप्रणालीवर प्रा. नाईक यांचा प्रभावी ठसा उमटलेला आहे. प्राथमिक शिक्षण हा प्रा. नाईक यांच्या चिंतनाचा एक प्रमुख विषय. प्राथमिक शिक्षणाविषयीचे आपले मौलिक विचार प्रा. नाईक यांनी 'Elementary Education in India : A Promise to keep' या पुस्तकात ग्रथित केले आहेत. त्याचा 'भारतातील प्राथमिक शिक्षण' या नावाने प्रसिद्ध होत असलेला अनुवाद मराठी वाचकांना सादर करताना संस्थेला विशेष आनंद होत आहे. आमच्या संस्थेतील श्री. वि. स. वाळिंबे यांनी हा अनुवाद केला आहे.

सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि व्यतिप्रतिष्ठा या मूलतत्त्वांवर आधारलेले समाजपरिवर्तन घडवून आणायचे असेल तर समाजामध्ये शिक्षणाचा फार मोठ्या प्रमाणावर प्रसार होणे आवश्यक आहे. जागृत जनमत हा लोकशाहीचा खरा आधार असतो. लोकशिक्षणाचे एक महत्त्वाचे पहिले पाऊल म्हणून आपल्या राज्यघटनेने, दहा वर्षांमध्ये (१९६० पर्यंत) प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचा आदेश दिलेला होता. तो कालावधी संपल्याला आता वीस वर्षे होऊन गेलेली असली तरी अजूनही आपण त्या उद्दिष्टापर्यंत पोहोचू शकलेलो नाहीत. हे असे का घडले आणि शक्य तितक्या लवकर हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी काय केले पाहिजे यासंबंधी प्रा. नाईक यांनी या पुस्तकात व्यक्त केलेले विचार, प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासंबंधी आस्था बाळगणाऱ्यांना मार्गदर्शक ठरतील, असा विश्वास वाटतो.

**–देवदत्त दाभोलकर**

# पुरस्कार

श्री. ज. पां. नाईक यांचा शैक्षणिक नियोजनविषयक प्रश्नांसंबंधीचा अधिकार फार मोठा आहे. त्यामुळे या पुस्तकाच्या गुणवत्तेसंबंधी वा महत्त्वासंबंधी मी मतप्रदर्शन करणे धाष्टर्याचे ठरेल. जो कोणी हे पुस्तक वाचेल त्याला या पुस्तकाची गुणवत्ता नक्कीच कळून येईल. या पुस्तकाला व्यापक वाचकवर्ग लाभेल असा मला विश्वास आहे. कारण, यामध्ये प्राथमिक शिक्षणाशी संबंधित असलेल्या सर्व प्रश्नांचा ऐतिहासिक आढावा घेण्यात आलेला आहे आणि श्री. नाईक यांनी आपल्या अनेक वर्षांच्या चिंतनातून आणि प्रत्यक्ष सहभागातून कृति-कार्यक्रमही सुचविला आहे.

सामाजिक परिवर्तन घडवून आणायला आपला देश प्रतिज्ञाबद्ध असून, त्या दृष्टीने सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे, हे निर्विवाद. गेल्या काही वर्षांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा बराच प्रसार झालेला असला तरी या बाबतीत अजून बरेच कार्य करायचे राहिलेले आहे. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याच्या मूळच्या निर्धारित कालावधीपेक्षा आपण बरीच दिरंगाई करीत असल्यामुळे हा प्रश्न अधिकच अवघड होत चालला आहे.

पाचव्या पंचवार्षिक योजनेचा विचार करताना या प्रश्नाचे महत्त्व ध्यानात आणून देण्यात आल्यामुळे, पाचव्या योजनेचा मसुदा तयार करताना, येत्या दहा वर्षांमध्ये म्हणजे पाचव्या आणि सहाव्या योजनांच्या काळात प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचा कसोशीने प्रयत्न केला जाईल असे वाटत होते. परंतु पहिल्या वर्षातील अनुभव आशादायक नाही; दुसऱ्या वर्षातही फारसे काही घडेल असे वाटत नाही. देशातील आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अभूतपूर्व चलन-फुगवट्यामुळे पूर्वी ठरविला होता इतका पैसा शिक्षणावर खर्च करणे शक्य झालेले नाही. तसेच, प्राथमिक शिक्षण आणि त्यानंतरचे शिक्षण यांच्यातील असमतोल कायम राहिला आहे. सध्याची परिस्थिती कायम राहिली तर तो कमी होण्याऐवजी वाढत जाईल, अशी भीति वाटते. पाचव्या योजनेच्या उर्वरित काळामध्ये परिस्थिती कोणता आकार घेईल हे आज सांगणे अवघड असले तरी हा प्रश्न शक्य तितक्या लवकर सोडविला पाहिजे, हे मान्य करायलाच हवे.

प्राथमिक शिक्षणावरील खर्च आवश्यक त्या पातळीपर्यंत वाढविण्यात आला पाहिजे असे श्री. नाईक यांचे प्रतिपादन असून त्या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाचा पारंपरिक नमुना साहाय्यभूत होणार नाही, हा त्यांचा निष्कर्ष अतिशय महत्त्वाचा आहे. पारंपरिक नमुन्यामध्ये श्री. नाईक यांनी तिहेरी बदल सुचविला आहे : (१) केवळ पहिल्या इयत्तेत प्रवेश आणि वार्षिक बढती देणाऱ्या सध्याच्या साचेबंद पद्धतीऐवजी वेगवेगळ्या इयत्तांमध्ये प्रवेश देणारी पद्धत

अनुसरली पाहिजे; (२) अंशकालिक वर्ग सुरू करून आणि तत्संबंधित अन्य उपाय योजून विद्यार्थी–शिक्षक प्रमाण वाढविले पाहिजे; आणि ( ३ ) प्रौढशिक्षण सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा घटक बनले पाहिजे.

हे तीन उपाय योजण्यात न आल्यामुळेच, प्राथमिक शिक्षण निर्धारित कालावधीत सार्वत्रिक करण्याचा राज्यघटनेचा आदेश प्रत्यक्षात येऊ शकला नाही, यासंबंधी श्री. नाईक यांनी ऊहापोह केलेला आहे. श्री. नाईक शिक्षणक्षेत्रात दीर्घकाळ वावरलेले असल्यामुळे, त्यांची ही कारणमीमांसा सखोल अभ्यासावर आधारलेली आहे. त्यांनी केलेल्या निदानासंबंधी आणि सुचविलेल्या उपायांसंबंधी दुमत होण्याचा संभव नसला तरी हे उपाय प्रत्यक्षात कसे आणायचे हा माझ्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे.

प्राथमिक शिक्षणाचा पारंपरिक नमुना आपल्या सामाजिक संरचनेचा परिपाक आहे, हे श्री. नाईक यांचे म्हणणे खरेच आहे. त्या नमुन्याच्या जागी श्री. नाईक यांनी जो नमुना सुचविला आहे ते अंगिकारणे मुळीच सोपे जाणार नाही, हे प्रारंभीच लक्षात येते. पारंपरिक नमुन्यानुसार प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करायला प्रदीर्घ कालावधी लागेल आणि तेवढा आपल्यापाशी वेळ नाही, हे श्री. नाईक यांचे मत मला मान्य आहे. पण प्रश्न असा आहे की नव्या नमुन्याच्या अंमलबजावणीची साधने कोणती आणि ती निर्माण करण्यासाठी आपण अनुरूप संरचना कशी अस्तित्वात आणणार आहोत ? शिवाय, प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्यासाठी फार मोठे मानवी बळ लागणार असून तेवढे बळ पुरविणे प्रशासन–यंत्रणेच्या सर्वस्वी आवाक्याबाहेरचे आहे. एक इंग्लंडचा अपवाद वगळला तर इतर अनेक देशांत सामाजिक परिवर्तनाचा एक घटक म्हणून प्राथमिक शिक्षणाचा व्यापक प्रमाणावर प्रसार करण्यात आला, हे प्राथमिक शिक्षणाच्या इतिहासावर धावता दृष्टिक्षेप टाकला तरी कळून येते. याचा अर्थ असा की आपण प्राथमिक शिक्षणाकडे खर्चाची आणखी एक बाब म्हणून पाहून चालणार नाही; ते एक सामाजिक आव्हान मानले पाहिजे.

या प्रश्नासंबंधी प्रस्तुत पुस्तकात सविस्तर ऊहापोह करण्यात आलेला नसला तरी श्री. नाईक आणि इतर शिक्षणतज्ज्ञ त्याचा अधिक विचार करतील, अशी मला आशा आहे. कारण सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणासाठी पुरेशा पैशाची सोय करणे आवश्यक असले तरी शैक्षणिक विकासासाठी अर्थसाहाय्याचा बागुलबोवा उभा करण्याचे काहीच कारण नाही, असे मला वाटते.

सदस्य, नियोजन मंडळ<br>
नवी दिल्ली.<br>
१६ मार्च, १९७५

*–एस. चक्रवर्ती*

## लेखकाचे चार शब्द

इन्डियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च या संस्थेचे प्रवर्तित केलेल्या ‘ विकासाचे पर्याय ( शिक्षण ) ’ या कार्यक्रमासाठी मी हे पुस्तक लिहिले आहे. ही संधी दिल्याबद्दल मी कौन्सिलचा ऋणी आहे. मात्र, येथे व्यक्त केलेले विचार माझे असून कौन्सिलच्या मतांशी त्यांचा संबंध नाही.

या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची विनंती प्रा. एस. चक्रवर्ती यांनी मान्य केली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्यांच्या प्रस्तावनेमुळे पुस्तकाचे मोल आणि महत्त्व खूपच वाढले आहे.

प्राथमिक शिक्षणासंबंधीच्या कार्यगटाच्या अहवालासाठी मी तयार केलेल्या लेखाचा या पुस्तकात अंतर्भाव करायला परवानगी दिल्याबद्दल मी शिक्षणविषयक केंद्रीय सल्लागार मंडळाचा (नवी दिल्ली) आभारी आहे.

नवी दिल्ली<br>
मार्च, १९७५.

*–ज. पां. नाईक*

## अनुक्रम


शिक्षणविषयक सनद । १

१. भारतातील प्राथमिक शिक्षण :
अपुरे राहिलेले अभिवचन । ७

२. पारंपरिक नमुना आणि त्याचे पर्याय । १३

३. कृति–कार्यक्रम । ४७


## परिशिष्टे


१. कार्यानुभव । ८३

२. शैक्षणिक नियोजन आणि विकास
यांमधील शिक्षकांची भूमिका । ८८

३. शिफारशींचा सारांश । ९९

# शिक्षणविषयक सनद

शिक्षण सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन झाले पाहिजे. त्याचप्रमाणे शिक्षणाचा राष्ट्रीय विकासाशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करायला हवा. तसेच ते जनताभिमुखही व्हायला हवे. कारण अजूनही फार मोठा भारतीय समाज दारिद्र्य-रेषेखालील जीवन व्यतीत करीत आहे. त्यामुळे शिक्षणाने या लोकांमध्ये नवी आत्मजाणीव निर्माण केली पाहिजे. ही उद्दिष्टे साध्य होण्याकरिता, शैक्षणिक पुनर्घटनेचा खालील एकसंध कार्यक्रम तातडीने सुरू करून त्याची लगेच कार्यवाही व्हायला हवी :

( १ ) **सर्व पातळ्यांवरील सर्व शिक्षणसंस्थांच्या एकूण कार्यवेळापैकी एकतृतीयांश ते निम्मा वेळ समाजसेवेच्या आणि राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमांमध्ये प्रत्यक्ष सहभागी होण्यासाठी खर्च झाला पाहिजे.** शिक्षणसंस्थांमधील सर्व शिक्षकांनी, विद्यार्थ्यांनी आणि इतर कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमांत भाग घ्यायला हवा. या कार्यक्रमांमध्ये काही प्रमाणामध्ये शारीरिक श्रमाचे कामही राहील. या संदर्भामध्ये निरक्षरता-निर्मूलनासह प्रौढशिक्षण, शाळेत न जाणाऱ्या १५-२५ वयोगटातील युवकांचे अनौपचारिक शिक्षण आणि प्राथमिक किंवा शाळापूर्व शिक्षणाचा प्रसार यांच्यावर भर दिला पाहिजे. हुषार विद्यार्थ्यांनी कच्च्या किंवा नव्याने आलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत करायला हवी. विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय सेवेच्या कार्यामध्ये या कामाचा समावेश केला जावा.

( २ ) सध्या आपण जवळजवळ सर्वस्वी औपचारिक शिक्षणपद्धतीवरच अवलंबून आहोत. एका इयत्तेमध्ये प्रवेश, वार्षिक बढती, पूर्णवेळेचे अध्ययन आणि पूर्णवेळेचे व्यावसायिक शिक्षक ही या पद्धतीची वैशिष्ट्ये असल्यामुळे तिचा लाभ मुख्यतः सुखवस्तू वर्गांनाच होत असतो. गरीब वर्गातील मुले एक तर या शिक्षणपद्धतीत प्रविष्ट होऊ शकत नाहीत, आणि प्रविष्ट झाली तरी त्यांना लवकर बाहेर पडावे लागते. तसेच ही पद्धती अतिशय खर्चिक आणि अपव्यय करणारी आहे. **म्हणून, सध्याच्या शैक्षणिक संरचनेमध्ये फार मोठ्या प्रमाणावर**

**अनौपचारिक शिक्षण विकसित करणे ही सुधारणा अत्यंत तातडीने करायला हवी.** जी मुले अधिक वयाची झाल्यानंतर प्राथमिक शाळेमध्ये प्रविष्ट होतात, त्यांच्यासाठी वेगवेगळ्या इयत्तांमध्ये प्रवेश मिळविण्याची सोय असली पाहिजे. तसेच त्यांच्यासाठी खास वर्ग सुरू करायला हवेत. ज्या मुलांना आपल्या कुटुंबासाठी घरी वा बाहेर काम करावे लागते त्यांच्यासाठी अंशकालिक शिक्षणाचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. कामगारांची पुढचे शिक्षण घेण्याची गरज भागावी म्हणून माध्यमिक आणि विद्यापीठीय पातळीवर अंशकालिक शिक्षणाचे आणि पत्रद्वारे शिक्षणाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर विकसित करायला हवेत. त्याच-प्रमाणे शिक्षण मंडळांच्या आणि विद्यापीठांच्या सर्व परीक्षांना बसण्याची खाजगी विद्यार्थ्यांना मुभा देऊन स्वाध्यायालाही प्रोत्साहन दिले पाहिजे. केवळ पूर्ण वेळेच्या व्यावसायिक शिक्षकांनीच शिकविले पाहिजे ही कल्पना सोडून द्यायला हवी. अंशकालिक अध्यापनालाही उत्तेजन दिले पाहिजे आणि समाजातील सर्व अध्यापन-सामग्रीचा पुरेपुर उपयोग करून घेतला पाहिजे. आपल्या शिक्षणाचा एक अविभाज्य भाग म्हणून विद्यार्थ्यांना अध्ययन करायला प्रवृत्त करायला हवे आणि जेथे आवश्यक असेल तेथे अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या किंवा पूर्ण नादारी देण्याऐवजी निर्वाहवेतन दिले जावे.

(३) सध्या आपण शिक्षणावर दरवर्षी जवळजवळ १३५० कोटी रुपये खर्च करीत असतो, आणि तरीही या शिक्षणाचा फायदा मुख्यतः सुखवस्तू वर्गांनाच होत आहे. म्हणूनच अजूनही एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के लोक निरक्षर राहिलेले आहेत. ६-१४ वयोगटातील मुलांपैकी अवघी २५ टक्के मुलेच प्राथमिक शिक्षण पूर्ण करू शकतात, आणि १५-२५ वयोगटातील फक्त ७ टक्के युवकच माध्यमिक शाळांमध्ये किंवा महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेतात. **शैक्षणिक लाभांमध्ये ही जी घोर विषमता निर्माण झालेली आहे ती सामाजिक न्यायाच्या भूमिकेवरून ताबडतोब नाहीशी झालीच पाहिजे. गरीब वर्गांना शिक्षणाचा संपूर्ण लाभ मिळालाच पाहिजे.** म्हणून खालील तीन कार्यक्रमांना सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे :

(अ) लोकांमध्ये आत्मजागृती निर्माण करणारा प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम : त्यामध्ये नागरिकत्वाचे आणि कुटुंबनियोजनाचे शिक्षणही अंतर्भूत असावे. तसेच लोकांना आपली व्यावसायिक कौशल्ये वाढविता आली पाहिजेत. याचा अर्थ असा की विज्ञान आणि तंत्रशास्त्र यांचा संबंधित भाग या शिक्षणामध्ये अंतर्भूत केला जावा. निरक्षरतेचे दहा वर्षांत निर्मूलन करणे हे या कार्यक्रमाचे निश्चित उद्दिष्ट असले पाहिजे.

(ब) शाळेत न जाणाऱ्या, १५-२५ वयोगटातील युवकांसाठी अनौप-



चारिक शिक्षणाचा कार्यक्रम : हा कार्यक्रम आठवड्यातून किमान सहा तास तरी असावा. काही आवश्यक बदल वगळता या कार्यक्रमाची उद्दिष्टे प्रौढशिक्षण कार्यक्रमासारखीच राहतील. खेळ, क्रीडा, मनोरंजनाचे कार्यक्रम आणि युवकांचा राष्ट्रीय विकास-कार्यात सहभाग यांवर या कार्यक्रमात भर राहील.

(क) सर्व मुलामुलींसाठी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण: जेथे शक्य असेल तेथे हे शिक्षण पूर्णवेळेचे असावे; आवश्यकतेनुसार ते अंशकालिकही असावे. हे सार्वत्रिकीकरण दहा वर्षांत घडून यावे.

(४) चौदा वर्षे वयानंतरचे शिक्षण (माध्यमिक आणि उच्च) अधिकार म्हणून आपल्याला मिळालेच पाहिजे असा कोणालाही दावा करता येणार नाही. मात्र सध्या परिस्थिती अशी आहे की माध्यमिक आणि उच्च शिक्षणाची कोणतेही नियोजन न करता वाढ झालेली दिसते. या शिक्षणासाठी सार्वजनिक निधीतून बरेच अनुदान द्यावे लागते. या शिक्षणाचाही लाभ मुख्यतः सुखवस्तू वर्गांनाच होत आहे. वस्तुस्थिती अशी आहे की माध्यमिक आणि विद्यापीठीय पातळीवरील चांगल्या दर्जाच्या आणि प्रतिष्ठाप्रात संस्थांचा फायदा श्रीमंत वर्गच घेत आहेत. चांगले शिक्षण घेतलेले आपले अनेक इंजिनियर, डॉक्टर आणि शास्त्रज्ञ परदेशांमध्ये जाऊन येथे उच्चशिक्षितांची टंचाई निर्माण करतात. **ही अपप्रवृत्ती थांबविण्यासाठी माध्यमिक आणि विद्यापीठीय पातळीवरील शिक्षणाबाबत मूलगामी धोरण निश्चित केले पाहिजे.** यामध्ये, इतर अनेक गोष्टींबरोबर, खालील गोष्टींचा समावेश करायला हवा :

(अ) सामाजिक अभिसरणाला आणि राष्ट्रीय एकात्मतेला चालना मिळावी यासाठी शिक्षण आयोगाने सुचविलेल्या परिसर-शाळेची संकल्पना स्वीकारून ती कार्यवाहीत आणली पाहिजे.

(ब) नव्या माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे स्थापन करण्यावर कडक नियंत्रण घातले पाहिजे. मान्यता व संलग्नता देण्याबाबतच्या शर्ती निश्चित करून त्यांची कसोशीने अंमलबजावणी व्हावयास हवी. अर्धविकसित विभाग वगळता अन्यत्र कोठेही माध्यमिक आणि विद्यापीठीय पातळीवरील नवी शिक्षणसंस्था स्थापन करायला परवानगी देता कामा नये. माध्यमिक आणि उच्च शिक्षणावरील दिसून न येणारे अनुदान कमी करण्याकरिता वाजवी शुल्क आकारले पाहिजे. त्याचबरोबर, गरीब कुटुंबांतील किंवा ग्रामीण भागांतील बुद्धिमान मुलांना पूर्ण नादारी किंवा शिष्यवृत्त्या देण्याचे धोरण व्यापक केले पाहिजे. कमी उत्पन्नाच्या गटांतील आणि दुर्बल समाज घटकांमधील बुद्धिमान मुलांसाठी काही जागा राखून ठेवून चांगल्या दर्जाच्या आणि प्रतिष्ठाप्राप्त शिक्षणसंस्थांचे सध्याचे उच्चवर्गीय स्वरूप कमी करायला

हवे. एखाद्या व्यक्तीच्या शिक्षणावर खर्च करण्यात आलेली संपूर्ण रक्कम तिने परत केल्याशिवाय कोणत्याही शिक्षित व्यक्तीला कायमच्या नोकरीसाठी परदेशी जाण्याची परवानगी दिली जाता कामा नये.

(क) केवळ प्रसारावर भर न देता, गुणवत्तेच्या विकासावर सर्वाधिक भर द्यायला हवा.

(ड) विद्यापीठाची पदवी आणि नोकरी यांचा संबंध तोडून टाकला पाहिजे. केवळ विद्यापीठीय प्रवेशामधीलच नव्हे, तर औपचारिक शाळांमधील वाढती गर्दी कमी करण्याच्या दृष्टीने नोकऱ्या देण्याबाबतचे धोरण बदलले पाहिजे.

(ई) व्यावसायिकरणाला सर्वाधिक प्राधान्य देऊन विविध पातळ्यांवरील विद्यार्थी उद्योगव्यवसायाकडे वळतील असा प्रयत्न करायला हवा. सतत आणि दीर्घ काळ अध्ययन करीत राहण्याच्या प्रवृत्तीला प्रोत्साहन देता कामा नये. व्यावसायिक शिक्षणाला निम्न माध्यमिक पातळीवर प्रारंभ होणार असला तरी उच्च माध्यमिक पातळीवर त्याला विशेष स्थान मिळायला हवे. नोकऱ्यांच्या संख्येच्या प्रमाणामध्ये उच्च शिक्षणात रोजगाराभिमुख अभ्यासक्रम अंतर्भूत करण्यात यावेत. तरुणांनी व्यावसायिक शिक्षण घ्यायला प्रवृत्त व्हावे यासाठी वेतनविषयक धोरणात योग्य ते बदल केले पाहिजेत. स्वयंरोजगारांना जास्तीत जास्त उत्तेजन मिळावे या दृष्टीने अभ्यासक्रमांची रचना केली पाहिजे.

(५) या धर्तीची मूलगामी पुनर्रचना करताना केवळ जादा प्रचंड खर्च करून भागणार नाही; तर सध्या करीत असलेल्या खर्चाची बरीच फेर-आखणीही करावी लागेल. **मात्र येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की हे शैक्षणिक कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केवळ पैसा पुरेसा ठरणार नाही; सतत परिश्रम, सुयोग्य वातावरण आणि संपूर्ण शैक्षणिक जगतात उचित मूल्यांची जोपासना यांचीही तितकीच गरज आहे.** या बाबतीत शिक्षक, विद्यार्थी आणि शैक्षणिक प्रशासक यांना महत्त्वाची भूमिका पार पाडायची आहे.

(अ) शिक्षकांनी स्वतःसाठी आदर्श व्यावसायिक वर्तनाची संहिता तयार करून आपल्या व्यावसायिक संघटनांमार्फत ती निग्रहपूर्वक अमलात आणली पाहिजे. शिक्षणसंस्थांचा दर्जा सर्वोच्च राहील हे पाहण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या कल्याणाची सर्वतोपरी काळजी वाहिली पाहिजे. वर्षभर सतत परिश्रम करण्याचे वातावरण कायम ठेवणे हे त्यांचे काम आहे. परस्परसेवेच्या आणि सहकार्याच्या मार्गांनी शाळा समाजाशी निगडीत करण्याची जबाबदारीही त्यांनी पत्करली पाहिजे.



(ब) लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता ही मूलभूत मूल्ये आपल्यामध्ये बाणविण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न केला पाहिजे. त्यांनी सर्व प्रतिगामी आणि अंधश्रद्धावादी शक्तींशी मुकाबला करायला हवा. समता आणि न्याय प्रस्थापित होण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्नशील असले पाहिजे. गरीब लोकांच्या कष्टप्रद जीवनाबद्दल त्यांना प्रगाढ सहानुभूती वाटली पाहिजे. साध्या राहणीचा अवलंब करून इतरांच्या वेदनांमध्ये सहभागी व्हायला सदैव तत्पर असले पाहिजे. वशिलेबाजी आणि पक्षपात यांच्याविरुद्ध सतत उभे राहून प्रवेशाबाबत न्याय्य धोरण स्वीकारले जात आहे आणि परीक्षांमध्ये गैरप्रकार घडत नाहीत हे पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या संघटना स्थापन केल्या पाहिजेत. देशापुढील सर्व प्रमुख प्रश्नांची विद्यार्थ्यांनी माहिती करून घ्यायला हवी. त्याचप्रमाणे न्यायाच्या प्रस्थापनेसाठी आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रातील शोषण आणि दडपशाही यांच्याविरुद्ध झुंजण्यासाठी नेहमी सिद्ध असले पाहिजे. मात्र हे सर्व करताना त्यांनी कधीही हिंसेचा अवलंब करता कामा नये. कारण शैक्षणिक जगतात हिंसाचाराला मुळीच स्थान नसते.

(क) शैक्षणिक प्रशासन सध्या इतके कमालीचे दुबळे झालेले आहे की अकार्यक्षमता खपवून घेण्याची त्याला सवयच जडलेली आहे. दैनंदिन कामकाजातच त्याचा बराचसा वेळ जातो. कर्मचाऱ्यांच्या बदल्या आणि नेमणुका करण्यात आणि आयव्ययाचे तक्ते भरण्यात प्रशासनाला आपल्या कार्याची सार्थकता वाटायला लागली आहे. त्यामुळे हे प्रशासन फारसे शैक्षणिक नेतृत्व पुरवूच शकत नाही. तसेच ते द्रुतगतीने होत असलेल्या वाढीचे प्रश्न सोडवायलाही असमर्थ ठरले आहे. अशा परिस्थितीत गुणवत्तेच्या विकासाबाबत बोलायलाच नको. म्हणून, शैक्षणिक प्रशासनामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे आवश्यक झालेले आहे. विकासाभिमुख होणे, चांगल्या गुणवत्तेच्या व्यक्तींची भरती करणे, सेवांतर्गत प्रशिक्षणाचे व्यापक कार्यक्रम संघटित करणे, केंद्र, राज्य, जिल्हा आणि संस्था अशा चार पातळ्यांवर नियोजन करण्याची पद्धती स्वीकारणे, आणि शिक्षक नि विद्यार्थी यांचा संपूर्ण सहभाग संपादन करणे इत्यादी कार्यक्रम या परिवर्तनात अंतर्भूत आहेत.

शिक्षण जीवनाशी निगडीत असल्यामुळे, वर निर्देशित केलेला शैक्षणिक पुनर्रचनेचा मूलगामी आणि समताधिष्ठित कार्यक्रम यशस्वी रीतीने अमलात आणण्याकरिता इतर क्षेत्रांतही पूरक उपाय योजणे आवश्यक ठरते. सामाजिक आणि आर्थिक विषमतेवर निर्धारपूर्वक प्रहार करणे, हा यांपैकी एक अत्यंत महत्त्वाचा उपाय होय. वरच्या गटातील ३० टक्के लोकांच्या खर्चात

कपात करण्याबरोबरच दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या जनतेला आपल्या किमान गरजा भागविता येतील एवढे जीवनमान उपलब्ध करुन देणे, हे या कार्यक्रमामध्ये अभिप्रेत आहे. वेतन-उत्पन्न-किमती याबाबत राष्ट्रीय धोरण ठरविले पाहिजे. त्याचप्रमाणे शिक्षणासह सर्व क्षेत्रांतील सध्याच्या वेतनश्रेणीची अधिक समताधिष्ठित पायावर आमूलाग्र पुनर्रचना करायला हवी. हे असे केले तरच पैशाची तीव्र टंचाई जाणवत असतानाही, शिक्षणाचा प्रसार करणे आणि त्याची गुणवत्ता वाढविणे शक्य होणार आहे. सर्व शिक्षणसंस्थांमधील सर्व शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना साधा गणवेश घालणे सक्तीचे करायला हवे. त्यासाठी देशांतर्गत वापराकरिता निर्माण करण्यात येणारे कापड फक्त बाराच वेगवेगळ्या प्रतींचे असावे, आणि सर्व नागरिकांना साधे कपडे वापरणे भाग पाडावे. त्यात फार फरक नसावा. सर्व शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी समाजसेवेच्या आणि राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष सहभागी होण्याकरिता उचित वातावरण निर्माण होण्यासाठी सर्व सार्वजनिक कचेऱ्यांनी (आणि सार्वजनिक निधीच्या मदतीवर चालणाऱ्या कचेऱ्यांनी) आठवड्यातून पाच दिवस काम करावे. या कचेऱ्यातील सर्व कर्मचाऱ्यांनी (पंतप्रधानांपासून सर्वांत खालच्या चपराशापर्यंत) सहाव्या दिवशी आपापल्या विभागातील सामाजिक आणि राष्ट्रीय सेवेच्या कार्यक्रमामध्ये प्रत्यक्ष भाग घेतला पाहिजे. (या कार्यक्रमामध्ये शारीरिक श्रमांचाही समावेश असेल.) शैक्षणिक पुनर्बटनेची जबाबदारी अखेरीस केंद्र आणि राज्य शासनांनाच स्वीकरावी लागणार असल्यामुळे, त्यांना आवश्यक तो राजकीय निर्धार दाखवावा लागणार आहे. तसेच पुरेशी आर्थिक तरतूदही करावी लागेल. (येत्या दहा वर्षांमध्ये शिक्षणावरील खर्च दुपटीने वाढवावा लागेल.) त्याचप्रमाणे या कार्यक्रमाला लोकांचे संपूर्ण सहकार्य लाभले पाहिजे. या प्रचंड शैक्षणिक मोहिमेतून साध्य करायच्या राष्ट्रउभारणीला आपला हातभार लागावा म्हणून लोकांनी आपल्या इतर गरजांचा त्याग करायला सिद्ध असायला हवे.



प्रकरण पहिले

# भारतातील प्राथमिक शिक्षण : अपुरे राहिलेले अभिवचन

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद हा नेहमीच भारताच्या राष्ट्रीय शिक्षणपद्धतीमधील एक अविभाज्य घटक मानण्यात आलेला आहे. अगदी आरंभीच्या काळातही अनेक प्रमुख व्यक्तींच्या आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या लेखनात यासंबंधी तुरळक उल्लेख आढळतात. परंतु या बाबतचे पहिले जाहीर निवेदन भारताचे पितामह दादाभाई नौरोजी यांनी भारतीय शिक्षण आयोगापुढे (१८८२) साक्ष देताना केले. नंतर नामदार गोपाल कृष्ण गोखले यांनी या मागणीचा पुरस्कार केला. केंद्र सरकारने सर्व मुलांना चार वर्षांचे सार्वजनिक प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी पत्करली पाहिजे, असा त्यांनी केंद्रीय विधिमंडळात (१९१०-१२) जोरदार आग्रह धरला. पण त्यात त्यांना यश आले नाही. १९१९ च्या भारत सरकार कायद्यान्वये देशात प्रांतिक सरकारे स्थापन झाली. (त्यावेळी शिक्षण हा विषय भारतीय मंत्र्याकडे सोपविण्यात आला आणि हा मंत्री विधिमंडळाला जबाबदार राहील अशी तरतूद करण्यात आली.) या प्रांतिक सरकारांनी एक पाऊल पुढे टाकून सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला आणि प्राथमिक शिक्षणाच्या सोयींमध्ये बरीच वाढ केली. हे कार्य राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनीही उचलून धरले. त्यांनी मूलोद्योग शिक्षणासंबंधीची आपली योजना मांडली. हे मूलोद्योग शिक्षण प्रत्येक मुलाला मिळावे आणि त्याचा सात किंवा आठ वर्षांचा अभ्यासक्रम मॅट्रिकच्या बरोबरीचा असावा, अशी गांधीजींची कल्पना होती. त्या अभ्यासक्रमात इंग्रजी वगळण्यात आले होते आणि त्या जागी मूलोद्योगाचा समावेश करण्यात आलेला होता. हे असे अनेक प्रयत्न होत असतानाही प्राथमिक शिक्षणाची प्रत्यक्ष प्रगती अत्यंत मर्यादितच राहिली. १९४७ साली देखील साक्षरतेचे प्रमाण अवघे १४ टक्के होते; ६-११ वयोगटातील तीन मुलांपैकी एकच शाळेत दाखल झालेले होते; आणि ११-१४ वयोगटातील अकरा मुलांपैकी एकच शाळेत जात होते.

त्यामुळे साहजिकच, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळामध्ये,

आपल्या राष्ट्रीय नेतृत्वाचे सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद करण्यावर लक्ष केंद्रित झाले. ६-१४ वयोगटातील सर्व मुलांना सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याचा येत्या ४० वर्षांमध्ये (१९४४–८४) क्रमशः प्रयत्न झाला पाहिजे, असे शैक्षणिक विकासाच्या युद्धोत्तर योजनेमध्ये (१९४४) म्हटले होते.

या सूचनेचा अभ्यास करण्यासाठी, १९५० मध्ये मुंबईचे तेव्हाचे मुख्यमंत्री कै. श्री. बा. गं. खेर यांच्या अध्यक्षतेखाली एक खास समिती नेमण्यात आली होती. चाळीस वर्षांचा कालखंड बराच मोठा असल्यामुळे हे उद्दिष्ट १९६० पर्यंत साध्य करावे, असे मत या समितीने व्यक्त केले. ही सूचना स्वीकारली जाऊन राज्यघटनेच्या ४५ व्या कलमात ती अंतर्भूत करण्यात आली. सर्व मुलांना, ती चौदा वर्षांची होईतो, मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था सरकार, राज्यघटना अमलात आल्यापासून दहा वर्षांमध्ये करील, असे त्या कलमात म्हटले होते. तेव्हापासून, हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पंचवार्षिक योजनांमार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या दृष्टीने केलेली प्रत्यक्ष प्रगती तक्ता क्र. १ मध्ये दिली आहे. ही प्रगती मुळीच नगण्य नाही.

६-११ वयोगटातील एकूण मुलांपैकी किती मुलांनी शाळेत प्रत्यक्ष नावे नोंदविली होती हे प्रमाण तक्ता क्र. १ वरून कळू शकत नाही. कारण १ ते ५ इयत्तांमध्ये नावे नोंदविलेल्या मुलांचे ६-११ वयोगटातील एकूण मुलांशी किती प्रमाण होते एवढ्याचीच येथे तुलना करण्यात आलेली आहे. १ ते ५ इयत्तांमध्ये फक्त ६-११ वयोगटातीलच (आणि इतर कोणालाही नव्हे) मुलांना प्रवेश देण्यात येत असेल तर हे प्रमाण १०० टक्के असायला हवे होते. पण तसे कधीही घडत नाही. १ ते ५ इयत्तांमध्ये केवळ ६-११ वयोगटातील मुलांनाच दाखल करून घेण्यात येत नाही. ६ वर्षांखालची आणि ११ वर्षांवरची मुलेही या इयत्तांमध्ये दाखल करून घेतली जातात. १ ते ५ इयत्तांमध्ये दाखल झालेल्या ६-११ वयोगटाबाहेरील मुलांचे प्रमाण बरेच असते. शाळेत प्रविष्ट झालेल्या मुलांच्या एकूण संख्येशी हे प्रमाण ३० टक्के किंवा त्याहूनही अधिक असते. म्हणून, येथे स्वीकारलेल्या भूमिकेनुसार, ६-११ वयोगटातील प्रत्येक मूल शाळेत जात आहे अशी खात्री करून घ्यावयाची असेल तर ६-११ वयोगटातील एकूण मुलांपैकी १३० टक्के मुले १ ते ५ इयत्तांमध्ये प्रविष्ट झालेली असली पाहिजेत. पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर, १ ते ५ इयत्तांमधील नावनोंदणी जर ९७ टक्के होणार असेल, तर आपण आपल्या मूळ उद्दिष्टांपासून अजून किती दूर आहोत याची कल्पना येते. पाचव्या योजनेच्या अखेरीस जी मुले शाळेबाहेर राहणार आहेत ती मुख्यतः दुर्बळ समाजघटकांमधील असतील, हेही आपण ध्यानात घ्यायला हवे. त्यामुळे आपण जसजसे सार्वत्रिक नोंदणीच्या उद्दिष्टाकडे जायला लागू तसतसा या मुलांना शाळेत



**तक्ता क्र. १. प्राथमिक शिक्षणातील नावनोंदणी (१९५०–१९७४)**

| योजना आणि वर्ष | | १ ते ५ इयत्तांमधील नाव-नोंदणी (लाखात) | १ ते ५ इयत्तांमध्ये नाव नोंदविलेल्या मुलांचे ६–११ वयोगटातील एकूण लोकसंख्येशी प्रमाण | ६ ते ८ इयत्तांमधील नावनोंदणी | ६ ते ८ इयत्तांमध्ये नाव नोंदविलेल्या मुलांचे ११-१४ वयोगटातील एकूण लोकसंख्येशी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १९५०–५१ | मुले | १३८ | ६०.८ | २६ | २०.८ |
| पहिली योजना | मुली | ५४ | २४.९ | ०५ | ४.३ |
| | एकूण | १९२ | ४२.६ | ३१ | १२.९ |
| १९५५–५६ | मुले | १७५ | ७२.० | ३४ | २५.४ |
| दुसरी योजना | मुली | ७६ | ३२.८ | ०९ | ६.९ |
| | एकूण | २५१ | ५२.८ | ४३ | १६.५ |
| १९६०–६१ | मुले | २३६ | ८२.६ | ५१ | ३२.२ |
| तिसरी योजना | मुली | ११४ | ४१.४ | १६ | ११.३ |
| | एकूण | ३५० | ६२.४ | ६७ | २२.५ |
| १९६५–६६ | मुले | ३२२ | ९६.३ | ७७ | ४४.२ |
| | मुली | १८३ | ५६.५ | २८ | १७.० |
| | एकूण | ५०५ | ७६.७ | १०५ | ३०.९ |
| १९६८–६९ | मुले | ३४२ | ९५.६ | ९० | ४७.० |
| चौथी योजना | मुली | २०२ | ५९.६ | ३५ | १९.३ |
| | एकूण | ५४४ | ७८.१ | १२५ | ३३.५ |
| १९७३–७४ | मुले | ३९४ | १००.०० | १०५ | ४८.० |
| | मुली | २४४ | ६६.०० | ४५ | २२.० |
| | एकूण | ६३८ | ८४.०० | १५० | ३६.० |

आधार : १) शिक्षण आणि समाजकल्याण मंत्रालय, पाचव्या पंचवार्षिक योजनेतील शिक्षण (१९७४-७९), १९७२ (१९५०-५१, १९५५-५६, १९६०-६१, १९६५-६६ आणि १९६८-६९ साठी)

२) नियोजन मंडळ, पाचव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा (१९७४-७९), प्रकरण तिसरे, १९७३-७४ साठी.

प्रविष्ट करण्यासाठी करावा लागणारा खर्च आणि परिश्रम भूमितिश्रेणीने ( किंवा त्याहूनही अधिक ) वाढत जाणार आहेत.

६ ते ८ वी या इयत्तांबद्दल किंवा ११-१४ वयोगटाबद्दल बोलायचे तर सार्वत्रिक नोंदणीच्या उद्दिष्टापासून आपण आणखीच दूर आहोत. कारण पाचव्या योजनेच्या अखेरीस देखील, ११-१४ वयोगटातील मुलांची या इयत्तांमधील नावनोंदणी अवघी ४७ टक्केच राहणार आहे.

या संदर्भामध्ये आणखी एक मुद्दा विचारात घ्यायला हवा. तक्ता क्र. १ मधील आकडेवारी ही संपूर्ण देशामधील आहे आणि त्यामुळे या शैक्षणिक प्रगतीबाबत राज्याराज्यांमध्ये जी तफावत आहे ती झाकली गेलेली आहे. पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत, ६-११ वयोगटातील मुलांची शाळेतील नावनोंदणी हरियानामध्ये अवघी ७८ टक्के होणार आहे, तर बिहारमध्ये ८१ टक्के, मध्यप्रदेशात ८५ टक्के आणि राजस्थानात ८६ टक्के असे प्रमाण राहणार आहे. तसेच पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ११-१४ वयोगटातील मुलांची शाळेमधील नावनोंदणी मध्यप्रदेशात ३२ टक्के, ओरिसामध्ये ३३ टक्के, पश्चिम बंगालमध्ये ४२ टक्के आणि बिहार व उत्तरप्रदेश येथे ४३ टक्के होणार आहे. देशाची सरासरी आकडेवारी पाहता, या राज्यांना इतर राज्यांपेक्षा अधिक अवघड कार्य हाती घ्यावे लागणार आहे, हे यावरून स्पष्ट होते.

इयत्ता १ ते ८ मधील एकूण नावनोंदणी हा या प्रश्नाचा अवघा एक भाग आहे. या प्रश्नाच्या इतर बाजूही तितक्याच महत्त्वाच्या असून, त्यांच्याकडेही पुरेसे लक्ष दिले पाहिजे. उदाहरणार्थ, प्रत्येक मुलाला आपल्या घरापासून सहज चालत जाता येईल इतक्या अंतरावर १ ते ८ इयत्ता असलेल्या प्राथमिक शाळा सर्वत्र स्थापन करणे हा या कार्यक्रमाचा पहिला भाग आहे. १ ते ५ इयत्तांपर्यंतच्या शाळांबाबत हे उद्दिष्ट आपण बऱ्याच प्रमाणात साध्य केलेले असले तरी प्रत्येक मुलाला आपल्या घरापासून सहज चालता येईल इतक्या अंतरावर असलेल्या ६ वी ते ८ वी इयत्तांपर्यंतच्या शाळा स्थापन करण्याबाबत आपल्याला अजून बराच पल्ला गाठायचा आहे. राजस्थान आणि आंध्रप्रदेश यांना तर याबाबतीत खूपच कार्य करावे लागणार आहे. सार्वत्रिक नावनोंदणी हा या कार्यक्रमाचा दुसरा भाग आहे. मुलींना आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भूमिहीन शेतमजूर आणि समाजातील इतर दुर्बळ घटक यांच्या मुलांना शाळेत दाखल करून घ्यायचे कार्य अधिकच बिकट ठरणार आहे. तिसरा प्रश्न हजेरी टिकवून धरण्याचा आहे. याचा अर्थ असा की वयाच्या सहाव्या वर्षी पहिलीमध्ये दाखल झालेले मूल दरवर्षी वरच्या इयत्तेमध्ये गेले पाहिजे आणि चौदाव्या वर्षापर्यंत ते शाळेत राहिले पाहिजे. या बाबतीत सध्याची परिस्थिती अतिशय निराशाजनक



आहे. पहिलीमध्ये दाखल झालेल्या प्रत्येक शंभर मुलांपैकी अवघी ४० टक्के मुलेच पाचवीपर्यंत आणि २५ टक्के मुले आठवीपर्यंत पोहोचतात. शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, स्थानिक परिस्थितीशी शिक्षण निगडीत करणे आणि शिक्षणात कार्यानुभवाचा अंतर्भाव करणे, हा या कार्यक्रमाचा शेवटचा आणि सर्वात महत्त्वाचा घटक आहे. हा घटक आतापर्यंत सर्वस्वी अलक्षित राहिला असून या क्षेत्रामध्ये आवश्यक ती सुधारणा घडवून आणण्यासाठी मानवी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे. तसेच, बराच पैसा खर्च करावा लागेल. या सगळ्याचा अर्थ हा आहे की आतापर्यंत बरेच कार्य झालेले असले तरी अपुरे राहिलेले कार्य खूपच आहे. ते जसे संख्यात्मक आहे तसेच गुणात्मकही आहे. त्यामुळे ते अतिशय व्यापक, अतिशय जटिल आणि अतिशय खर्चिक होणार आहे.

राज्यघटनेमधील ४५ व्या कलमाचा आदेश अमलात आणण्यामध्ये आतापर्यंत आपल्याला अपशय आले यापेक्षाही यासंबंधी भविष्यकालीन धोरणही अनिश्चित आहे ही लोक आणि शिक्षणतज्ज्ञ यांच्या दृष्टीने अधिक काळजीची बाब आहे. उदाहरणार्थ, ६-१४ वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देता येणे केव्हा प्रत्यक्षात येईल, या संबंधी निश्चित कालावधी सांगणे अजूनही शक्य झालेले नाही. हे उद्दिष्ट आपण १९६५–६६ पर्यंत साध्य करू शकू असे एकदा सांगण्यात आले होते. हे जेव्हा शक्य झाले नाही तेव्हा हा कालावधी १९७५–७६ पर्यंत वाढविण्यात आला. १९७५–७६ पर्यंत हे उद्दिष्ट साध्य होणार नाही, असे आता दिसू लागल्यामुळे सहाव्या योजना काळात केव्हा तरी ते गाठले जाईल असे आपण म्हणू लागलो आहोत. परंतु तोपर्यंतदेखील हे घडून येण्याची शक्यता वाटत नाही. म्हणून, ६–१४ वयोगटातील मुलांना सार्वत्रिक शिक्षण देता यावे याकरिता नवा व्यवहार्य कार्यक्रम आखावा आणि तो सातत्याने आणि निर्धारपूर्वक कार्यवाहीत आणावा, अशी लोक मागणी करीत आहेत. ही मागणी वाजवी आणि न्याय्य असून ती लवकर आणि पूर्णपणे अमलात आणण्याकरिता उपाय योजिले पाहिजेत.

म्हणून, या समस्येचा गंभीर विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. आतापर्यंत आपल्याला अपयश का आले यामागच्या कारणांचे विश्लेषण करून, गेली शंभर वर्षे आपण ठरविलेले राष्ट्रीय उद्दिष्ट प्रत्यक्षात येईल आणि लोकांना दिलेल्या अभिवचनाची पूर्तता होईल यासाठी काय केले पाहिजे हे ठरवायला हवे. त्यासाठी कठोर परीक्षणाची आणि प्रत्येक गृहित कृत्य तपासून पाहण्याची गरज आहे; मग ती गृहित कृत्ये कितीही जुनी असोत वा सकृत्दर्शनी आकर्षक वाटोत. हे परीक्षण करताना सर्व उपलब्ध पर्यायी कार्यपद्धती विचारात घेऊन प्रत्येक कार्यपद्धतीच्या सामर्थ्याचे आणि उणिवांचे मूल्यमापन केले पाहिजे. या

अशा गंभीर अभ्यासातूनच आपल्याला माफक कालावधीत आणि देशाला परवडू शकणाऱ्या खर्चामध्ये यशस्वी रीतीने उद्दिष्टाप्रत नेऊ शकणारी कार्यपद्धती गवसेल. या पुस्तकात हाच महत्त्वाचा अभ्यास हाती घेण्यात आलेला आहे.





# पारंपरिक नमुना आणि त्याचे पर्याय

आपल्या सर्व बालकांना काही किमान सर्वसाधारण शिक्षण सक्तीच्या पायावर देणाऱ्या (आणि या सक्तीच्या शिक्षणाचा कालावधी वेळोवेळी वाढवित जाणाऱ्या) उद्योगप्रधान देशांतील प्राथमिक शिक्षणाच्या इतिहासाने एक सर्वपरिचित क्रम स्वीकारलेला आहे. सार्वजनिक शिक्षणपद्धतीच्या परंपरागत नमुन्यापासून हा क्रम सुरू होतो : एकाच इयत्तेमध्ये प्रवेश आणि पूर्णवेळेच्या व्यावसायिक शिक्षकां-मार्फत पूर्णवेळेचे संस्थात्मक शिक्षण ही शिक्षणपद्धती खरे म्हणजे समाजातील सुखवस्तू वर्गासाठीच विकसित करण्यात आलेली होती. हळुहळू या पारंपरिक पद्धतीमध्ये, कोणताही बदल न करता, जनतेचाही समावेश करण्यात आला. हे असे करणे त्या देशांना तीन अनुकूल घटकांमुळे शक्य झाले : ( १ ) उद्योगी-करणाच्या जलद प्रगतीमुळे हे देश इतके श्रीमंत झाले की या प्रकारच्या शिक्षणासाठी होणारा अवाढव्य खर्च करण्याची त्यांच्यापाशी क्षमता आली; ( २ ) उद्योगीकरणामुळे लोकांचीही आर्थिक परिस्थिती सुधारली. त्यामुळे आपल्या मुलांना खाऊपिऊ घालून पूर्णवेळेच्या शाळांमध्ये घालणे लोकांना शक्य झाले. जी थोडी गरीब कुटुंबे उरली त्यांच्या मर्यादित गरजांसाठी कल्याण-सेवा सुरू करण्यात आल्या; आणि ( ३ ) या शैक्षणिक कार्यक्रमाची कार्यवाही करायला या देशांना भरपूर अवधी मिळाला. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर या देशांमध्ये प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक होण्यापूर्वीच, तेथील समाजाचा सर्वसाधारण आर्थिक विकास घडून आला होता आणि बहुतेक लोकांची आर्थिक परिस्थितीही सुधारली होती. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याच्या कार्याला यश लाभल्यामुळे त्या देशांची आर्थिक परिस्थिती अधिकच सुधारली आणि लोकांचे जीवनमानही सुधारत गेले. त्याचा परिणाम प्राथमिक शिक्षणाचा दर्जा आणखी सुधारण्यात आणि सक्तीच्या शिक्षणाचा कालावधी वाढण्यात आपोआपच झाला. हे असे सतत घडत गेले. त्यामुळे यशसिद्धीचा हाच एक मार्ग आहे आणि आपल्या बालकांना सार्वत्रिक शिक्षण देण्यासाठी विकसनशील देशांनी हाच मार्ग स्वीकारला

पाहिजे, अशी या देशांची समजूत होणे स्वाभाविक होते.

परंतु विकसनशील देशांच्या गरजा आणि आकांक्षा अगदी वेगळ्या होत्या. पहिली गोष्ट अशी की विकसनशील देशांपाशी एवढा वेळ नव्हता. आपल्या मुलांना सार्वत्रिक शिक्षण देण्याची तरतूद त्यांना १०–२० वर्षांच्या अल्प कालावधीत करणे आवश्यक होते. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पिढ्यान् पिढ्या वाट पहाणे त्यांना शक्य नव्हते. तसेच त्यांना आर्थिक विकास आणि सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार या प्रक्रियांचा क्रम बदलायचा होता. या देशांना शिक्षणप्रसार करून आपला आर्थिक विकास घडवून आणायचा होता. याचाच अर्थ असा की आर्थिक विकासाच्या तुलनेने खालच्या पातळीवर असताना आणि बहुसंख्य लोक अजूनही गरीब असतानाच त्यांना सार्वत्रिक शिक्षणाची तरतूद करायची आहे. अल्पावधीत हे उद्दिष्ट साध्य करण्यामागे त्यांची हीच इच्छा आहे. ते साध्य करण्यासाठी सार्वत्रिक शिक्षणाचा पारंपरिक नमुना वापरता येण्यासारखा नव्हता. कारण, एक तर तो अतिशय खर्चिक आहे, शिवाय त्याचा मोहरा उच्च वर्गांच्या दिशेने वळलेला आहे. त्यामुळे, आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी विकसनशील देशांना पर्यायी नमुना शोधणे किंवा तयार करणे आवश्यक ठरले. आपल्या गरजा आणि आकांक्षा यांच्याशी सुसंगत ठरेल असा नवा नमुना शोधून काढणे किंवा तयार करणे त्यांना जेथे शक्य झाले तेथे ते यशस्वी झाले. जेथे असे घडले नाही आणि पारंपरिक नमुनाच स्वीकारण्यात आला तेथे हे देश अपयशी ठरले. आमचे म्हणणे असे आहे की भारतात अयोग्य परंपरागत नमुना स्वीकारण्यात आल्यामुळेच येथील सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा विकास खंडित झालेला आहे. आपल्या अपयशाचे हेच एक प्रमुख कारण आहे. याचाच आपण या प्रकरणात, काहीशा तपशीलाने ऊहापोह करणार आहोत.

## भारतातील पारंपरिक नमुना आणि त्याचे विरोधक

भारतामध्ये एकोणिसाव्या शतकात आधुनिक शिक्षणपद्धती निर्माण करण्यात आली तेव्हा वरिष्ठ वर्गाला शिक्षित करायचे हे ब्रिटिश राज्यकर्त्यांचे एकमेव उद्दिष्ट होते. शिक्षण आणि संस्कृती यांचा प्रवाह वरिष्ठ वर्गाकडून जनतेकडे झिरपत जात असतो, अशी त्यांची धारणा असल्यामुळे ते असे मानत होते की येथील शिक्षित वर्ग पुढे केव्हा तरी जनतेलाही शिक्षित करील. म्हणून त्यांनी सार्वजनिक शिक्षणपद्धतीचा पारंपरिक नमुनाच स्वीकारला. साधारणतः वयाच्या सहाव्या वर्षी मुलाने पहिल्या इयत्तेत प्रवेश करावा, दरवर्षी वरच्या वर्गात प्रविष्ट व्हावे, व्यावसायिक शिक्षकांनी पूर्णवेळच्या शिक्षणसंस्थांमध्ये अध्यापन करावे आणि प्राथमिक, माध्यमिक आणि विद्यापीठीय अशा शिक्षणाच्या तीन पातळ्या



असाव्यात असे या नमुन्याचे स्वरूप होते. विद्यार्थ्याला पुढच्या पातळीवरील शिक्षण घेण्यास पात्र करणे हाच प्रत्येक पातळीवरील शिक्षणाचा उद्देश असे. साहजिकच या पद्धतीचा लाभ केवळ वरिष्ठ वर्गीयच घेऊ शकत होते. तसेच ही पद्धती इतकी खर्चिक होती की तिचा विस्तार होण्यासारखा नव्हता. या शिक्षणाचा आशय जीवनाभिमुख नव्हता; तो पुस्तकांभोवतीच गुंफण्यात आलेला होता. त्याचप्रमाणे या शिक्षणाने शारीरिक श्रमांची प्रतिष्ठा निर्माण करण्याऐवजी कारकुनी वृत्तीच जोपासली. त्यामुळे मूलगामी संरचनात्मक बदल केल्याशिवाय ही शिक्षणपद्धती जनसामान्यांपर्यंत पोहोचूच शकत नव्हती. परंतु ब्रिटिश सरकारने या प्रश्नाची दखल घेतली नाही. उच्च वर्गीयांना शिक्षित करणे एवढे त्यांना पुरेसे वाटले. त्यामुळे शिक्षणाचा हा पारंपरिक नमुना एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत देशाच्या सर्व भागांमध्ये दृढमूल झाला. या नमुन्याला भारतातील वरिष्ठ आणि मध्यमवर्गीयांचा पाठिंबा मिळाला. कारण त्यात त्यांचे हितसंबंध गुंतलेले होते.

त्यामुळे, या शतकाच्या प्रारंभी आपल्या राष्ट्रीय नेत्यांनी सार्वत्रिक शिक्षणाच्या तरतुदीसंबंधी आंदोलन सुरू केले तेव्हा या पारंपरिक नमुन्यामध्ये बदल करायचा की पर्यायी नमुना निर्माण करायचा हा प्रश्न पुढे आला. पारंपरिक नमुन्यामध्ये बदल करायला ब्रिटिश राज्यकर्ते तयार झाले नाहीत. त्यासाठी त्यांनी प्रशासकीय आणि आर्थिक कारणे पुढे करून सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद करण्याची सूचना फेटाळून लावली. या उलट, भारतीय नेत्यांचा आग्रह असा होता की (अपुऱ्या आर्थिक विकासामुळे) आपल्यापाशी मर्यादित आर्थिक बळ असले आणि लोक गरीब असले तरी देखील सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी पारंपरिक नमुन्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. ही मागणी करणाऱ्यांमध्ये गोखले, परुळेकर, महात्मा गांधी, आचार्य विनोबा, सी. राजगोपालाचारी प्रभृती नेते आघाडीवर होते. ६–१४ वयोगटातील सर्व मुलांना येत्या दहा वर्षांमध्ये सार्वत्रिक शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी आपल्याला जो नवा नमुना तयार करायचा आहे तो उत्क्रांत करण्यामध्ये ज्यांनी प्रमुख भर घातली त्यांचा आपण येथे थोडक्यात ऐतिहासिक आढावा घेणार आहोत.

## गोखले–परुळेकर नमुना

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर प्रथम उपस्थित केला तो गोपाल कृष्ण गोखले यांनी. सर्व मुलांना चार वर्षे सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे, अशा आशयाचे विधेयक त्यांनी १९१०–१२ मध्ये मध्यवर्ती विधिमंडळात मांडले. आपल्याला दोन प्रमुख प्रश्नांना उत्तर द्यावे लागणार आहे हे त्यांना माहीत होते :

(१) उच्चवर्गीयांना शिक्षण दिले की ते हळुहळू जनसामान्यांपर्यंत झिरपत जाईल या सिद्धांताच्या पुढे जाऊन प्रत्यक्ष जनतेलाच शिक्षण देण्याचा कार्यक्रम हाती घ्यायची खरोखरच काही गरज आहे काय? आणि (२) सक्तीच्या शिक्षणासाठी करावा लागणारा खर्च सहन करणे सरकारला शक्य आहे काय? गोखले यांना आपले सारे लक्ष पहिल्या प्रश्नावर केंद्रित करावे लागले. कारण परंपरावादी मताच्या लोकांचा हाच मुख्य आक्षेप होता. त्यामुळे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीने पुढची पावले टाकण्यापूर्वी हा युक्तिवाद निरर्थक ठरविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी दुसऱ्या प्रश्नासंबंधीही काही उपयुक्त सूचना केल्या.

साधे उद्दिष्ट (सार्वत्रिक साक्षरता) हा गोखले यांनी सुचविलेल्या प्राथमिक शिक्षणपद्धतीचा एक गमतीदार विशेष होता. आर्थिक सबबींचा विचार करून गोखले यांनी आपल्या विधेयकाचे उद्दिष्ट मुद्दामच साधे ठेवले होते. आपण जर प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे आणखी वर नेली तर त्याचा कालावधी वाढवावा लागेल आणि साहजिकच प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरवर्षी कराव्या लागणाऱ्या खर्चातही वाढ होईल, हे त्यांना माहीत होते. भारतात जीवनाच्या इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे, 'अधिक चांगले' हे 'चांगल्या'चे शत्रू होईल, याची त्यांना जाणीव होती. म्हणून मुद्दामच त्यांनी आपले उद्दिष्ट मर्यादित ठेवले. चार वर्षात मुलाला साक्षर केले पाहिजे एवढेच त्यांनी म्हटले. (६–१० वयोगटावर या बाबतीत सक्ती केली पाहिजे, असेही त्यांचे सांगणे होते.) त्यामुळे हा चार वर्षांचा अभ्यासक्रम सोपा राहील आणि मुलाला लिहिणे, वाचणे आणि अंकज्ञान एवढ्यापुरताच मुख्यतः तो मर्यादित असेल, असे गोखले यांचे प्रतिपादन होते. आपल्या मागणीच्या पुष्ट्यर्थ गोखले यांनी तीन प्रमुख कारणे दिली :

(१) आपल्या जनतेची निरक्षरता नाहीशी झाली तर ती देखील मोठी कामगिरी ठरेल, असे राष्ट्रीय उद्दिष्टाच्या संदर्भात गोखले यांचे म्हणणे होते. ते म्हणाले, 'प्राथमिक शिक्षणामुळे केवळ लिहायला आणि वाचायलाच येणार असले तरी साक्षरतेचा सार्वत्रिक प्रसार होणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे. कारण निरक्षरतेपेक्षा साक्षरता केव्हाही निस्संशय चांगलीच असते. म्हणून सर्व लोकांची निरक्षरता नाहीशी करणे हे फलित सामान्य म्हणता येणार नाही'[१]

(२) जे दर्जावर भर देत होते आणि 'अधिक चांगले' चांगल्याचा शत्रू ठरवू पहात होते त्यांना गोखले यांनी उत्तर दिले, 'आपल्या देशातून निरक्षरतेचे

१. कर्वे आणि आंबेकर, **गोपाल कृष्ण गोखले यांची भाषणे आणि लेख** (इंग्रजी), आशिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, खंड ३, पृष्ठ ९२.



निर्मूलन करणे हा जनशिक्षणाचा मूलभूत हेतू आहे. शिक्षणाची गुणवत्ता हा प्रश्न निश्चितच महत्त्वाचा आहे; पण तो निरक्षरता नाहीशी झाल्यानंतरचा आहे.'[२]

(३) केवळ लोकांची निरक्षरता नाहीशी करून फारसे काही साध्य होणार नाही, हे गोखले यांनाही मान्य होते. पण त्यांचे म्हणणे असे होते की निरक्षरता नाहीशी झाल्याशिवाय राष्ट्रीय विकासाची कोणतीही योजना यशस्वी होणार नाही. ते म्हणाले :

'सार्वत्रिक शिक्षण द्यायला सुरुवात झाली की आपले सर्व प्रश्न सुटून पृथ्वीवर स्वर्ग निर्माण होईल, असे मानण्याइतका कोणीच भाबडा नाही. शिक्षणप्रसाराबरोबर अन्याय आणि अडचणी, स्वार्थ आणि संघर्ष नाहीसे होणार नाहीत. त्यासाठी स्त्री-पुरुषांना आपल्या सर्व शक्तिनिशी लढावे लागणारच आहे. निरक्षरता नाहीशी होताच गरिबीही दूर होईल असे कोणीच मानत नाही. त्यासाठी सामाजिक वा सार्वजनिक कार्य करावेच लागेल. परंतु सार्वत्रिक शिक्षणाचा लाभ झाल्यामुळे आपल्या देशबांधवांना जीवनाविषयी चांगली समज येईल. सार्वत्रिक शिक्षणामुळे लोकांची आर्थिक प्रगती, नैतिक विकास आणि आर्थिक सुधारणा करण्याचे सरकारी वा बिनसरकारी प्रयत्न यशस्वी होण्याची अधिक शक्यता आहे. लोक साक्षर झाले की पिळवणूक करणारे सावकार आणि छळणूक करणारे छोटे अधिकारी यांच्यापासून स्वतःचे संरक्षण करण्याची लोकांमध्ये क्षमता येईल.'[३]

आपण लोकांच्या निरक्षरता-निर्मूलनाचे कार्य हाती घेऊन लवकर पुरे केले तर आपली द्रुतगतीने शिक्षणातील अंतिम प्रगती आणि जीवनमानात सुधारणा होईल, यावर श्री. गोखले यांनी भर दिला. ते म्हणाले :

'या देशातील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याइतके दुसरे कोणतेही मोठे राष्ट्रीय कार्य नाही. या कार्यात सरकार आणि लोक यांनी परस्परांशी सहकार्य केले तर ते दोघांनाही उपकारक ठरेल. शिक्षणप्रसाराने आपण लोकांच्या जीवनात प्रकाशाचा एखादा किरण निर्माण करू शकू, त्यांच्या जीवनाला सुसंस्कृततेचा एखादा स्पर्श लाभेल, त्यांच्या जीवनात आशेची एखादी झळाळी चमकून जाईल. या सर्व गोष्टींची लोकांना अत्यंत आवश्यकता आहे. हे कार्य संथ गतीने होईल, याची मला कल्पना आहे. आणि म्हणूनच ते ताबडतोब हाती घेण्याची गरज आहे. आपण जर या कार्याला लगेच प्रारंभ केला, लोक आणि सरकार यांनी त्याचा पाठपुरावा केला तर आपली जागा घ्यायला पुढची पिढी यायच्या आत आपण ही समस्या सोडवू शकू. हे असे घडले तर पुढची पिढी तिच्यावरील खास जबाब-

२. तत्रैव, पृष्ठ १२५.
३. तत्रैव, पृष्ठ १३०-१

दारी अधिक सामर्थ्याने पेलू शकेल आणि हे सामर्थ्य तिच्या यशाची ग्वाही देऊ शकेल!''[४]

गोखले यांनी सुचविलेल्या कार्यपद्धतीचे महत्त्व अजूनही ध्यानात घेतले गेलेले नाही, ही खरोखरच दुर्दैवाची गोष्ट आहे. आपण त्या कार्यपद्धतीचा आजही पाठपुरावा करण्याची गरज आहे. आपल्या कार्यक्रमातील केवळ पहिला भाग म्हणून आपण, लोकांच्या निरक्षरतेचे निर्मूलन करण्याची आणि चार ते पाच वर्षांचे सार्वत्रिक शिक्षण उपलब्ध करून देण्याची मोहीम त्वरित हाती घेऊन येत्या पाच ते दहा वर्षात ती यशस्वी रीतीने पूर्ण करण्यावर भर दिला पाहिजे.

गोखले एका तत्त्वासाठी झगडत होते. सक्तीच्या शिक्षणाची कल्पना सरकारने स्वीकारली पाहिजे हीच त्यांची मागणी होती. परंतु प्रशासकीय आणि आर्थिक सबबी पुढे करून सरकार सतत तिला विरोध करीत होते. त्यामुळे लोकांची निरक्षरता घालविण्याच्या आणि ६-१४ वयोगटातील सर्व मुलांना चार वर्षांचे सोपे शिक्षण देण्याच्या मर्यादित कार्यक्रमासाठी किती पैसा आणि मनुष्यबळ लागेल याचा प्रशासकीय आणि आर्थिक तपशील तयार केला नाही, याबद्दल गोखले यांना दोष देता येणार नाही. पण त्यांनी तो तपशील गोळा केला असता तर आपल्याला मौलिक माहिती उपलब्ध झाली असती.

सर्व प्रांतिक सरकारांनी १९१८ आणि १९३० च्या दरम्यान सक्तीच्या शिक्षणासंबंधी कायदे करून त्यांची कार्यवाही सुरू केली तेव्हा पुन्हा प्रशासकीय आणि आर्थिक प्रश्न पुढे आले. त्यावेळी असे आढळून आले की सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम अमलात आणण्यासाठी प्रांतिक सरकारांपाशी पैसाच नाही. त्याचप्रमाणे हा कार्यक्रम पारंपरिक नमुन्याच्या प्राथमिक शाळांवर लादताही येणार नाही. प्रांतिक सरकारांनी हा प्रश्न काहीसा असा मांडला: "आम्ही सक्तीच्या शिक्षणाचे कायदे केले असून ते अमलात आणायला उत्सुक आहोत. परंतु या कार्यक्रमावरील खर्च आम्हाला परवडेल इतका कमी कसा करता येईल? गरीब कुटुंबांतील मुलांना शाळेत आणून तेथे ठेवून घेणे कसे शक्य होईल? सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे सामाजिक, प्रशासकीय आणि आर्थिकदृष्ट्या शक्य व्हावे म्हणून शिक्षणपद्धतीत कोणते बदल केले पाहिजेत?" या सर्व प्रश्नांना कै. श्री. रा. वि. परुळेकर यांनी (त्यांना गोखले यांचा मूलभूत सिद्धांत मान्य होता) आपल्या पुस्तकांत उत्तरे दिलेली आहेत.[५] या सर्व विचारमंथनातून प्राथमिक शिक्षणाचा जो नमुना साकार झाला तो संक्षेपाने खाली देण्यात येत आहे:

४. तत्रैव, पृष्ठ १०१



(१) निरक्षरता नाहीशी करणे हा प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत उद्देश आहे. हे उद्दिष्ट साध्य केल्यानंतरच शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न उपस्थित होतो.

(२) म्हणून, लोकांची निरक्षरता नाहीशी करण्यासाठी सर्व पैसा आणि शक्ती खर्च करायची हे राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यक्रमातील पहिले पाऊल असले पाहिजे. त्यासाठी लोकांना लिहिता-वाचता येणे आणि अंकज्ञान होणे एवढ्यापुरता प्राथमिक अभ्यासक्रम मर्यादित असायला हवा. तो चार वर्षांचा असावा आणि तो मोफत नि सक्तीचा असला पाहिजे. येत्या पाच ते दहा वर्षात हे साध्य व्हायला हवे.

(३) प्रवेशाचे वय सात वर्षांच्या पुढले असायला हवे. त्यामुळे बऱ्याच जणांचा हे शिक्षण घेण्याचा मार्ग मोकळा होऊ शकेल.

(४) ज्यांना अर्थार्जन करीत शिकावे लागते अशा अधिक वयाच्या मुलांसाठी अंशकालिक शिक्षणाची व्यापक प्रमाणावर व्यवस्था केली पाहिजे.

(५) शिक्षणावर होणाऱ्या खर्चामध्ये शिक्षक-विद्यार्थी प्रमाण हा एक प्रमुख घटक असतो. शिक्षक-विद्यार्थी प्रमाण वाढविण्यात आले तर प्रत्येक विद्यार्थ्यामागे करावा लागणारा खर्च कमी होईल आणि त्यायोगे सार्वत्रिक शिक्षणाच्या कार्यक्रमाला पैशाचा तुटवडा जाणवणार नाही. म्हणून पहिल्या आणि दुसऱ्या इयत्तांमधील लहान मुलांसाठी दुबार पद्धतीचा अवलंब करण्यात यावा. या इयत्तांमधील शिक्षण तीन तासांपुरते मर्यादित करण्यात आले तर एकच शिक्षक प्रत्येक पाळीला तीस विद्यार्थी याप्रमाणे दिवसातून साठ विद्यार्थ्यांना शिकवू शकेल. तिसऱ्या आणि चौथ्या इयत्तांसाठीही दुबार पद्धत्ती आवश्यक आहे. कारण या इयत्तांमधील बऱ्याच मुलांना अर्थार्जन करावे लागत असल्यामुळे, थोडा वेळच शाळेत येणे त्यांना शक्य होते.

पहिल्या दोन सूचना, गोखले यांनी केलेल्या शिफारशींशी अगदी मिळत्याजुळत्या आहेत आणि त्यांची चर्चा आपण यापूर्वी केलेलीच आहे. तिसरी सूचना नवीन आहे. लोकशिक्षणाच्या दृष्टीनेच ती केलेली आहे आणि त्यामुळे आपल्या मुलांना लहान वयात शाळेत घालणे हीच ज्यांची एकमेव आकांक्षा असते अशा उच्च वर्गीयांना ती पसंत पडत नाही. चौथी सूचनाही लोकशिक्षणाच्या दृष्टीने करण्यात आलेली असून आपण तिचा तिसऱ्या प्रकरणात विचार करणार आहोत. पाचवी सूचना ही केवळ नवीन आहे असे नसून अत्यंत महत्त्वाची

५. रा. वि. परुळेकर, **मास एज्युकेशन इन इंडिया**, लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट इन्स्टिटयूट, मुंबई, १९३४; आणि रा. वि. परुळेकर, **लिटरसी इन इंडिया**, मॅकमिलन ॲन्ड कंपनी, मुंबई, १९३९.

आहे आणि त्यामुळे तिचा येथे सविस्तर ऊहापोह करणे आवश्यक आहे.

**शिक्षक-विद्यार्थी प्रमाण :** सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणावर होणारा एकूण खर्च खालील सूत्रात दिला आहे :

$$अ = \frac{ब}{क} ड + ई$$

अ = सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणावरील एकूण खर्च.

ब = ज्यांना शिक्षण द्यायचे आहे अशा विशिष्ट वयोगटातील मुलांची एकूण संख्या.

ड = शिक्षकावरील खर्च. याचा अर्थ असा की वेतन, भत्ते आणि वृद्धापकाळाची तरतूद इत्यादींवर एका शिक्षकामागे होणारा खर्च.

क = सरासरी शिक्षक-विद्यार्थी प्रमाण.

ई = प्रत्येक विद्यार्थ्यामागे होणारा खर्च. यात शिक्षकावर होणारा खर्च अंतर्भूत करण्यात आलेला नाही. याचा अर्थ असा की इमारत किंवा अन्य शैक्षणिक साहित्य यांवरील भाडे; आणि पुस्तके, दुपारचे जेवण किंवा आरोग्य-सेवा यांचा मोफत पुरवठा यांसारख्या पूरक कार्यावरील खर्च.

सध्या भारतात 'ई' या चलघटकावरील खर्च फारच कमी करण्यात येत आहे. प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चापैकी तो अवघा १० टक्के होतो. कारण शाळांमध्ये उपकरणे आणि अध्यापन-साहित्य अत्यंत तोकडे असते. २० टक्क्यांपेक्षाही कमी मुलांना मोफत पुस्तके आणि अन्य अध्यापन व अध्ययन साहित्य उपलब्ध करुन दिले जाते. अवघ्या १० टक्के मुलांचीच शाळेमध्ये दुपारच्या जेवणाची व्यवस्था केली जाते. आरोग्य-सेवा तर जवळजवळ अभावानेच आढळतात. त्यामुळे हा खर्च आणखी कमी करणे समर्थनीय ठरणार नाही. उलट, शिक्षणाची गुणवत्ता सुधारायची असेल तर या खर्चात भरीव वाढ करायला हवी.

'ब' या चलघटकाबाबत चटकन काहीही करणे शक्य नाही. त्यासाठी जननप्रमाण नियंत्रित केले पाहिजे. असे करणे अत्यंत आवश्यक आहे, यात शंकाच नाही; परंतु जननप्रमाणामध्ये लक्षणीय घट व्हायला काही कालावधी जावा लागणार आहे. त्यामुळे नजीकच्या भविष्यकाळात तरी शिक्षणपद्धतीवरील हा बोजा कायम राहाणार आहे, हे गृहित धरुन चालले पाहिजे.

'ड' या चलघटकाबाबतही फारसे काही करता येण्यासारखे नाही. उलट, शिक्षकांवरील खर्च वाढत असून जसजशा किंमती वाढत जातील किंवा चांगले



शिक्षक मिळवायचा प्रयत्न केला जाईल त्या प्रमाणामध्ये हा खर्च वाढतच जाणार आहे. त्यामुळे 'ड' हा चलघटक सतत वाढत राहाणार आहे हे गृहित धरूनच शिक्षणपद्धतीची रचना केली पाहिजे.

प्राथमिक शिक्षणावर होणारा एकूण खर्च ('अ') मर्यादितच राहाणार असल्यामुळे[६] 'क' म्हणजे शिक्षक-विद्यार्थी प्रमाण या चलघटकाबाबतच आपल्याला काही तरी करायला वाव राहाणार आहे. त्यामुळे श्री. परुळेकर यांचा मूलभूत सिद्धांत असा होता की (ज्यांना शिक्षण द्यायचे आहे अशा मुलांची प्रचंड संख्या असलेल्या) गरीब देशांपुढे शिक्षकांना चांगले जीवनमान देण्याबाबत दोनच पर्याय उरतात : एक तर अशा देशाने शिक्षक-विद्यार्थी प्रमाणामध्ये वाढ करून सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण उपलब्ध करुन द्यावे, किंवा विकसित देशांचे अनुकरण करावे, म्हणजे शिक्षक-विद्यार्थी प्रमाण कमी ठेवून काही थोड्या मुलांनाच शिक्षण द्यावे.

जगातील विकसित देशांमध्ये नेहमीच शिक्षक-विद्यार्थी प्रमाण कमी होते असे नव्हे, असेही श्री. रा. वि. परुळेकर यांनी म्हटले होते. त्या देशांनी जेव्हा सार्वत्रिक शिक्षणाची मोहीम सुरु केली तेव्हा त्यांची अर्थव्यवस्था आजच्या इतकी प्रगत झालेली नव्हती. त्यावेळी त्या देशातही मुलांची संख्या खूप होती. म्हणून त्यांनी सुरुवातीला शिक्षण-विद्यार्थी प्रमाण मोठे ठेवून शिक्षण सार्वत्रिक केले. त्यानंतर त्यांची आर्थिक प्रगती होत गेल्यामुळे त्यांच्या दरमाणशी राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत गेली. त्या देशांनी कुटुंबनियोजनाचा स्वीकार केल्यामुळे त्यांचे जननप्रमाण कमी होत गेले. परिणामी, त्या देशांमधील एकूण लोकसंख्येत लहान मुलांचे जे प्रमाण शंभर वर्षापूर्वी होते ते आता बरेच कमी झालेले आहे. त्यामुळे सार्वत्रिक शिक्षणाचे उद्दिष्ट दृष्टीआड न करताही त्यांना शिक्षक-विद्यार्थी प्रमाण कमी ठेवणे शक्य झाले आहे. भारताने आणि इतर विकसनशील देशांनी हेच धोरण स्वीकारायला हवे, असे श्री. रा. वि. परुळेकर यांचे प्रतिपादन होते.

---

६. आपल्या देशात राष्ट्रीय उत्पन्नाचा ६ टक्के भाग शिक्षणावर आणि त्याचा एक तृतीयांश म्हणजे २ टक्के भाग प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा असे शिक्षण आयोगाने गृहित धरले आहे. जास्तीत जास्त एवढेच गृहित धरणे शक्य आहे. प्राथमिक शिक्षणावर ३ टक्के खर्च झाला पाहिजे, असे काहीजण गृहित धरतात. परंतु शिक्षण आयोगाची माफक अपेक्षाही अजून प्रत्यक्षात आलेली नाही, हे विसरुन चालणार नाही. सध्या आपला सर्व अंगोपांगासह एकूण शैक्षणिक खर्च दरमाणशी २० रुपये (राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षाही कमी) आहे.

त्यांनी जर तसे केले नाही तर त्यांना आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा बराच मोठा भाग प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा लागेल किंवा सार्वत्रिक शिक्षणाचे उद्दिष्ट सोडून द्यावे लागेल. हे उद्दिष्ट सोडून देण्यातच अखेर या प्रश्नाची परिणती होईल असेही त्यांनी भाकित केले होते.

प्राथमिक शिक्षणावर खर्च होत असलेल्या रकमेचा विचार केला तर श्री. परुळेकर यांनी व्यक्त केलेली भीति खरी ठरली आहे, असेच म्हणावे लागते. उदाहरणार्थ, एकूण लोकसंख्येशी ६–१४ वयोगटातील मुलांचे प्रमाण भारतात २० ते २४ टक्के आहे तर विकसित देशांमध्ये ते १५ टक्क्यांच्या आसपास आहे. प्राथमिक शिक्षकांचे भारतातील वेतन अत्यंत निकृष्ट आहे हे तर खरेच; पण त्याचबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की एका प्राथमिक शिक्षकावरील भारतातील खर्च दर माणशी राष्ट्रीय उत्पन्नाच्या पाच पट आहे,[७] तर विकसित देशांमध्ये हेच प्रमाण दोन ते तीन पट आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही जर भारतात शिक्षक–विद्यार्थी प्रमाण विकसित देशांइतके कमी ठेवले तर ६–१४ वयोगटातील सर्व मुलांना सार्वत्रिक शिक्षण देण्यासाठी केवळ प्राथमिक शिक्षणावर राष्ट्रीय उत्पन्नापैकी ४ टक्के (किंवा त्याहूनही अधिक) रक्कम खर्च करावी लागेल. याचा अर्थ असा की शिक्षण आणि संशोधन यांवरील आपला खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या ९–१० टक्के होईल. हे सकृत्‌दर्शनीच अशक्य आहे. त्यामुळे येथील वस्तुस्थिती ध्यानात घेऊन येती काही वर्षे तरी शिक्षक-विद्यार्थी प्रमाण अधिक ठेवायला आपण तयार झालो नाही तर राज्यघटनेच्या ४५ व्या कलमातील उद्दिष्ट साध्य करण्याची मुळीच आशा उरणार नाही, हे अगदी स्पष्ट आहे.

या संदर्भात आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे; ती ही की (१) शिक्षक–विद्यार्थी प्रमाण, (२) एकूण लोकसंख्येशी ६–१४ वयोगटातील बाल-लोकसंख्येचे प्रमाण, (३) प्रत्येक शिक्षकावर कराव्या लागणाऱ्या खर्चाचे दर माणशी राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण, आणि (४) प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण या चार घटकांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. ते खालील सूत्रामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे :

समजा,

अ = देशाची एकूण लोकसंख्या
ब = ६-१४ वयोगटातील मुलांचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण
क = शिक्षक-विद्यार्थी प्रमाण

---

७. शिक्षक संघटनांच्या मागण्या मान्य केल्या तर प्रत्येक प्राथमिक शिक्षका-वरील खर्च दरमाणशी राष्ट्रीय उत्पन्नाच्या जवळजवळ आठ पट होईल.



ड = दर माणशी राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रत्येक शिक्षकावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण
ई = दर माणशी राष्ट्रीय उत्पन्न
फ = प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण

तर मग–

१. शिक्षण द्यावयाच्या एकूण मुलांची संख्या होईल अब

२. प्राथमिक शिक्षण देण्यासाठी एकूण शिक्षक लागतील $\frac{अब}{क}$

३. प्राथमिक शिक्षणासाठी प्रत्येक शिक्षकामागे खर्च येईल डई

४. प्राथमिक शिक्षणावर एकूण खर्च होईल $\frac{अब.डई}{क}$ … …(१)

५. देश आपल्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी प्राथमिक शिक्षणावर 'फ' पट खर्च करणार असल्यामुळे प्राथमिक शिक्षणा-वरील एकूण खर्च होईल अ.ई.फ. … …(२)

(१) आणि (२) यांचे समीकरण केल्यास,

$$\frac{अब}{क} + डई = अ.ई.फ.$$

किंवा

$$क = \frac{ड-ब}{फ} \quad \dots \dots (३)$$

शिक्षक-विद्यार्थी प्रमाण कमी ठेवणे विकसित देशांना शक्य होते; कारण 'ब' आणि 'ड' लहान आहेत आणि त्या मानाने 'फ' बराच मोठा आहे. उलटपक्षी, विकसनशील देशांमध्ये 'ब' आणि 'ड' यांचे मूल्य बरेच अधिक असून 'फ'चे मूल्य फारच कमी आहे. त्यामुळे त्यांना एक तर मोठ्या शिक्षक-विद्यार्थी प्रमाणाचा स्वीकार करावा लागेल, किंवा राष्ट्रीय उत्पन्नाचा बराच मोठा भाग प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा लागेल ( आणि तसे करणे सोपे नाही ), किंवा मुलांना फार मोठ्या संख्येने शालेय पद्धतीबाहेर ठेवावे लागेल ( हेच सामान्यतः घडत आहे ).

या चलघटकांची भारतातील किमान आणि कमाल मूल्ये खालीलप्रमाणे आहेत :

| | किमान | कमाल |
|---|---|---|
| ब = | २०% किंवा $\frac{१}{५}$ | २५% किंवा $\frac{१}{४}$ |
| ड = | ५ | ८ |
| फ = | २% किंवा $\frac{१}{५०}$ | ३% किंवा $\frac{१}{३३}$ |

म्हणजे सर्वात कमी शिक्षक-विद्यार्थी प्रमाण ३३ राहील ( हे प्रमाण ठरविताना एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी जास्तीत जास्त म्हणजे ३ टक्के खर्च केला जाईल, शिक्षकांचे वेतन कमीत कमी म्हणजे '५ ई' राहील आणि विद्यार्थ्यांचा बोजा कमीत कमी म्हणजे २० टक्के राहील असे गृहित धरण्यात आले आहे ). सर्वात अधिक शिक्षक-विद्यार्थी प्रमाण १०० राहील ( एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी शिक्षणावरील एकूण गुंतवणूक २ टक्के राहील, शिक्षकांना सर्वात वरची म्हणजे '८ ई' वेतनश्रेणी देण्यात येईल, आणि विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त बोजा २५ टक्के राहील, असे येथे गृहित धरले आहे ). शिक्षक-विद्यार्थी प्रमाणाचे माफक मूल्य ५० ते ६६ यांच्या दरम्यान राहील.

केरळ हे असे एक राज्य आहे की तेथे ही कल्पना राबविण्यात आली होती. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याची जुन्या त्रावणकोर संस्थानची इच्छा होती. त्याचप्रमाणे तेथील लोकांनाही आपण शिक्षण घ्यावे असे वाटत असल्यामुळे प्राथमिक शाळांमधील मुलांची संख्या वाढू लागली. स्वतःपाशी मर्यादित पैसा आहे हे ओळखून त्रावणकोर संस्थानने दुबार पद्धतीचा अवलंब करून विद्यार्थी-शिक्षक प्रमाण ५० पर्यंत वाढविले. नंतर जसजसा अधिक पैसा उपलब्ध होऊ लागला तसतशी तेथे दुबार पद्धती कमी करण्यात आली. मात्र अद्याप तिचा पूर्णपणे त्याग करण्यात आलेला नाही. नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या प्राथमिक शिक्षणावरील दुसऱ्या वार्षिक वृत्तांतामधील खालील उताऱ्यावरून हे स्पष्ट होईल :

येथे आणखी एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. केरळने शैक्षणिक विकासाची अशी एक कार्यपद्धती स्वीकारली की त्यामुळे त्यात प्राथमिक शिक्षणाचा द्रुतगतीने प्रसार करता आला. या कार्यपद्धतीची दोन वैशिष्ट्ये आहेत. शिक्षणविस्ताराच्या प्रारंभीच्या काळामध्ये शिक्षक-विद्यार्थी प्रमाण वाढविण्यात आले आणि नंतरच्या काळात हे प्रमाण क्रमशः कमी करीत नेले. दहाव्या तक्त्यामध्ये केरळमधील विद्यार्थी-शिक्षक प्रमाणाची भारतातील एकूण प्रमाणाशी तुलना करण्यात आली आहे.



**तक्ता १० : विद्यार्थी-शिक्षक प्रमाण ( १९४९ ते १९५८-५९ )**

| | केरळ | | | अखिल भारतीय | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | प्राथमिक शाळा | उच्च प्रा. शाळा | पूर्व प्रा. शाळा | प्राथमिक शाळा | उच्च प्रा. शाळा | पूर्व प्रा. शाळा |
| १९४९–५० | ५३ | ४५ | ५२ | ३४ | २५ | ३२ |
| १९५०–५१ | ५० | १९ | ४५ | ३४ | २४ | ३३ |
| १९५१–५२ | ५२ | २३ | ४६ | ३४ | २५ | ३२ |
| १९५२–५३ | ५० | २४ | ४६ | ३३ | २४ | ३२ |
| १९५३–५४ | ५४ | २३ | ४८ | ३३ | २३ | ३१ |
| १९५४–५५ | ५५ | २६ | ४९ | ३३ | २३ | ३१ |
| १९५५–५६ | ४१ | १८ | ३७ | ३३ | २६ | ३२ |
| १९५६–५७ | ४१ | २७ | ३८ | ३४ | २६ | ३२ |
| १९५७–५८ | ३९ | २९ | ३६ | ३४ | २७ | ३३ |
| १९५८–५९ | ४१ | २७ | ३६ | ३५ | ३१ | ३४ |

सूचना : १९४९-५० ते १९५४-५५ पर्यंतचे आकडे त्रावणकोर-कोचीनशी संबंधित आहेत.

१९४९-५० ते १९५४-५५ या काळात केरळमध्ये शिक्षक-विद्यार्थी प्रमाण खूपच वरचे असल्यामुळे तेथे शिक्षणाचा प्रसार होऊ शकला, हे यावरून दिसून येते. दुबार पद्धती स्वीकारण्यात आल्यामुळे हे वरचे प्रमाण गाठणे शक्य झाले. दुबार पद्धतीनुसार दररोज अडीच तास या प्रमाणे दोनशे दिवस वर्ग भरतात. त्यामुळे या पद्धतीचा शिक्षक-विद्यार्थी प्रमाण वाढवायला उपयोग होतो. एक काळ असा होता की केरळने पहिल्या चारही इयत्तांसाठी ही दुबार पद्धती स्वीकारली होती, आणि त्यामुळे त्याला ५०-५५ इतके प्रमाण गाठता आले. नंतर, पैसा उपलब्ध झाल्यामुळे, चौथ्या इयत्तेमधील दुबार पद्धती रद्द करण्यात आली तिसऱ्या इयत्तेमधूनही ही पद्धती काढून टाकण्याचा सध्या विचार केला जात आहे. ४०:१ हे अधिक उचित विद्यार्थी-शिक्षक प्रमाण १९५८–५९ पासून अवलंबण्यात आले आहे.

शिक्षणप्रसाराच्या प्रारंभीच्या अवस्थेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यावर कमीत कमी खर्च केला जावा अशी कार्यपद्धती केरळमध्ये अनुसरण्यात आल्यामुळे तेथे प्राथमिक शिक्षणाचा द्रुतगतीने प्रसार होऊ शकला. प्रत्येक विद्यार्थ्यामागे करावा

लागणारा खर्च आणि प्राथमिक शिक्षणावर होणारा एकूण खर्च या दोन प्रमुख घटकांवर प्राथमिक शिक्षणाची वाढ अवलंबून असते. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार करायचा असेल तर प्रत्येक विद्यार्थ्यामागे करावा लागणारा खर्च कमी ठेवावा लागतो आणि प्राथमिक शिक्षणावरील एकूण खर्च वाढवावा लागतो. केरळने तर या दोन्ही पद्धतींचा अवलंब केलेला आहे, हे तक्ता क्र. ११ मधील आकडेवारीवरून स्पष्ट होते.

शिक्षकांचे पगार कमी ठेवून आणि शिक्षक–विद्यार्थी प्रमाण अधिक ठेवून केरळने शिक्षणप्रसाराच्या सुरुवातीच्या काळामध्ये प्रत्येक विद्यार्थ्यामागे होणारा खर्च कमी ठेवला. त्यामुळेच शिक्षणप्रसार होऊ शकला. १९५७–५८ पासून तेथे शिक्षकांचे पगार वाढविण्यात आले असून शिक्षक–विद्यार्थी प्रमाणही कमी करण्यात आले आहे. त्यामुळे साऱ्या देशाच्या तुलनेने केरळमध्ये प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण जवळजवळ दुपटीने वाढले आहे.

शैक्षणिक प्रगतीमुळे खर्च वाढू लागतो. शिक्षक–विद्यार्थी प्रमाण कमी केल्याने आणि त्याचवेळी शिक्षकांचे वेतनमान वाढविल्यामुळे प्राथमिक शिक्षणावरील खर्चात वाढ झाली. प्राथमिक शिक्षणानंतर साहजिकच माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणाचा प्रसारही झाला आणि उच्च शिक्षणावरील खर्च वाढला. त्यामुळे केरळमधील शिक्षणावरील एकूण खर्चात खूपच वाढ झाली. केरळ सध्या आपल्या एकूण उत्पन्नातील जवळजवळ ४० टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करीत आहे.

### तक्ता क्र. ११ : प्रत्येक विद्यार्थ्यावरील खर्च

| | केरळ | | | अखिल भारत | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९४९-५० | १९५४-५५ | १९६८-६९ | १९४९-५० | १९५४-५५ | १९६८-६९ |
| १. प्राथ. शिक्षकाचे सरासरी वार्षिक वेतन (रु.) | ३३७.७ | ४७३.१ | १०३०.१ | ४७९.२ | ६५३.३ | ७८८.५ |
| २. विद्यार्थी-शिक्षक प्रमाण (प्राथ. शाळा) | ५३ | ५५ | ४१ | ३४ | ३३ | ३५ |
| ३. प्रत्येक विद्यार्थ्यावरील वार्षिक खर्च (प्राथ. शाळा) (रु.) | ६.७ | ९.६ | २९.२ | १९.५ | २२.९ | २६.१ |
| ४. प्राथ. शिक्षणावरील दरमाणशी खर्च (रु.) | ०.९ | १.३ | ३.० | १.० | १.३ | १.५ |



१४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचे आपल्या राज्यघटनेमध्ये नमूद करण्यात आलेले उद्दिष्ट १९७५ पर्यंत साध्य करण्याची देशातील इतर कोणत्याही राज्यापेक्षा केरळपाशीच अधिक क्षमता आहे.

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद करण्याबाबत इतर राज्यांना आस्था असती तर केरळने जे साध्य केले ते त्यांनाही साध्य करता आले असते.[८]

शिक्षक-विद्यार्थी प्रमाण वाढविण्याबाबत कोणती पद्धत अवलंबावी यासंबंधी श्री. परुळेकर यांची आग्रही भूमिका नव्हती. अनेक मार्गांनी हे प्रमाण वाढविता येणे शक्य आहे असे यांचे मत होते. दुबार पद्धतीचा स्वीकार करणे हा सर्वत्र आढळणारा मार्ग आहे. या पद्धतीनुसार एक शिक्षक ३० ते ४० मुलांच्या एका तुकडीला दिवसातून एका विशिष्ट वेळी तीन तास शिकवू शकतो; किंवा प्रत्येकी ३० ते ४० मुलांच्या दोन तुकड्यांना तो एक दिवसाआडही शिकवू शकेल. याचा अर्थ असा की प्रत्येक तुकडीला आलटून-पालटून तीन-तीन दिवस शिकवून सातव्या दिवशी शिक्षकाला सुटी घेता येईल किंवा एका तुकडीला सलग तीन दिवस आणि नंतर दुसऱ्या तुकडीला सलग तीन दिवस शिकवायचे अशीही त्याला व्यवस्था करता येईल. चौथा पर्याय असा आहे की उपशिक्षकांच्या सहकार्याने शिक्षकाने एकाच वेळी ६० विद्यार्थ्यांचा वर्ग घ्यावा.

या संबंधात श्री. रा. वि. परुळेकर यांचे शब्द उद्धृत करणे उचित ठरेल :

युरोप-अमेरिकेमधील अनेक देशांनी आणि जपानने पूर्वी कोणत्या पद्धती अवलंबिल्या होत्या, हे आता पाहू या. या संबंधात त्यांच्या सध्याच्या आकडेवारीपेक्षा पूर्वीच्या काळातील आकडेवारीच मार्गदर्शक ठरणार आहे. कारण एखाद्या देशामध्ये शिक्षणाचा प्रसार होतो आणि त्याचा परिणाम म्हणून समृद्धी येते तेव्हा आपल्या शाळा अधिकाधिक कार्यक्षम करण्याचा त्याने प्रयत्न करावा हे स्वाभाविकच असते. प्रत्येक शिक्षकाकडे किती विद्यार्थी सोपविले जातात, हा शालेय शिक्षण परिणामकारक करण्यामधील एक महत्त्वाचा घटक आहे हे नाकारून चालणार नाही. शिक्षकाकडे सोपविण्यात आलेली विद्यार्थीसंख्या जितकी कमी असेल तितके ते विद्यार्थ्यांच्या दृष्टीने चांगले असते याची प्रस्तुत लेखकाला जाणीव आहे. आपल्या गरजा आणि साधनसामुग्री यांच्या संदर्भात छोट्या वर्गाच्या आदर्शाप्रत पोहोचणे एखाद्या देशाला कितपत शक्य आहे, हाच खरा प्रश्न आहे.

---

८. पृष्ठ ८९-१००

प्रत्येक शिक्षकाकडे जास्तीत जास्त किती मुले सोपविली जावीत यासंबंधी काही देशातील नियमांचा सारांश खाली दिलेला आहे :

| देश | वर्ष | एका शिक्षकाकडे सोपवायची जास्तीत जास्त विद्यार्थीसंख्या |
|---|---|---|
| इंग्लंड | (१८९४ पासून) | ६० |
| फ्रान्स | १९०६ | ५० |
| जर्मनी | १८९६ | ८० |
| जर्मनी | १९०९ | ७० |
| जर्मनी | १९३३ | ६० |
| हंगेरी | १९०५ | ८० |
| हंगेरी | १९१० | ६० |
| स्वित्झर्लंड | १९०५ | ७० |
| इटली | १९३२ | ६० |
| पोर्तुगाल | १९०५ | ८० |
| सर्बिया | १९०५ | ७० |
| चेकोस्लोव्हाकिया | १९२४ | ८० |
| जपान | १९०६ | ७० ( साधी प्राथमिक शाळा ) |
| | १९१० | ६० ( उच्च प्राथमिक शाळा ) |
| | १९२३ | या दोन्ही शाळांत खास परवानगी घेऊन विद्यार्थीसंख्या १० ने वाढविता येईल. |

या संख्यांची मुंबई प्राथमिक शिक्षण नियमाशी (१९२४-नियम क्र. ५७) तुलना करा. कारण आजही तोच नियम लागू आहे : एका वर्गातील हजेरीपटावरील विद्यार्थ्यांची संख्या आणि एका शिक्षकाकडे एकाहून अधिक वर्ग असतील तर अशा सर्व वर्गातील हजेरीपटावरील विद्यार्थ्यांची संख्या ४० हून अधिक असता कामा नये.

या संबंधात असे सांगितले जाईल की मुंबईतील सर्वसामान्य प्राथमिक शिक्षकाला एका वेळी यापेक्षा अधिक मुलांना शिकविता येणार नाही. इतर देशांच्या तुलनेने मुंबईमध्ये प्रशिक्षित शिक्षकांची संख्या कमी आहे. अशा परि-स्थितीत विद्यार्थ्यांची वर्गातील संख्या वाढविली तर अध्यापन वाया जाण्याचे



आणि अध्ययनात गतिहीनता येण्याचे प्रमाण वाढून सार्वजनिक पैशाचा अपव्यय होईल. एका वर्गामध्ये दोन किंवा अधिक इयत्ता अंतर्भूत केल्याने विद्यार्थ्यांची संख्या एवढी वाढेल की तिचा परिणाम कमालीची अकार्यक्षमता निर्माण होण्यात येईल. या सर्व आणि तत्सम इतर प्रश्नांच्या उत्तरादाखल असे सांगता येईल की इतर देशांतील शिक्षकांच्या तुलनेने मुंबईतील सध्याचे प्रमाण (जवळजवळ ५०) इंग्लंडमध्ये प्राथमिक शिक्षणाचा झपाट्याने प्रसार होत असताना ( १८८५ पर्यन्त ) जे प्रमाण होते त्यापेक्षा कमी नाही. त्यावेळी तेथील प्रत्येक शिक्षक साधारणतः ५० हून अधिक मुलांना शिकवत असे. वर निर्देश केलेल्या जवळजवळ सर्व देशांमध्ये प्रत्येक शिक्षकाकडे सोपविण्यात येणारी जास्तीत जास्त मुले एकाच इयत्तेमधील नसत. शैक्षणिक प्रगतीनुसार इयत्ता पाडण्यात आलेल्या असत, तर मुंबईतील शिक्षकाला सध्या त्याच्याकडे सोपविण्यात येत असलेल्या मुलांपेक्षा अधिक मुलांकडे का पाहता येऊ नये ?[९]

श्री. रा. वि. परुळेकर यांनी सुचविल्याप्रमाणे शिक्षक-विद्यार्थी प्रमाण वाढ-विण्यात आले तर सध्या जेवढे शिक्षक उपलब्ध आहेत तेवढे शिक्षकही ६–१४ वयोगटातील सर्व मुलांना सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण देऊ शकतील हे यावरून स्पष्ट होते. दुर्दैवाने श्री. परुळेकरांच्या सूचनेला अनेक कारणांमुळे पुरेसा पाठिंबा मिळू शकला नाही. त्यापैकी काही महत्त्वाची कारणे खाली देत आहोत :

( १ ) या सूचनेला विरोध करताना शिक्षकांनी शिक्षणाचा दर्जा घसरण्याची सबब पुढे केलेली असली तरी खरे म्हणजे अधिक वेतन आणि कमी काम हाच त्यांचा त्या मागचा, इतर क्षेत्रात आढळणारा, व्यावसायिक दृष्टिकोन होता. लहान वर्ग हाच अजूनही आपण आपल्या शिक्षणपद्धतीचा आदर्श मानत आलेलो असल्यामुळे शिक्षकांच्या व्यावसायिक दृष्टिकोनाला आणखी पाठिंबा मिळाला. आपण ज्या अध्यापन-पद्धती शोधून काढल्या आणि प्रशिक्षण संस्थांमध्ये अनु-सरल्या त्याही लहान वर्गाच्या संकल्पनेवरच आधारलेल्या आहेत. त्यामुळे लहान वर्ग हाताळण्याची सवय झालेल्या शिक्षकांना मोठे वर्ग नकोसे वाटत असतात. शिक्षक-विद्यार्थी प्रमाणामध्ये वाढ करायला हवी हे आपण तत्त्वतः मान्य केले आणि अशा मोठ्या वर्गांना उपयुक्त ठरणाऱ्या अध्यापन आणि मूल्यमापन पद्धती विकसित करून त्यांचा प्रशिक्षण संस्थांमध्ये अवलंब केला तर साहजिकच सध्याच्या परि-स्थितीने बराच बदल घडून येऊ शकेल. कारण अधिक विद्यार्थीसंख्येचा वर्ग चांगल्या रीतीने हाताळण्याची मानसिक आणि व्यावसायिक क्षमता शिक्षकांना लाभेल; पण नेमके हेच घडत नाही.

९. रा. वि. परुळेकर, **मास एज्युकेशन इन इंडिया**, पृष्ठे १९–२१

(२) दुसऱ्या पद्धतीला वरिष्ठ वर्गाचा विरोध आहे. आपल्या मुलांना पूर्ण वेळेच्या शाळेमध्ये पाठविणे त्यांना परवडू शकते आणि त्यामुळे ही पद्धत चालू रहावी असे त्यांना वाटते. आपल्या मुलांची कोणी तरी सार्वजनिक खर्चाने दिवसातील सहा तास काळजी घेत आहे, ही सोय गमाविण्याची त्यांची तयारी नसल्यामुळे ते दुसऱ्या पद्धतीला विरोध करतात. या वरिष्ठ वर्गीयांना जर असे सुचविले की तुमची मुले सहा तासांच्या शाळांमध्ये जावीत, परंतु गरिबांना आपली मुले पूर्ण वेळेच्या शाळांमध्ये धाडणे शक्य नसल्यामुळे त्यांच्यासाठी दुसरी पद्धती सुरू करावी, तर समतेची खोटी सबब पुढे करून ते या सूचनेलाही विरोध करतात. गरिबांच्या मुलांनाही पूर्ण वेळेचे शिक्षण मिळाले पाहिजे असे त्यांचे प्रतिपादन असते. गरीब कुटुंबातील मुलांनाही पूर्ण वेळेचे शिक्षण मिळाले पाहिजे असा आग्रह धरणे म्हणजे त्या मुलांना शिक्षणापासून दूरच ठेवल्यासारखे ठरणार आहे, हे या लोकांना माहीत असते. त्यामुळे श्रीमंत आणि गरीब वर्गामध्ये समता प्रस्थापित करायची असेल तर दोन्ही समाजगटांतील मुलांसाठी दुसरी पद्धत सुरू करणे हाच एकमेव मार्ग उरतो. परंतु तो वरिष्ठ वर्गीयांना मान्य नाही.

(३) या प्रश्नाची गरिबांनाही नीट कल्पना आलेली नाही. आपली मुले लहान असताना (म्हणजे ६ ते ८ वर्षांची असताना) त्यांनी पूर्णवेळेच्या शाळेत जावे, असे गरिबांना वाटत असते. कारण त्या वयातील मुले घरी मदत करण्याऐवजी उपद्रवच ठरतात. म्हणून खालच्या इयत्तांमध्ये दुसरी पद्धत सुरू करणे त्यांनाही पसंत पडत नाही. कारण तिची त्यांना गरज नसते. थोड्या अधिक वयाची मुले कामासाठी उपयोगी पडत असल्यामुळे त्यांच्यासाठी वरच्या वर्गामध्ये दुसरी पद्धत सुरू केली तर ती गरीब कुटुंबांना मान्य होईल. परंतु शिक्षणपद्धतीचे सध्या जे नियम आहेत त्यात हे बसत नाही.

(४) प्राथमिक शिक्षणाचे प्रशासकही दुसरी पद्धत अमलात आणायला उत्सुक नसतात. कारण या पद्धतीमुळे, इतरांना उपकृत करण्याचे आपले महत्त्व कमी होईल हे त्यांना माहीत आहे. शिक्षकांच्या जास्तीत जास्त जागा निर्माण करण्यावरच त्यांचे लक्ष असते. त्यामुळे त्यांचे महत्त्व वाढते. शिवाय त्यामुळे मध्यम वर्गाचा आर्थिक दर्जाही सुधारतो. कारण या धोरणामुळे त्या वर्गाला नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात. अशा रीतीने विचार करणाऱ्यांना, पूर्णवेळेच्या कमीत कमी शिक्षकांवर भर देणारी दुसरी पद्धत मान्य होणे शक्यच नाही.

या आणि तत्सम अन्य कारणांमुळे शिक्षक-विद्यार्थी प्रमाण वाढविण्यासंबंधीच्या सूचना अस्वीकार्य ठरलेल्या आहेत, आणि त्या प्रमाणात सार्वत्रिक शिक्षणाची तरतूद करण्याचा कार्यक्रमही अपुरा राहिलेला आहे.



## मूलोद्योग शिक्षणाचा नमुना

गोखले-परुळेकर नमुन्याने साधारणतः चार वर्षांमध्ये परिणामकारक साक्षरता प्राप्त करून देणे हे प्राथमिक शिक्षणाचे एकमेव किंवा सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट ठरविल्यामुळे त्याच्यावर आपोआपच मर्यादा पडल्या. १९३५ च्या सुमारास देशातील लोकमत खूपच बदलेले होते. चार वर्षांच्या सक्तीच्या शिक्षणाची कल्पना लोकांनी १९१२ मध्ये स्वीकारली असती. परंतु, आम्हाला किमान सात किंवा आठ वर्षांचे सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे, असे १९३५ मध्ये लोक म्हणू लागले. शिवाय लोक पारंपरिक शिक्षणपद्धतीवर नाराजही झाले होते. कारण सरकारी नोकरीस पात्र करणे या व्यतिरिक्त त्या शिक्षणपद्धतीला दुसरे कोणतेच महत्त्वाचे उद्दिष्ट राहिलेले नव्हते. त्यामुळे, प्राथमिक शिक्षणाच्या आशयाबाबत पुनर्विचार करण्याची गरज भासू लागली. याच सुमारास महात्मा गांधींनी मूलोद्योग शिक्षणासंबंधीची आपली ख्यातनाम कल्पना पुढे मांडली. त्यामुळे शिक्षणविषयक चर्चा एकदम वेगळ्याच पातळीवर गेली.

ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून आपण प्राथमिक शिक्षणाचा जो पारंपरिक नमुना स्वीकारला त्यात उत्पादकता आणि शारीरिक श्रम यांना मुळीच स्थान नव्हते, आणि हा त्या शिक्षणपद्धतीचा सर्वात मोठा दोष होय, हे महात्मा गांधींनी केलेले निदान अगदी अचूक होते. इतर पारंपरिक समाजांप्रमाणे भारतीय पारंपरिक समाजाचीही दोन गटात विभागणी झालेली आहे. पहिल्या गटात सुशिक्षित, सुसंस्कृत आणि सुखासीन अल्पसंख्य वर्गाचा समावेश होतो. हा वर्ग परोपजीवी जीवन जगत आहे. तसेच प्रत्यक्ष उत्पादक कार्यात सहभागी न होताही या वर्गाने जवळजवळ सर्व सामाजिक साधनसामग्रीवर आपले मक्तेदारी नियंत्रण प्रस्थापित केलेले आहे. हा वर्ग संख्येने थोडा असला तरी औपचारिक शिक्षणपद्धतीचा सर्वात जास्त फायदा या वर्गालाच होत असतो. औपचारिक शिक्षणपद्धतीचा उत्पादकतेशी काहीच संबंध येत नाही. या शिक्षणपद्धतीचे वर्णन गोल्डस्मिथ यांनी 'एक पेनी कशी कमवायची हे शिकविण्याऐवजी हजारो पौंड कसे खर्च करायचे हे शिकविणारी पद्धती' असे केले आहे. दुसऱ्या वर्गामध्ये सारा समाज येतो. सामाजिक संपत्ती निर्माण करण्याचे कार्य बव्हंशी हाच वर्ग करीत असला तरी औपचारिक शिक्षणाचा या वर्गाला फारच थोडा लाभ होतो; आणि त्यामुळे तो बऱ्याच प्रमाणात अशिक्षित, असंस्कृत आणि कष्टकरी राहिलेला आहे. 'शारीरिक श्रमांना किंवा समाजोपयोगी उत्पादक कामाला प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये स्थान मिळालेले नाही. शिक्षणपद्धतीचा पारंपरिक नमुना परोपजीवी सुखवस्तू लोकांना लाभकारक का ठरला आणि शोषित, दरिद्री समाजाची त्याने का उपेक्षा केली याचे हे एक प्रमुख

कारण आहे, असे महात्मा गांधींचे मत होते. म्हणून अभिजन आणि बहुजन यांच्यातील विषमता नाहीशी करणे आणि शोषणमुक्त नि समताधिष्ठित समाज निर्माण करणे हेच आपले अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे, असे त्यांचे सांगणे होते. कारण अशा समाजातच प्रत्येक नागरिक सुशिक्षित आणि सुसंस्कृत होऊन सुखप्रद जीवन व्यतीत करू शकतो. तसेच तो सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि उत्पादक कामगार होऊ शकतो. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समाजोपयोगी उत्पादक कामाभोवती आणि शारीरिक श्रमाभोवती शिक्षणपद्धतीची गुंफण करायला हवी असे गांधीजी म्हणत असत. कारण त्यायोगे व्यक्तीच्या जीवनात आणि मूल्यविचारात समाजोपयोगी, उत्पादक कामाला आणि शारीरिक श्रमांना स्थान लाभेल असा त्यांचा विश्वास होता.

म्हणून महात्मा गांधींनी पुरस्कारिलेली (मूलोद्योग शिक्षणपद्धती आशयाच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाच्या पारंपरिक नमुन्यापासून मूलतः भिन्न आहे. मूलोद्योग शिक्षणपद्धती शारीरिक श्रम आणि काही तरी समाजोपयोगी उत्पादक काम यांच्याभोवती गुंफलेली आहे, तर परंपरागत नमुन्यात साक्षरता, पुस्तकी शिक्षण किंवा शैक्षणिक अनुभव यांच्यावरच भर आहे. समाजोपयोगी उत्पादक कामाभोवती सर्व अभ्यासक्रमाची रचना करण्याचा मूलोद्योग शिक्षणपद्धती निर्धारपूर्वक प्रयत्न करीत असल्यामुळे ही शिक्षणपद्धती म्हणजे शिक्षण आणि कौशल्यप्राप्ती असे होत नसून कौशल्यप्राप्तीतून शिक्षण असे तिला रूप प्राप्त होते. मूलोद्योग शिक्षणपद्धती पारंपरिक नमुन्यापेक्षा आणखीही एका बाबतीत भिन्न आहे. मूलोद्योग शिक्षणपद्धतीमध्ये शाळेत दिले जाणारे शिक्षण आणि भौतिक नि सामाजिक स्थानिक परिस्थिती यांच्यात अधिक चांगला समन्वय साधला जातो. (मुलाला माध्यमिक शाळेत प्रवेश घेण्यासाठी पात्र करणे एवढे एकच पारंपरिक प्राथमिक शिक्षणपद्धतीचे उद्दिष्ट होते. त्यामुळे तिने उच्च वर्गाची गरज भागविली. कारण माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घेऊन कारकुनी नोकऱ्या मिळवणे हेच या वर्गाचे प्रमुख ध्येय होते. परंतु ही शिक्षणपद्धती जनतेच्या गरजा भागवू शकली नाही. कारण गरिबांना केवळ प्राथमिक शिक्षण घेणेच शक्य होते आणि तेवढ्या आधारावर त्यांना पुढील जीवनात प्रवेश करावा लागे. मुलाला एखादा व्यवसाय करण्यासाठी सक्षम करणे हा मूलोद्योग शिक्षणपद्धतीचा उद्देश असल्यामुळे गरीब कुटुंबांतील मुलांच्या दृष्टीने तीच अधिक फायदेशीर होती.

शिक्षणाच्या आर्थिक बाजूसंबंधीही महात्मा गांधींचे विचार स्पष्ट आणि आग्रही होते. मूलोद्योग शिक्षणपद्धती स्वावलंबी असली पाहिजे असे ते म्हणत. विद्यार्थ्यांना शारीरिक श्रम किंवा समाजोपयोगी काम केल्यामुळे जो फायदा होईल त्यातून शिक्षकाच्या वेतनासह शाळेचा संपूर्ण खर्च भागला पाहिजे, असे त्यांचे



मत होते. स्वावलंबन हाच मूलभूत शिक्षण कार्यक्रमाच्या यशाचा सर्वांत महत्त्वाचा निकष ठरला पाहिजे, असे ते या दृष्टीनेच प्रतिपादन करीत होते. गांधीजींचा हा विचार शिक्षणक्षेत्रातील व्यक्तींना कधीही मान्य झाला नाही. त्यांना असे वाटत होते की मुलांनी केलेल्या समाजोपयोगी उत्पादक कार्यामधून जो काही फायदा होईल त्यातून जास्तीत जास्त या कार्यक्रमाचा खर्च (कच्च्या मालाची किंमत, उपकरणांची देखभाल) भागून त्या मुलांना मोफत कपडे वा भोजन देण्याइतकीच रक्कम जेमतेम लाभेल.

सुरुवातीच्या काळात मूलोद्योग शिक्षणाच्या प्रसाराबाबत खूपच उत्साह दाखविण्यात आला. १९३७ ते १९३९ या काळात अनेक प्रांतांमध्ये काँग्रेसची सरकारे अधिकारावर असताना या शिक्षणपद्धतीचा जोरदार पाठपुरावा करण्यात आला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात काँग्रेस सरकारांनी राजीनामे दिल्यानंतर हा प्रयोग कसाबसा जिवंत ठेवण्यात आला होता. त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या शिक्षणपद्धतीला पुन्हा एकदा जोराची चालना मिळू शकली. उत्तरप्रदेश सरकारने सर्व प्राथमिक शाळांचे मूलोद्योग शिक्षण शाळांमध्ये रूपांतर केले. इतर राज्यांमध्ये हा प्रयोग निवडक शाळांमध्ये किंवा निवडक विभागांमध्ये अनुसरण्यात आला. शिक्षकांचे प्रशिक्षण करण्यासाठी सर्व शिक्षक प्रशिक्षण संस्थांमध्ये मूलोद्योग शिक्षणाचा आकृतिबंध अमलात आला; शाळा तपासनीसांनाही या पद्धतीनुसार प्रशिक्षित केले गेले. काही विभागांमध्ये माध्यमिक शाळांमध्ये मूलोद्योग शिक्षण सुरू करण्यात आले; तर काही ठिकाणी हे शिक्षण देणाऱ्या माध्यमिक शाळा स्थापन करण्यात आल्या. मूलोद्योग शिक्षणपद्धतीचा उच्च शिक्षणात अवलंब व्हावा हा ग्रामीण भागात शैक्षणिक संस्था काढण्यामागचा एक हेतू होता.

अनेक कारणांमुळे मूलोद्योग शिक्षणाचा कार्यक्रम अपेक्षित प्रगती करू शकला नाही; म्हणून १९५६ मध्ये एक सुधारित योजना सुरू करण्यात आली. या योजनेनुसार, सुरुवातीला सर्व प्राथमिक शाळांमध्ये सोपे आणि मर्यादित कार्यक्रम सुरू करण्याचे ठरले. प्रशिक्षित शिक्षक आणि आवश्यक पैसा उपलब्ध झाल्यानंतर कालांतराने सर्व शाळांचे संपूर्ण मूलोद्योग शिक्षण शाळांमध्ये रूपांतर केले जाणार होते. हा कार्यक्रमदेखील समाधानकारक प्रगती करू शकला नाही. (अजूनही देशाच्या वेगवेगळ्या भागात काही थोड्या मूलोद्योग शिक्षण शाळा चालविल्या जात आहेत. परंतु एकंदरीत ही चळवळ थंडावली असून १९ व्या शतकामध्ये विकसित करण्यात आलेल्या प्राथमिक शिक्षणाच्या पारंपरिक नमुन्यावर ती कोणताही ठसा उमटवू शकली नाही; आणि त्यामुळे अजूनही प्राथमिक शिक्षणात पारंपरिक नमुनाच अनुसरला जात आहे.)

मध्यंतरी करण्यात आलेल्या मूलोद्योग शिक्षणाच्या प्रयोगामुळे काहीच फायदे

झाले नाहीत असे नव्हे; शिक्षणविषयक विचारांच्या परिवर्तनामध्ये मूलोद्योग शिक्षण योजनेचा मोठाच हातभार लागलेला आहे. शिक्षण उत्पादकतेशी निगडीत असले पाहिजे, हे तत्त्व आता सर्वमान्य झालेला आहे. शालेय पातळीवरील मुलांच्या शिक्षणामध्ये काही तरी प्रत्यक्ष करून शिकण्याचे कार्यक्रम, शारीरिक श्रम, समाजोपयोगी उत्पादक कार्यात सहभाग आणि राष्ट्रीय व सामाजिक सेवा यांना स्थान असले पाहिजे, या बाबतही एकमत झालेले आहे. विद्यार्थ्यांचा बौद्धिक आणि भावनिक विकास होण्याचा दृष्टीनेही हे बदल आवश्यक आहेत, असे आता मानले जात आहे. या अर्थाने मूलोद्योग शिक्षणाची संकल्पना स्थिर झाली असून पुस्तकी शिक्षणाची जुनी कल्पना त्याज्य ठरली आहे. मूलोद्योग शिक्षणाची यशस्वी कार्यवाही होऊ शकली नाही हे खरे असले, तरी वर निर्देशिलेला वैचारिक बदल हे या शिक्षणयोजनेचे मोठेच फलित म्हटले पाहिजे.

मूलोद्योग शिक्षण कार्यक्रमाची समाधानकारक प्रगती का होऊ शकली नाही ?

( १ ) सत्ताधारी वर्गाने हा कार्यक्रम मनापासून राबविला नाही हे त्याच्या अपयशाचे सर्वात प्रमुख कारण होय. प्राथमिक शिक्षणाचा पारंपरिक नमुना मुख्यतः भारतातील नागरी भागात राहाणाऱ्या वरिष्ठ आणि मध्यम वर्गांसाठी विकसित करण्यात आलेला होता, या संबंधीचे विवेचन वर आलेलेच आहे. या वर्गांना पहिल्यापासून शारीरिक श्रमांसंबंधी तुच्छता वाटत आलेली आहे. पुस्तका-मार्फत साक्षरता संपादन करण्याची त्यांना भलतीच हौस आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमामध्ये शारीरिक श्रमांचा आणि उत्पादक कार्याचा समावेश करायला या वर्गाचा जो सामाजिक आणि मानसिक विरोध होता तो मोडून काढता आला नाही.

( २ ) मूलोद्योग शिक्षणपद्धतीला जनतेकडूनही विरोध झाला. वरिष्ठ आणि मध्यम वर्गीयांचे आपण अनुकरण करावे, असे लोकांना वाटू लागले. त्यांना जेव्हा असे आढळून आले की नागरी भागातील उच्च आणि मध्यम वर्गातील मुलांना पुस्तकांमार्फत साक्षर होण्याचे ( आणि तेही इंग्रजी भाषेच्या अध्ययनावर भर देणारे ) शिक्षण दिले जात असताना ग्रामीण भागातील आणि गरीब कुटुंबांतील मुलांसाठी वेगळी शिक्षणपद्धती ( आणि तीही शारीरिक श्रमांवर आधारलेली आणि अभ्यासात इंग्रजी भाषेचा समावेश न करणारी ) अनुसरली जात आहे, तेव्हा आपल्याला दुय्यम दर्जाचे शिक्षण दिले जात आहे अशी त्यांची प्रथम प्रतिक्रिया झाली. ‘ इतर मुलांसाठी हे चांगले शिक्षण आहे ’ अशी मूलो-द्योग शिक्षणाची व्याख्या करण्यात येऊ लागली. त्यामुळे वरिष्ठ आणि मध्यम वर्गांप्रमाणे गरीब लोकांनाही या शिक्षणाबद्दल तिरस्कार वाटू लागला आणि त्यातून त्यांनी, देशातील सर्व मुलांसाठी एकच शिक्षणपद्धती असली पाहिजे,



असा आग्रह धरला.

( ३ ) मूलोद्योग शिक्षणयोजनेच्या अपयशाला काही तांत्रिक घटकही कारणीभूत झाले. मूलोद्योग शाळांमध्ये सूत कातणे आणि विणणे यांवर अवास्तव भर देण्यात आला. विशेषतः सूतकताईमुळे काही विशेष अडचणी निर्माण झाल्या. त्याऐवजी शेतीवर भर देण्यात आला असता तर ही योजना यशस्वी होण्याची अधिक शक्यता होती. परंतु जमीन उपलब्ध न होऊ शकल्यामुळे फारच थोड्या शाळां-मध्ये शेती हा विषय शिकविण्याची सोय होऊ शकली. सूतकताईसारखे विषय शिकविण्याची पद्धतही जुनाट होती. कच्च्या मालाचा पुरवठा कधीही नीट होऊ शकला नाही. त्याचप्रमाणे या शाळांमध्ये तयार झालेल्या मालाची विक्री-व्यवस्थाही विस्कळीत राहिली.

( ४ ) विद्यार्थ्यांची झपाट्याने वाढलेली संख्या ही आणखी एक अडचण ठरली. मूलोद्योग शिक्षणाचा प्रयोग मर्यादित प्रमाणावर केला असता तर तो यशस्वी झालाही असता. कारण ज्या शाळांपाशी चांगले शिक्षक आणि सुविधा उपलब्ध होत्या तेथे हा प्रयोग हमखास यशस्वी ठरला. हा कार्यक्रम व्यापक प्रमाणावर सुरू करण्याइतकी साधनसामग्री नव्हती.

( ५ ) आर्थिकदृष्ट्या विचार केला तर मूलोद्योग शिक्षणाची फलश्रुती संमिश्र म्हटली पाहिजे. या शिक्षणपद्धतीने प्राथमिक शिक्षणावरील सरकारी खर्च मुळीच कमी केला नाही. उलट तो इतका वाढला की मूलोद्योग शाळा स्थापन करणे आणि चालविणे सरकारला त्रासदायक ठरू लागले. या शिक्षणाने काही उत्पन्न निश्चितच मिळवून दिले; पण वेगवेगळ्या क्षेत्रांत त्याचे प्रमाण भिन्न राहिले. काही शाळांना कच्च्या मालाची किंवा उपकरणांच्या हाताळणीची किंमतही वसूल करता आली नाही. काहींनी जेमतेम तेवढे उत्पन्न मिळविले, तर अन्य काही शाळांना फायदा मिळविणेही शक्य झाले. तो फायदा अर्थातच शाळांना आणि त्यांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरला. हा या योजनेचा एकूण लाभच म्हटला पाहिजे. परंतु तरीही त्यामुळे सरकारी खर्च कमी होऊ शकला नाही.

## राजगोपालाचारी प्रयोग

या संदर्भामध्ये श्री. सी. राजगोपालचारी यांनी मद्रासचे ( आताचे तामिळ-नाडू ) मुख्यमंत्री असताना केलेल्या प्रयोगाचा विचार केला पाहिजे. त्यांनी गोखले-परुळेकरांचे नमुने आणि मूलोद्योग शिक्षणाच्या संकल्पना यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न करून पाहिला. या प्रयोगामध्ये गोखले-परुळेकर नमुन्यातील शिक्षक-विद्यार्थी प्रमाण वाढविण्यावर ( किंवा दुसऱ्या पद्धतीवर ) भर देण्यात आला होता. मूलोद्योग शाळा स्थापन करण्यासाठी आणि चालविण्यासाठी जो

बराच खर्च होत आहे तो कमी केला पाहिजे असे राजगोपालाचारी यांना वाटत होते. त्यामुळे त्यांनी असे सुचविले की प्राथमिक शाळांमध्ये दुसरी पद्धत अवलंबावी आणि विद्यार्थ्याला एखादे कसब सरकारी खर्चाने शाळेत शिकविण्याऐवजी विद्यार्थ्याने आपल्या कुटुंबाच्या व्यवसायामध्ये घरीच काम करावे. त्या बाबतीतील श्री. राजगोपालाचारी यांचे शब्द येथे उद्धृत करणे उचित ठरेल :

प्राथमिक शिक्षणाचा आपल्या सांप्रतच्या जीवनाशी फारच थोडा संबंध राहिलेला आहे. अर्थात त्याची जीवनापासून संपूर्णपणे फारकत झालेली नाही. आपण आपल्या मुलांचे चांगले संगोपन केले नाही तर आपण संस्कृती कशी काय टिकवू शकणार आहोत ? संसदेने केलेल्या कायद्यांनुसार भारतीय समाजात सुधारणा आणि पुनर्रचना यांची प्रक्रिया सुरू झालेली असली असली आणि समाजकल्याणाचे कार्यक्रम अमलात आलेले असले, तरी सुदैवाने राष्ट्राचे जीवन ज्या आवश्यक श्रमांच्या धाग्यांवर अवलंबून असते ते धागे कौटुंबिक परंपरेमुळे अतूट राहिलेले आहेत. बहुतेक मुले अजूनही आपल्या आईवडिलांना कामात मदत करीत असतात; आणि त्यामुळे शाळेत न जाताही आपल्या कुटुंबाचा व्यवसाय चांगल्या रीतीने आत्मसात करतात. शेतकरी, सुतार, चर्मकार, भंगी, लोहार, विणकर, दुकानदार, बैलगाडी चालविणारा– असे कोट्यावधी लोक परंपरागत जीवन व्यतीत करीत असतात. बाहेर काही घडत आहे याची त्यांना कल्पनाच नसते. मोठ्या लोकांच्या आकांक्षांचा आणि विचारप्रणालींचा त्यांना स्पर्शच झालेला नसतो. आपण हवेत किल्ले बांधले तरी आपले काहीच बिघडत नाही. कारण आपण ज्या घरात राहतो त्याची काळजी अशिक्षित लोक घेत असतात. आपण वरती काय करीत आहोत याची त्यांना जाणीवच नसते. अन्न धान्य पिकविले जात असते; कापड विणले जाते; मेंढ्या पाळल्या जातात; गायींना चरायला नेले जाते; पादत्राणे शिवण्यात येतात; शौचकूप स्वच्छ केले जातात; बैलगाड्यांची चाके आणि नांगर बनविले जातात; दुरुस्त केले जातात; याचे श्रेय त्या त्या जातींना आहे; त्यांची मुले आपोआप आपापला व्यवसाय आत्मसात करीत असतात.

अशा परिस्थितीत प्राथमिक शाळांमध्ये आपण जी योजना अमलात आणू पहात आहोत तिला कोणीही शहाणा माणूस विरोध करणार नाही. जी मुले आपापल्या घरी कौटुंबिक व्यवसाय शिकत आहेत, त्यांच्यावर शाळेत येण्याची आपण सक्ती करू शकतो काय ? या मुलांना आपल्या कुटुंबाचा व्यवसाय शिकण्याची लहानपणी संधी मिळाली नाही तर पुढील जीवनात ते त्या व्यवसायापासून दूर जातील. म्हणून व्यावसायिक शिक्षण घेत असलेल्या मुलांना शाळेत येण्यासंबंधी सक्ती करण्याची कल्पना मला योग्य वाटत नाही. अर्थात माझी ही



भीती निरर्थक आहे. कारण आपण प्रयत्नांची कितीही पराकाष्ठा केली तरी बरीच मुले शाळेपासून दूर राहतील आणि घरीच पारंपरिक व्यावसायिक शिक्षण घेण्याची प्रथा तशीच अबाधित राहील. मुलांनी आपापल्या घरी पारंपरिक व्यावसायिक शिक्षण घेण्याची पद्धत चालू ठेवून त्यांच्यात शिक्षणप्रसार कसा करता येईल ? मी नेमस्त स्वभावाचा माणूस आहे. कोणत्याही चांगल्या तडजोडींना मी नेहमी तयार असतो. म्हणून प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले पाहिजे असा आग्रह धरणाऱ्यांना मी असे सुचवीन की आठवड्यातील तीन दिवस शालेय शिक्षण देण्यावर आपण समाधान मानले पाहिजे. या तीन दिवसात मुलांना जे काही शिकवायचे असेल ते शिकवा; परंतु उरलेले चार दिवस मुलांना त्यांच्या आईवडिलांबरोबर काम करू द्या. आणि मग बघा काय होते ते. अशा पद्धतीत चूक होण्याची शक्यता फार कमी आहे. कोणत्याही परिस्थितीत आपण मुलांना घरापासून दूर करता कामा नये. ज्या कुटुंबामध्ये कोणताही पारंपरिक व्यवसाय नसतो किंवा जे कुटुंबप्रमुख परोपजीवी जीवन जगून, सरकारी नोकरी करून किंवा वेगवेगळे जुगार खेळून उदरनिर्वाह करीत असतात, अशा कुटुंबांतील मुलांनी ते चार दिवस आपल्या मर्जीप्रमाणे व्यतीत करावेत. इतर कुटुंबांतील मुलांनी आठवड्यातून चार दिवस आपल्या आईवडिलांसमवेत काम केले आणि तीन दिवस ती मुले शाळेत आली तरी ते पुरे आहे असे मी म्हणेन.

यामुळे शाळांना आणि शिक्षकांना एका आठवड्यामध्ये मुलांच्या दोन तुकड्यांना शिकविता येईल आणि सातवा दिवस त्यांना विश्रांतीसाठी वापरता येईल.

या प्रकारच्या व्यवस्थेमुळे प्राथमिक शिक्षणावरील आर्थिक ताण बराच कमी होईल आणि शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या मेंदूला दडपण जाणवणार नाही. तीन दिवसांमध्ये जे काही शिकविले जाईल ते आत्मसात करण्यासाठी उर्वरित चार दिवसांमध्ये मुलांना वेळ मिळेल.

एका दिवसाचे दोन भाग करण्याचा पर्याय मला मान्य नाही. शाळा असो वा घरकाम असो, ते सकाळी आणि दुपारी अशा दोन्ही वेळेला झाले पाहिजे. शेतकऱ्यांच्या मुलामुलींनी तीन दिवस पूर्ण वेळ शाळेत गेले पाहिजे. म्हणजेच त्यांना शालेय शिक्षणाचा खराखुरा लाभ होईल. त्याचप्रमाणे इतर चार दिवस त्यांनी पूर्णपणे आपल्या आईवडिलांसमवेत आणि गुराढोरांबरोबर शेतात किंवा घरकामात व्यतीत केले पाहिजेत. शालेय शिक्षण आणि घरकाम या दोहोंसाठी सकाळ किंवा दुपार असे विभाजन होऊच शकत नाही.[१०]

---

१०. सी. राजगोपालाचारी यांनी मुंबईतील भारतीय विद्याभवनमध्ये ८ ऑगस्ट १९४९ रोजी केलेल्या भाषणातील उतारा.

या प्रयोगात काही चांगल्या गोष्टी असल्या तरी त्या लोकांना पसंत पडल्या नाहीत. नागरी भागातील नि उच्च वर्गातील मुलांसाठी एक शिक्षणपद्धती आणि ग्रामीण भागातील नि गरीब कुटुंबांतील मुलांसाठी दुसरी शिक्षणपद्धती हा या प्रयोगात मोठा दोष होता. शिवाय त्यात जातीनिहाय आणि पारंपरिक व्यवसायांवर गैरवाजवी भर देण्यात आला होता. म्हणून या प्रयोगाविरुद्ध बरेच जोरदार आंदोलन झाले आणि त्यामुळे हा प्रयोग सोडून द्यावा लागला.

## एक तासाच्या शाळा

या प्रयोगामध्ये गुंतलेल्या दोन प्रमुख प्रश्नांची सोडवणूक कशी करायची याचा मूलोद्योग शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांनी विचार करणे भाग होते. मूलोद्योग शिक्षण आशयामध्ये क्रांतिकारक बदल करणार असले तरी पारंपरिक शिक्षण-पद्धतीच्या चौकटीतच हे शिक्षण राबवावे लागणार आहे, हे या पुरस्कर्त्यांना कळून आले. एकाच इयत्तेमध्ये प्रवेश, वार्षिक बढती आणि पूर्णवेळेच्या शाळांमध्ये पूर्णवेळेच्या शिक्षकांकडून अध्यापन हे पारंपरिक औपचारिक पद्धतीचे विशेष होत. ही औपचारिक पद्धती मान्य केल्यामुळे मूलोद्योग शिक्षणाच्या दृष्टीने अनेक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे हे शिक्षण अनौपचारिक पद्धतीने कसे द्यायचे यासंबंधीचे मार्ग शोधून काढणे अपरिहार्य झाले, हा एक प्रश्न होता. दुसरा प्रश्न असा होता की जोपर्यंत मूलोद्योग शिक्षणावरील खर्च कमी करता येत नाही तोपर्यंत ते गरीब मुलांपर्यंत पोहोचविणे अशक्य ठरणार होते. म्हणून मूलोद्योग शिक्षण अनौपचारिक पद्धतीने आणि अत्यंत कमी खर्चात दिले पाहिजे, असे आचार्य विनोबाजी यांनी सुचविले होते. त्या दृष्टीनेच त्यांनी एक तासाच्या शाळांची कल्पना पुढे मांडली. त्यांच्याच शब्दात सांगायचे तर :

पाच-एक वर्षाच्या मुलांसाठी सध्या ज्या शाळा चालविल्या जात आहेत तेथे बराचसा वेळ वाया घालविण्यात येतो. मुलांना जर खरोखरच सतत पाच तास लिहावे आणि वाचावे लागत असेल तर त्यांच्यावर खूपच ताण पडत असला पाहिजे. वस्तुस्थिती अशी आहे की गरीब मुले शाळेत जाऊच शकत नाहीत आणि त्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाचा प्रत्यक्ष काहीच उपयोग होत नाही.

म्हणून आपण एक तासाच्या शाळा सुरू केल्या पाहिजेत, असे मला सुचवायचे आहे. या शाळा साधारणतः सकाळी सूर्योदयाच्या वेळी भरवाव्यात. त्यामुळे दिवसभर काम करायला मुले मोकळी राहतील. तसेच खेडेगावातील प्रत्येक मुलाला, गरीबातील गरीब मुलाला देखील शाळेत जाणे शक्य होईल. या एका तासामध्ये मुलांना लिहायला, वाचायला शिकवावे.



प्रौढांसाठी संध्याकाळी एक तासाचा वर्ग असावा. त्याला 'श्रवणवर्ग' म्हणता येईल. कारण तेथे वाचणे आणि लिहिणे शिकविले जाणार नाही. रामायण, भागवतासारख्या ग्रंथातील काही भाग प्रौढांना वाचून दाखविण्यात यावेत. संतांच्या कथा आणि वचने सांगावीत; खेडेगावातील प्रश्नांसंबंधी चर्चा व्हावी. शेतीसंबंधी नव्या कल्पना सांगाव्यात; गाणी आणि भजने म्हटली जावीत. प्रत्यक्ष जीवनामध्ये ज्या ज्या ज्ञानाची गरज लागते ते सर्व या वर्गामध्ये दिले जावे. शिकण्यासाठी सर्व मुलांनी सकाळच्या वर्गांना जावे आणि सर्वसाधारण स्वरूपाचे ज्ञान संपादन करण्याकरिता संध्याकाळच्या वर्गांना हजर रहावे. सकाळच्या व संध्याकाळच्या वर्गांना सुट्टीची काहीच आवश्यकता जाणवणार नाही. आपल्या नेहमीच्या शाळांना वर्षातून जवळजवळ सहा महिने सुट्टी असते. याचा अर्थ असा की प्रत्यक्षात त्या दररोज अडीच तास भरत असतात. आपल्या एक तासाच्या शाळांमध्ये जे शिकविले जाईल ते विसरून जाण्याचे कारण पडणार नाही. शरीर धष्टपुष्ट आणि स्वच्छ ठेवण्यासाठी ज्याप्रमाणे दररोज आहार आणि स्नान यांची गरज असते, त्याप्रमाणे बौद्धिक आहाराला सुट्टी देणे हे मनालाही आवडत नाही. आपण दररोज जेवतो. तरीही जेवणाला सुट्टी द्यावी असे वाटत नाही. तसेच याचेही आहे. पाच तास चालणाऱ्या शाळांची गोष्ट वेगळी आहे. या प्रकारच्या एक तासाच्या शाळा भारतात सर्वत्र एक वर्षाच्या आत आणि त्याही अत्यंत अल्प खर्चामध्ये सुरू करणे शक्य आहे.

या एक तासाच्या शाळांमधील शिक्षक दिवसभर आपले नित्याचे काम करणार असल्यामुळे त्यांना मोठ्या पगाराची गरज जाणवणार नाही. या शिक्षकांच्या दररोजच्या एक तासाच्या सेवेच्या बदल्यामध्ये गावकरी आपल्या शेतातील धान्याचा काही भाग देऊ शकतील. या शाळा चालवायला जवळजवळ काहीच खर्च येणार नाही. त्या शाळांमधील शिक्षण शेतीशी, ग्रामीण जीवनाशी निगडीत असेल. प्रत्येक घरात दररोज स्वयंपाक आणि भोजन होतच असते. तेच या शाळांमधील माध्यम राहील. या संदर्भामध्ये पोषक आहाराची काही तत्त्वे शिकविता येतील. आपले खेडेगाव स्वच्छ ठेवणे हे या शाळांमधील ज्ञानाचे मूलभूत साधन आहे. वस्तीत एखाद्या रोगाची साथ आली तर त्यावेळी साथ का येते आणि ती टाळता कशी येईल यासंबंधी गावकऱ्यांना समजावून सांगता येईल. खेडेगावातील मृत्यू हाही ज्ञानाचे साधन होऊ शकतो. जेव्हा अतिवृष्टीमुळे पिकाची नासाडी होते, तेव्हा त्यापासूनही शिकता येईल. सर्व सणवार आणि विवाहसमारंभ यांमधूनही ज्ञान देता येण्यासारखे आहे. पिसाळलेली कुत्री चावतात तेव्हाही असेच करता येईल. घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीपासून काही तरी शिकता येतेच.

दिवसातून एक तास वर्ग घेऊन हे सारे शिकवता येणे अशक्य आहे, अशी

कल्पना करून घेऊ नका. सकाळच्या वाचनवर्गातून आणि संध्याकाळच्या श्रवण-वर्गातून बरेच काही शिकविता येण्यासारखे आहे, हे मी माझ्या अनुभवावरुन सांगत आहे. मी काही मुलांना दररोज एक तास याप्रमाणे काही वर्षे शिकवत होतो. तेवढ्या अवधीत ती मुले खूप शिकली आणि ती आता चांगले नागरिक झालेली आहेत. प्रौढांसाठी संध्याकाळी चालविण्यात येणाऱ्या श्रवणवर्गांना हजर राहण्यापासून मुलांना प्रतिबंध केला जाऊ नये. त्यामुळे त्यांना दोन्ही वर्गांचा लाभ घेता घेता येईल. सकाळी ते वाचायला शिकतील आणि संध्याकाळी चर्चा ऐकतील. म्हणजे दिवसातून दोन तास ते वाचत असतील, किंवा ऐकत राहतील. जर ग्रामपंचायतींनी काही ग्रामोद्योग चांगल्या रीतीने चालविले तर मुले दिवसभर त्यापासून शिकू शकतील आणि ती दिवसभर या ना त्या कामात मग्नही राहतील. असे ग्रामोद्योग सुरू करणे शाळांचे काम नव्हे; ते काम ग्रामपंचायतीनीच केले पाहिजे. ग्रामोद्योग सुरू करण्याचा खर्च ग्रामपंचायतींनी सोसला पाहिजे. त्यायोगे शाळांना खर्च करावा न लागता ही मुले चांगली कारागीर होऊ शकतील.

सकाळी मन ताजे असते. त्यामुळे त्यावेळी जे शिकविले जाईल ते मुले ग्रहण करू शकतील. संध्याकाळी भागवतादी ग्रंथातील गोष्टी ऐकताना किंवा भजने म्हणताना त्यांचे मनोरंजन होईल. दमणूक न होता मुले शिकू शकतील. संध्याकाळी गोष्टी सांगून झाल्यावर एखाद्या चांगल्या भजनाने या वर्गाची सांगता करता येईल. हे भजन गायिले जात असतानाच लोकांना त्याचा अर्थ समजावून सांगितला जावा. भजनाचे सूर आणि अर्थ मनात घोळवितच आबालवृद्ध घरोघरी परततील.[११]

आचार्य विनोबा यांनी हा एक प्रयोग सुचविला. असे अनेक प्रयोग सुचविता येतील. म्हणून हा प्रयोग की तो प्रयोग असा प्रश्न नसून मूलोद्योग शिक्षणाला पूर्ण वेळेच्या औपचारिक शिक्षणपद्धतीमध्ये बंदिस्त करणे चुकीचे आहे, हे ध्यानात घेतले पाहिजे. देशाची सध्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता मूलोद्योग शिक्षणावरील खर्च कमी व्हायला हवा आणि त्यासाठी ते अनौपचारिक पद्धतीने दिले जावे, हे या संबंधात महत्त्वाचे आहे.

शिक्षण आयोगाने ( १९६४-६६ ) पूर्वीचे सर्व विचार आणि प्रयोग ध्यानात घेऊन प्राथमिक शिक्षणाचा नवा नमुना सुचविला. त्याची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

**१. परिसर शाळा :** समाजातील भिन्न वर्गांना आणि गटांना एकत्र आणून समताधिष्ठित आणि एकात्म समाज निर्माण करणे हे चांगल्या शिक्षणपद्धतीचे

११. विनोबा, **शिक्षणविषयक विचार**, सर्वसेवा संघ, वाराणशी १९६४, पृष्ठ २३०-३२



उद्दिष्ट असले पाहिजे असे शिक्षण आयोगाने म्हटले आहे.

सध्याच्या शिक्षणपद्धतीने हे उद्दिष्ट साध्य करण्याऐवजी, वरिष्ठवर्गीय आणि जनता यांच्यात एक भिंतच उभी केलेली आहे. कारण खाजगी मालकीच्या, शुल्क आकारणाऱ्या चांगल्या शाळांचा लहानसा गट वरिष्ठ वर्गीयांची गरज भागवतो; तर बहुसंख्य गरीब कुटुंबांतील मुलांना मोफत शिक्षण देणाऱ्या, सार्वजनिक निधीतून चालविल्या जाणाऱ्या, निकृष्ट दर्जाच्या शाळांमध्येच प्रवेश मिळतो. त्याहूनही वाईट गोष्ट ही आहे की ही विभागणी वाढत चालली असून वरिष्ठ वर्गीय आणि जनता यांच्यातील दरी दिवसेंदिवस अधिकच रुंदावत आहे. म्हणून हा सामाजिक दुरावा नाहीसा करण्यासाठी शिक्षण आयोगाने असे सुचविले की प्राथमिक शिक्षणामध्ये परिसर शाळांची संकल्पना स्वीकारण्यात यावी. सुरुवातीला कनिष्ठ प्राथमिक शिक्षणामध्ये या संकल्पनेचा अंगिकार करून नंतर तिचा उच्च प्राथमिक शिक्षणातही अवलंब केला जावा, असे शिक्षण आयोगाने म्हटले आहे. एका विशिष्ट परिसरातील सर्व मुलांनी तेथील एकाच प्राथमिक शाळेमध्ये शिक्षण घेतले पाहिजे, असा परिसर शाळा या संकल्पनेचा अर्थ आहे. जात, पंथ, धर्म, आर्थिक परिस्थिती किंवा सामाजिक दर्जा अशा कोणत्याही भेदभावाला या संकल्पनेमध्ये स्थान नाही. शिक्षण आयोगाचे म्हणणे असे आहे की परिसर शाळांची संकल्पना स्वीकारल्यामुळे सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मता तर दृढ होत जाईलच; शिवाय आणखीही दोन लाभ होतील : ( १ ) सर्वसामान्य लोकांबरोबर जीवन व्यतीत करणे हा चांगल्या शिक्षणाचा आवश्यक घटक असल्यामुळे, परिसर शाळांमधील मुलांना चांगले शिक्षण मिळेल; आणि ( २ ) समाजातील श्रीमंत, उच्चभ्रू आणि वर्चस्वसंपन्न वर्गांना सर्वसामान्य शिक्षणपद्धतीमध्ये रस घेणे भाग पडेल आणि त्यामुळे तिच्यात लवकर सुधारणा घडून येईल. वरिष्ठ वर्ग आणि समाज यांच्यासाठी वेगवेगळी शिक्षणपद्धती चालू ठेवणारी अनिष्ट प्रथा नाहीशी करणारी शिक्षण आयोगाची ही सूचना या विषयावरील विचारमंथनाच्या दृष्टीने खरोखरच अत्यंत महत्त्वाची होती.

**२. आशय :** प्राथमिक शिक्षणातील आशयाबाबत, शिक्षण आयोगाने स्थूलमानाने मूलोद्योग शिक्षणाची आणि शिक्षण उत्पादकतेशी निगडीत करण्याची योजना स्वीकारली. मात्र आयोगाने त्या योजनेत एक महत्त्वाची सुधारणा केली. व्यावसायिक शिक्षणावर भर देण्याऐवजी शालेय अभ्यासक्रमात कार्यानुभवाचा अंतर्भाव करावा, असे शिक्षण आयोगाने सुचविले. विज्ञान आणि तंत्रशास्त्र यांवर आधारलेल्या समाजोपयोगी उत्पादक कामामध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे हे कार्यानुभवामध्ये अभिप्रेत आहे. असे करण्याने प्रत्येक विद्यार्थ्यावरील खर्च कमी होण्याऐवजी वाढेल याची शिक्षण आयोगाला जाणीव होती. परंतु ही वाढ

व खर्च करणे आवश्यक आहे आणि त्याचे चांगले परिणाम निश्चित दिसून येतील असे आयोगाचे मत होते.

३. **अनेक इयत्तांमध्ये प्रवेश आणि अंशकालिक शिक्षण :** विद्यार्थ्यांना कोणत्याही इयत्तेमध्ये प्रवेश घेण्याची मुभा असली पाहिजे ही संकल्पनाही शिक्षण आयोगाने मांडली. तसेच अंशकालिक अभ्यासक्रम आणि स्वाध्याय यांच्या मार्फत अनौपचारिक शिक्षणाचा प्रसार केला पाहिजे, यावरही आयोगाने भर दिला होता. त्या दृष्टीने आयोगाने दोन अत्यंत महत्त्वपूर्ण कार्यक्रम सुचविले :

(अ) ११–१४ वयोगटातील जी मुले शाळेत जात नाहीत आणि ज्यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले नाही किंवा केवळ कार्योपयोगी साक्षरताच संपादन केलेली आहे अशा सर्व मुलांनी त्यांच्यासाठी सुरू करण्यात येणाऱ्या विशेष वर्गांमध्ये शिक्षण घेतले पाहिजे. हे वर्ग अंशकालिक असावेत आणि त्यांमध्ये मुलांनी किमान एक वर्षभर तरी दाखल व्हायला हवे. आयोगाने म्हटले आहे :

७.२९ या वयोगटातील मुलांपासून आपण प्रारंभ केला आणि त्यांना अंशकालिक शिक्षण (आठवड्यातून तीन दिवस दररोज दीड ते दोन तास याप्रमाणे) दिले तर वर्षभरामध्ये त्यांना कार्योपयोगी साक्षर करता येईल, असे देशातील काही संस्थांनी केलेल्या प्रयोगांवरून दिसून आलेले आहे. नेहमीचे शाळेचे तास वगळता इतर वेळामध्ये असे वर्ग चालविणे प्राथमिक शिक्षकांना सहज शक्य होईल. या वर्गांसाठी त्यांनी आपल्या शाळेची इमारत आणि उपकरणे वापरावीत. स्थानिक परिस्थिती आणि या वर्गांना येणाऱ्या मुलांच्या गरजा ध्यानात घेऊन या वर्गांची वेळ ठरवावी लागेल. याचा अर्थ असा की या मुलांना आपल्या कुटुंबासाठी जे काम करावे लागते त्यात व्यत्यय न येता हे शिक्षण घेता यावे. सामान्यतः हे वर्ग सकाळी किंवा संध्याकाळी दर दिवशी दीडतास चालवावेत. मुलींना दुपारची वेळ सोयीची वाटेल. हे विशेष वर्ग घेणाऱ्या शिक्षकांना पुरेसे मानधन दिले जावे. या वर्गांसाठी वेगळ्या अभ्यासक्रमाची गरज नाही. परंतु या वर्गांचा आकार लहान असावा. कारण त्यायोगे शिक्षकांना प्रत्येक मुलाकडे लक्ष देता येऊन विशिष्ट कालावधीत मुलांना कार्योपयोगी साक्षर करता येईल. हे वर्ग चालविण्यासाठी फारसा खर्च येणार नाही. साधारणतः दर मुलामागे वर्षाला चाळीस रुपयांपेक्षा अधिक खर्च करावा लागणार नाही. परंतु या वर्गांमुळे खूपच फायदा दिसून येईल.

७.३० हा कार्यक्रम अयशस्वी होईल असा संदेह बाळगण्याचे काहीच कारण नाही आणि म्हणून तो लगेच राष्ट्रीय पातळीवर संघटित घेतला जावा. तशीच आवश्यकता वाटली तर, ही योजना राष्ट्रव्यापी पातळीवर सुरू करण्यापूर्वी थोडासा अनुभव मिळावा म्हणून प्रत्येक जिल्ह्यामध्ये अल्प कालावधीचे काही



प्रायोगिक प्रकल्प सुरू करायला प्रत्यवाय नाही. सुरुवातीला या वर्गांमधील प्रवेश ऐच्छिक ठेवणे श्रेयस्कर होईल. स्थानिक समाजाला ही कल्पना माहीत झाल्यावर आणि त्याला या कल्पनेचे मोल कळून आल्यावर विद्यार्थ्यांवर प्रवेशाची सक्ती केली जावी.

७.३१ या प्रश्नाची एकूण व्याप्ती मर्यादित आहे आणि ती हळुहळू कमी होत जाणार आहे हे लक्षात घ्यायला हवे. सध्या ११ ते १३ वयोगटातील मुलांची संख्या तीन कोटी चाळीस लाख आहे. त्यापैकी एक कोटी दहा लाख मुले पाचवी ते आठवी वर्गात शिक्षण घेत आहेत. याशिवाय तीस लाख मुले सध्या शाळेत जात नसली तरी त्यांनी प्राथमिक शिक्षण पुरे केलेले असावे असा अंदाज आहे. त्यामुळे १९६६ मध्ये ११ ते १३ वयोगटातील दोन कोटी मुलांसाठी सक्तीच्या शिक्षणाची व्यवस्था करावी लागेल. येत्या दहा वर्षात आणखी दोन गोष्टी घडून येण्याचा संभव आहे. एक ही की लोकसंख्यावाढीच्या प्रमाणापेक्षा पाचवी ते सातवीपर्यंतच्या वर्गांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांचे प्रमाण वाढणार आहे. पाच वर्षांचे प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या जसजशी वाढत जाईल त्या प्रमाणामध्ये कार्योपयोगी साक्षरता प्राप्त करण्यापूर्वी शाळा सोडणाऱ्या मुलांची संख्या दरवर्षी कमी होत जाईल आणि १९७६ पर्यंत ही पूर्णपणे नाहीशी झालेली असेल, (कारण तोपर्यंत ६-११ वयोगटातील मुलांचे शिक्षण सार्वत्रिक झालेले असेल) ही दुसरी गोष्ट आहे.[१२]

(ब) आर्थिक कारणांमुळे जो अपव्यय होतो तो टाळण्यासाठी ज्यांनी निम्न प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले आहे आणि आणखी शिकायची ज्यांना इच्छा आहे, परंतु पूर्णवेळेच्या शाळेत जाणे शक्य नाही अशा सर्व मुलांसाठी अंशकालिक शिक्षण देण्याची सोय उपलब्ध व्हायला हवी. आयोगाने म्हटले आहे :

१. सध्यादेखील अशा मुलांची संख्या खूप मोठी आहे. आणि समाजातील गरीब वर्गामध्ये जसजसा शिक्षणप्रसार होत जाईल तसतशी ही संख्या वाढत जाणार आहे. या मुलांना अंशकालिक शिक्षण देण्याची सोय करणे एवढा एकच मार्ग उपलब्ध आहे. म्हणून अंशकालिक शिक्षणाचा व्यापक प्रसार करणे हे शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे.

२. अंशकालिक शिक्षणाचा आशय ते शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा आणि आवडीनिवडी विचारात घेऊनच ठरविला पाहिजे. ज्या मुलांना हे शिक्षण पूर्ण करून पुढील शिक्षण घेण्याची इच्छा आहे त्यांच्यासाठी तयार करायचा अभ्यासक्रम पूर्णवेळेच्या अभ्यासक्रमासारखाच राहील. परंतु ज्यांची पुढील शिक्षण

---

१२. अहवाल, पृष्ठ १८०–२

यायची इच्छा नाही, आणि अशांचीच संख्या बरीच असेल, त्यांच्या शिक्षणामध्ये व्यावसायिक कौशल्यप्राप्तीचा भाग अधिक राहील. त्या मुलांच्या तात्कालिक गरजा भागविण्याचा तातडीने प्रयत्न करायला हवा.

३. सुरुवातीला या वर्गांमधील हजेरी ऐच्छिक ठेवावी; परंतु विद्यार्थी या वर्गाकडे आकृष्ट होताच, दैनंदिन हजेरी सक्तीची केली जावी. काही विभागांत तसे ताबडतोब करता येईल, तर पाचव्या आणि सहाव्या योजनेमध्ये देशाच्या सर्व विभागात ही पद्धत अमलात यावी.

४. अंशकालिक शिक्षणामध्ये किती विद्यार्थी सहभागी होतील याचा निश्चित अंदाज करणे आज तरी शक्य नाही. म्हणून असे धोरण अवलंबिले जावे की ज्या मुलांना पूर्ण वेळेचे शिक्षण घेणे शक्य होणार नाही त्यांना अंशकालिक शिक्षण उपलब्ध व्हायला हवे. पूर्ण वेळेचे आणि अंशकालिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण आर्थिक परिस्थितीनुसार, प्रत्येक विभागानुसार आणि एकाच विभागातील वेगवेगळ्या सामाजिक वर्गानुसार भिन्न राहील. आर्थिक तरतूद करण्याच्या दृष्टीने असे अनुमान करता येईल की प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या एकूण मुलांपैकी १९७५-७६ मध्ये १० टक्के मुले अंशकालिक शिक्षण घेतील आणि त्यांचे प्रमाण १९८५-८६ मध्ये २० टक्के होईल.[१३]

४. **अर्थकारण** : या कार्यक्रमावर कमीत कमी खर्च व्हावा या दृष्टीने शिक्षण आयोगाने अनेक सूचना केल्या होत्या. तरीदेखील सर्व मुलांना सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण द्यायचे असेल तर बराच पैसा लागेल, हे आयोगाला आढळून आले. या संदर्भात आयोगाचे म्हणणे असे होते की, १९६६ ते १९८६ या वीस वर्षांमध्ये दरमाणशी राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट होईल. (एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा वार्षिक वाढीचा दर ६ टक्के राहील, या अनुमानावर हा अंदाज आधारलेला आहे.) १९६६ मध्ये शिक्षणावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३ टक्के रक्कम खर्च केली जाते, तर १९८६ मध्ये हे प्रमाण ६ टक्के होईल आणि शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चापैकी एकतृतीयांश रकम प्राथमिक शिक्षणासाठी राखून ठेवण्यात येईल. याचा अर्थ असा की १९६६ मध्ये सर्व शिक्षणावर होणारा खर्च दरमाणशी १२ रुपये आहे, तर १९८६ मध्ये केवळ सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणावर दरमाणशी खर्च १८ रुपये ( १९६६ च्या किंमतीनुसार ) केला जाईल.

शिक्षण आयोगाच्या या शिफारशी अजूनही अमलात आलेल्या नाहीत. परिसर शाळेची कल्पना तर जवळजवळ पूर्णपणे अलक्षितच राहिली आहे. कार्यानुभवाबाबतची शिफारस तत्त्वतः स्वीकारण्यात आली असली तरी तिची अमलबजावणी मुळीच समाधानकारक नाही. परिसर शाळेची कल्पना असो कार्यानुभवाची असो, सत्ताधारी वर्गाच्या मानसिक आणि सामाजिक विरोधामुळे या दोन्ही कल्पना केवळ कागदावरच राहिल्या. मूलोद्योगाबाबत नेमके हेच घडले होते. विद्यमान प्राथमिक शिक्षणपद्धतीमध्ये अनेक इयत्तांमध्ये प्रवेश आणि अंशकालिक शिक्षण या सुधारणा करण्याची शिफारस तत्त्वतः मान्य करण्यात आलेली असून पाचव्या योजनेमध्ये ती अमलात आणण्याचे ठरले आहे. परंतु या सुधारणांचे महत्त्व तळपातळीवरील कार्यकर्त्यांना जाणवल्याचे दिसून येत नाही आणि म्हणून लोक, प्राथमिक शिक्षक, पर्यवेक्षक, अधिकारी आणि शिक्षक-प्रशिक्षक यांना या सुधारणांचे महत्त्व पटवून देण्यासाठी बराच प्रयत्न करावा लागेल. तसे झाले तरच या सुधारणांना प्राथमिक शिक्षणपद्धतीमध्ये स्थान मिळून त्यांची अमलबजावणी करणे सुकर ठरेल.

१३. **अहवाल**, पृष्ठ २८१–२



## सर्वसाधारण निष्कर्ष

गेल्या साठ वर्षांमधील शिक्षणाच्या पर्यायी नमुन्यांबाबत आणि ते अमलात आणण्याच्या प्रयत्नांबाबत आतापर्यंत जे विवेचन करण्यात आले त्यावरून कोणते स्थूल निष्कर्ष निघतात ?

(१) सार्वत्रिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर प्राथमिक शिक्षणाचा पारंपरिक नमुना आमूलाग्र बदलला पाहिजे, याबद्दल सर्वसाधारण एकमत आहे.

(२) वरिष्ठ वर्गीय आणि सर्वसामान्य जनता या दोघांच्याही गरजा भागविणारी साऱ्या देशामध्ये एकच शिक्षणपद्धती असावी हा या सुधारणेमागचा मूलभूत हेतू आहे. कारण अशी शिक्षणपद्धतीच सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मता बळकट करून समताधिष्ठित आणि एकसंध समाज निर्माण करू शकेल. त्यासाठी परिसर शाळेची संकल्पना स्वीकारायलाच हवी. तसेच कार्यानुभवाचा अंतर्भाव करून अभ्यासक्रमामध्ये मूलभूत परिवर्तन घडवून आणले पाहिजे. अनेक इयत्तांमध्ये प्रवेश घेण्याची मुभा आणि अंशकालिक अभ्यासक्रमांच्या आणि स्वाध्याय कार्यक्रमांच्या द्वारा अनौपचारिक शिक्षणाची व्यापक तरतूद या मार्गांनी प्रचलित शिक्षणपद्धतीमध्ये दीर्घकालीन परिणाम करणारे बदल घडवून आणणे शक्य आहे.

(३) प्राथमिक शिक्षणावर प्रत्येक विद्यार्थ्यामागे कराव्या लागणाऱ्या वार्षिक खर्चामध्ये कपात करण्याचा कसोशीने प्रयत्न व्हायला हवा. शिक्षक-विद्यार्थी प्रमाण वाढवून असे करणे शक्य आहे. अशा रीतीने कितीही काटकसर केली तरी सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम अमलात आणण्यासाठी बराच पैसा लागणार आहे, हे विसरून चालणार नाही. या कार्यक्रमावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या दोन टक्के रक्कम खर्च केली जावी असे शिक्षण आयोगाने म्हटले आहे. कारण

आपल्याला प्राथमिक शिक्षणासाठी जास्तीत जास्त तेवढाच खर्च करणे शक्य आहे. म्हणून आपण हा कार्यक्रम तेवढ्या रकमेमध्ये अमलात आणण्याचा प्रयत्न करायला हवा.

(४) प्राथमिक शिक्षणाची सध्याची पद्धती मुख्यतः नागरी भागातील वरिष्ठ आणि मध्यम वर्गीयांच्याच गरजा भागविते. कारण माध्यमिक आणि तदनंतरच्या उच्च शिक्षणाकडे जाण्याचा मार्ग म्हणूनच हे वर्ग प्राथमिक शिक्षणाकडे पहात असतात. जीवनात प्रवेश करायला हे शिक्षण उपयुक्त ठरावे, अशी या वर्गाची अपेक्षाच नसते. ही शिक्षणपद्धती कारकुनी किंवा तत्सम स्वरूपाची कामे करायला उपयुक्त ठरत असून त्यायोगे उच्चवर्गीयांची मिरास अबाधित राखते. कारण बहुसंख्य गरीब लोक या शिक्षणपद्धतीचा लाभ घेऊ शकत नाहीत किंवा त्यांची मुले अनुत्तीर्ण तरी होतात वा शाळा सोडून देतात. प्राथमिक शिक्षणाच्या पारंपरिक नमुन्यामुळे जो सामाजिक दुरावा निर्माण होतो आणि वाढत जातो तो थांबविण्यासाठी या नमुन्यामध्ये काही मूलभूत सुधारणा करण्याची गरज आहे. परिसर शाळेच्या संकल्पनेचा स्वीकार, शारीरिक श्रम आणि कार्यानुभव यांचा अभ्यासक्रमात अंतर्भाव, अनेक इयत्तांमध्ये प्रवेश देण्याची तरतूद आणि अंश-कालिक शिक्षणाचा व्यापक प्रसार इत्यादी मार्गांनी हे परिवर्तन घडवून आणता येणे शक्य आहे. परंतु या परिवर्तनामुळे सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधाना बाधा येणार असल्यामुळे त्या वर्गाकडून हे परिवर्तन घडवून आणण्यात सामाजिक आणि मानसिक विरोध केला जात आहे. या विरोधावर मात केल्याशिवाय कोणताहि मूलगामी कार्यक्रम यशस्वी होणे अशक्य आहे.



**प्रकरण तिसरे**

# कृति-कार्यक्रम

मागील प्रकरणामध्ये विशद करण्यात आलेली ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्रयोग आणि अनुभव विचारात घेऊन, प्राथमिक शिक्षणाची चांगली पद्धती विकसित करण्यासाठी आणि ६-१४ वयोगटातील सर्व मुलांचा समावेश होण्याइतकी ती व्यापक होण्यासाठी हाती घ्यावयाच्या कृति-कार्यक्रमाची रूपरेषा ठरविणे शक्य आहे. त्या संबंधीच्या योजनांचा तपशील या प्रकरणात निवेदन करण्यात आलेला आहे.

## राज्यघटनेतील ४५ वे कलम

१९५० मध्ये राज्यघटनेतील ४५ वे कलम मंजूर झाले तेथपासून आपण चर्चेला प्रारंभ करू या. त्यावेळी घटनाकारांसमोर, भारतातील युद्धोत्तर शैक्षणिक विकास (१९४४) ही सरकारी योजना होती. या योजनेमध्ये महात्मा गांधींची मूलोद्योग शिक्षणाची कल्पना स्वीकारण्यात आलेली होती आणि तिचा अंतर्भाव प्राथमिक शिक्षणाच्या पारंपरिक नमुन्यामध्ये करण्यात आलेला होता. ६-१४ वयोगटातील मुलांना सार्वत्रिक शिक्षण देण्याचा कार्यक्रम चाळीस वर्षांमध्ये पुरा व्हावा, असा या योजनेचा संकल्प होता आणि त्यासाठी दरवर्षी २०० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यात आलेला होता. (सर्व शिक्षणावर ३०० कोटी रुपये किंवा १९३७ मधील किमतीच्या आधारे दर माणशी ७ रुपये खर्च होईल असे गृहीत धरले गेले होते.) घटनाकारांपुढे श्री. गोखले आणि श्री. परुळेकर यांनी सुचविलेले पर्यायी नमुनेही होते. या सर्व प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी कै. श्री. बा. गं. खेर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती नेमण्यात आली. ६-१४ वयोगटातील मुलांना सार्वत्रिक शिक्षण देण्याची तरतूद १९६० पर्यंत पूर्ण व्हावी असे या समितीने सुचविले आणि राज्यघटनेच्या ४५ व्या कलमामध्ये ही शिफारस समाविष्ट करण्यात आली.

### अल्प अवधी

या निर्णयाचा एक महत्त्वाचा विशेष ध्यानात घेतला पाहिजे. हा कार्यक्रम चाळीस वर्षांमध्ये पुरा केला जावा अशी जोरदार सरकारी शिफारस असतानाही घटनाकारांनी त्यासाठी अवघा दहा वर्षांचाच (१९५० ते १९६०) अवधी ठरविला. चाळीस वर्षांचा प्रदीर्घ अवधी देण्यामागचा मुख्य विचार हा होता की एवढ्या लांब मुदतीमध्ये आर्थिक विकासाची पातळी उंचावणे शक्य होते (आणि त्यामुळे सरकार या कार्यक्रमासाठी अधिक पैसा उपलब्ध करू शकते) आणि लोकांची आर्थिक परिस्थितीही सुधारता येते (त्यामुळे ते पारंपरिक नमुन्याचा लाभ घेऊ शकतात). या उलट, असे कार्यक्रम लवकर अमलात आणले तर त्यांची यशस्वी कार्यवाही होते आणि त्यासाठी खर्चही बराच कमी होतो. हे म्हणणे अव्यवहार्य वाटले तरी खरे आहे. या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत जेवढा उशीर होत जातो तेवढी गुंतागुंत वाढत जाते (सामाजिक तणाव आणि काळानुसार अपरिहार्यपणे बदलत जाणारे अग्रक्रम यामुळे हे घडून येते). तसेच, (लोकसंख्येतील वाढीमुळे) या कार्यक्रमांची व्याप्तीही वाढत जाते आणि (भाववाढीमुळे) खर्चही वाढत जातो. म्हणून, घटनाकारांनी या कार्यक्रमासाठी दहा वर्षांचा अल्प अवधी ठरवून दिला. या कार्यक्रमाला ते सर्वोच्च प्राधान्य देत होते, हेही यावरून दिसून येते. कारण शिक्षण हा लोकशाहीचा आधार असतो आणि त्यामुळे हा कार्यक्रम कितीही खर्च झाला तरी शक्य तितक्या लवकर पुरा व्हावा, अशी त्यांची धारणा होती.

हा कार्यक्रम दहा वर्षात अंमलात आणण्याचा निर्णय मूलतः योग्य होता, हे मान्य केलेच पाहिजे. आपल्यापाशी निर्धार असता तर आपण तो तेवढ्या मुदतीत अमलात आणूही शकलो असतो. त्याची मुदत वाढविल्यामुळे परिस्थिती अधिकच वाईट होत गेली हे अगदी खरे आहे. उदाहरणार्थ, पहिली ते आठवीपर्यंतच्या वर्गांमध्ये शिकत असलेल्या मुलांची संख्या १९५० मध्ये दोन कोटी तेवीस लाख होती, आणि ६–१४ वयोगटातील मुलांना सार्वत्रिक शिक्षण देण्याचा कार्यक्रम १९६० पर्यंत पुरा झाला असता तर ही संख्या आठ कोटी छपन्न लाख झाली असती. याचा अर्थ असा की दहा वर्षांमध्ये आणखी सहा कोटी तेहेतीस लाख मुले शाळेत जाऊ लागली असती. हे असे घडून येणे मुळीच अशक्य नव्हते. परंतु तसा प्रयत्न करण्यात न आल्यामुळे, आता परिस्थिती अधिकच वाईट झालेली आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या १९७३–७४ मध्ये सात कोटी अठ्ठ्याऐंशी लाख होती. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण सुरू करण्यासाठी १९६०–६१ मध्ये जवळजवळ एवढीच संख्या आवश्यक होती. आपण अजूनही आपल्या उद्दिष्टापासून बरेच दूर आहोत आणि १९८६ पर्यंत हा कार्यक्रम पुरा करायचे



ठरविले तरी देखील आपल्याला चौदा कोटी दहा लाख मुले शाळेत दाखल करावी लागतील. म्हणजे अजून आणखी सहा कोटी वीस लाख मुलांना शाळेमध्ये आणावयाचे आहे. शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्या १९५० मध्ये जवळजवळ एवढीच होती. १९५० ते १९६० या दहा वर्षात हा कार्यक्रम अमलात आला असता तर जेवढा खर्च झाला असता त्याच्यापेक्षा किती तरी अधिक खर्च भाववाढीमुळे आता करावा लागणार आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या काही वर्षांमध्ये लोकांमध्ये जो उत्साह होता तो आता राहिलेला नसल्यामुळे हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा आणि अवघड झालेला आहे. असे असले तरी सुधारित कार्यक्रम आखणे आजही बरेच सुकर जाणार आहे. शिवाय, काही लोक सुचवितात त्याप्रमाणे या कार्यक्रमाचा कालावधी वीस वर्षे किंवा त्याहूनही अधिक वाढविण्याऐवजी दहा वर्षांच्या अल्प अवधीत हे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करणे आपल्याला जमू शकेल. म्हणून, राज्यघटनेच्या ४५ व्या कलमात नमूद केलेला सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम, शिक्षण आयोगाने सुचविल्याप्रमाणे, निश्चितपणे दहा वर्षात किंवा उशीरात उशीरा १९८६ पर्यंत पूर्ण करणे अत्यंत लाभदायक ठरणार आहे.

### पारंपरिक नमुन्यामध्ये रचनात्मक बदल

६–१४ वयोगटाला सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण देण्याचा कार्यक्रम येत्या दहा वर्षांमध्ये अमलात आणायचा असेल तर पारंपरिक नमुन्यामध्ये अत्यावश्यक मूलगामी परिवर्तन विनाविलंब घडवून आणले पाहिजे. प्राथमिक शिक्षणाच्या विकासाचा पारंपरिक नमुना मुख्यतः आर्थिकदृष्ट्या संपन्न वर्गासाठीच तयार करण्यात आला होता. कारण या वर्गाला शिक्षणाचे महत्त्व कळत होते आणि पूर्णवेळेच्या शाळांमध्ये आपल्या मुलांना धाडण्याची या वर्गापाशी ऐपत होती. त्यामुळे या नमुन्यानुसार मिळणारे शिक्षण साहजिकच वरिष्ठ वर्गाच्या गरजांशी सुसंगत होते; जनसामान्यांच्या शिक्षणाला हा नमुना प्रतिकूल ठरत होता. हा एक अत्यंत मूलभूत प्रश्न असून सहसा त्याच्याकडे लक्ष दिले जात नाही. म्हणून त्यासंबंधी येथे स्पष्टीकरण केले पाहिजे.

सध्या प्राथमिक शाळांमध्ये एकाच इयत्तेमध्ये प्रवेश दिला जातो, दरवर्षी विद्यार्थी वरच्या वर्गात जातो आणि या पूर्णवेळेच्या शाळांमध्ये पूर्णवेळ काम करणारे व्यावसायिक शिक्षक शिकवित असतात. प्राथमिक शाळांच्या या प्रत्येक विशेषाचा तपशीलवार विचार करायला हवा.

**(१) एकाच इयत्तेमध्ये प्रवेश** : सामान्यतः मुलाने वयाच्या सहाव्या वर्षी (किंवा काही राज्यांमध्ये पाचव्या वर्षी देखील) पहिल्या इयत्तेमध्ये प्राथमिक

शाळेत प्रवेश करावा, असे अपेक्षित असते. या निर्धारित वयाच्या खालच्या वा वरच्या मुलांनाही पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश दिला जातो, हे खरे आहे. त्याबरोबर हेही खरे आहे की ज्या मुलांनी घरी अभ्यास केलेला असेल त्यांची परीक्षा घेऊन, त्यांनी केलेल्या प्रगतीनुसार त्यांना पहिलीनंतरच्या वरच्या वर्गातही प्रवेश दिला जातो. परंतु कमी वयाच्या वा अधिक वयाच्या मुलांना पहिलीत किंवा पहिलीनंतरच्या इयत्तेमध्ये प्रवेश देणे हा नियम नसून अपवाद आहे; सामान्य मुलाला, आणि विशेषतः ग्रामीण भागातील सामान्य मुलाला, सहाव्या किंवा पाचव्या वर्षीच आणि पहिल्या इयत्तेमध्येच प्रवेश मिळवावा लागतो, असे म्हणणेच बरोबर ठरेल.

या पद्धतीचे दोन फायदे आहेत : ( १ ) पहिलीमध्ये जवळजवळ एकाच वयोगटातील मुले असतात आणि दरवर्षी ती वरच्या वर्गात जात असतात; आणि ( २ ) वर्गातील अध्यापन सुलभ ठरते. त्याचबरोबर या पद्धतीत काही दोषही आहेत. उदाहरणार्थ, ग्रामीण भागातील जे मूल वयाच्या सहाव्या वर्षी पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश करीत नाही त्याचे काय होते? त्या मुलाला नंतर शाळेत कधीच प्रवेश मिळत नाही आणि निरक्षर प्रौढ म्हणूनच त्याला आपले जीवन व्यतीत करावे लागते. आपण त्या मुलाला एवढेच सांगू शकतो, " माफ कर, तुझी संधी कायमची हुकली आहे. तू जेव्हा मोठा होशील, लग्न करशील, तेव्हा तुला जे मूल होईल त्याला सहाव्या वर्षी आमच्याकडे घेऊन ये. आम्ही त्याला निश्चित पहिलीत दाखल करून घेऊ. " काही कारणामुळे, त्या मुलाला सहाव्या वर्षी पहिलीमध्ये प्रवेश घेणे जमू शकले नाही तर आपण नातवापर्यंत थांबायलाही तयार असतो. एकाच इयत्तेमध्ये प्रवेश देण्याच्या पद्धतीमुळे प्रत्यक्षामध्ये संपूर्ण शिक्षणपद्धतीच हेतूशून्य होऊन जाते.

थोड्याशा अधिक वयाच्या, म्हणजे अकरा किंवा चौदा वर्षे वयाच्या मुलाला आपण शिकावे असे वाटले तर त्याचे काय होते? अशा मुलाला प्राथमिक शाळेमध्ये प्रवेश दिला जातो, हे खरे आहे. पण त्याला पहिलीतच दाखल करून घेतले जाते. त्यामुळे त्या मुलाला आपल्यापेक्षा वयाने लहान असलेल्या मुलांमध्ये सर्व वेळ बसावे लागते, धडे शिकावे लागतात आणि तेही त्या लहान मुलांच्या गतीनेच. या गोष्टींचा त्या वाढीव वयाच्या मुलाला कंटाळा येतो आणि म्हणून तो शाळा सोडून देतो. अशा मुलासाठी वेगळ्या प्रकारच्या वर्गाची आवश्यकता असते. त्याचे वाढलेले वय लक्षात घेऊन, त्याला शिकविण्यासाठी वेगळ्या प्रकारची तंत्रे अनुसरली पाहिजेत. परंतु आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये अशा खास वर्गाची तरतूद केलेली नाही.

वयाच्या सहाव्या वर्षी पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश देण्याची पद्धत अनुसरण्या-



ऐवजी, वेगवेगळ्या वयाच्या, उदाहरणार्थ ९, १०, १४ किंवा १७ वर्षे वयाच्या मुलांना वेगवेगळ्या इयत्तांमध्ये प्रवेश देण्याची पद्धत स्वीकारली तर शिक्षणाचा बराच मोठ्या प्रमाणामध्ये प्रसार होऊ शकेल. कारण, आपण शिकावे ही इच्छा मुलांच्या मनात वेगवेगळ्या वयामध्ये निर्माण होऊ शकते. अशा वाढीव वयाच्या मुलांना समाविष्ट करून घेण्याइतकी आपली शिक्षणपद्धती लवचिक असली पाहिजे. अशा मुलांसाठी खास शाळा सुरू केल्या पाहिजेत. या मुलांची प्रगल्भता लक्षात घेऊन त्यानुरूप त्यांना शिक्षण द्यायला हवे. शिक्षणपद्धतीमध्ये अशी पर्यायी प्रवेशपद्धत अनुसरण्यात आली तर जी असंख्य मुले शिक्षणापासून दूर राहून निरक्षर प्रौढांच्या संख्येत भर घालतात ती शिक्षणप्रवाहामध्ये सहभागी होऊ शकतील. वयाच्या सहाव्या वर्षी पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश देण्याच्या सध्याच्या पद्धतीऐवजी ही पद्धत स्वीकारण्यात आली तर जनतेमध्ये साक्षरतेचा द्रुतगतीने प्रसार होऊ शकेल, हे उघड आहे.

( २ ) **वार्षिक बढती :** मुलाने दरवर्षी एका इयत्तेचा अभ्यासक्रम पुरा करावा आणि वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर वरच्या इयत्तेत जावे, अशी प्राथमिक शाळांमधील सध्याची पद्धत आहे. अर्थात सर्वांनाच अशी वार्षिक बढती मिळविणे शक्य होत नाही. बरीच मुले वार्षिक परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होतात आणि त्यामुळे त्यांना वर्षभर पुन्हा त्याच वर्गात बसावे लागते. अनुत्तीर्ण होणाऱ्या मुलांचे प्रमाण बरेच असते. उलटपक्षी, काही थोडी मुले एका वर्षात दोन इयत्तांचा अभ्यास पुरा करून ' दुप्पट ' बढती मिळवू शकतात. परंतु अशा मुलांची संख्या फारच थोडी असते. म्हणून सामान्यतः वार्षिक बढती हेच या शिक्षणपद्धतीचे प्रमुख स्वरूप राहते आणि मुले दरवर्षी वरच्या एकेका इयत्तेमध्ये प्रवेश मिळवित असतात.

ही पद्धत अनुसरण्याचे प्राथमिक उद्दिष्ट हे असते की समान शैक्षणिक प्रगती केलेल्या मुलांच्या समूहाला वर्गामध्ये शिकविणे सोपे जावे. या पद्धतीमुळे हा उद्देश साधला जातो यात मुळीच शंका नाही. परंतु, जी मुले उशीरा शिकायला लागतात त्यांच्या गरजा ही पद्धत भागवू शकत नाही. उदाहरणार्थ, ११ किंवा १४ वर्षे वयाची मुले इयत्ता पहिलीपासून पाचवीपर्यंतचा अभ्यास दोन वर्षात पूर्ण करू शकतात, असे प्रत्यक्ष प्रयोगावरून सिद्ध झालेले आहे. तसेच, १४ ते १८ वर्षे वयापर्यंतची मुले पहिली ते आठवीपर्यंतचा अभ्यास दोन–तीन वर्षांमध्ये पुरा करून प्राथमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा चांगल्या रीतीने उत्तीर्ण होऊ शकतात. भारतासारख्या विकसनशील देशातील परिस्थिती लक्षात घेता, अशा तऱ्हेचे कार्यक्रम अत्यंत उपयुक्त आणि सोयीस्कर ठरतात. परंतु हे कार्यक्रम पुरेशा प्रमाणामध्ये विकसित करण्यात आलेले नाहीत. काही सद्हेतु-

परित आणि दूरदृष्टीच्या शिक्षणतज्ज्ञांनी या बाबतीत हाती घेतलेले प्रायोगिक प्रकल्प यांचाच काय तो अपवाद म्हटला पाहिजे.

(३) **पूर्णवेळेचे अध्यापन** : शाळेमध्ये केवळ पूर्णवेळेचे अध्यापन करणे हा प्रचलित प्राथमिक शिक्षणपद्धतीचा आणखी एक प्रमुख विशेष आहे. वरिष्ठ वर्गातील मुले पूर्णवेळेच्या शाळांमध्ये जाऊ शकत असल्यामुळे, या वर्गांना काहीच अडचण जाणवत नाही. परंतु सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने ही पद्धत अत्यंत प्रतिकूल ठरते. कारण या वर्गातील लोक इतके गरीब असतात की त्यांच्या मुलांना आपल्या कुटुंबाच्या तुटपुंज्या आर्थिक उत्पन्नामध्ये अल्पस्वल्प भर घालण्यासाठी घरी वा बाहेर काम करावे लागते. या वर्गातील जवळजवळ प्रत्येक मुलाला वयाच्या नवव्या वर्षापासून कोणते ना कोणते काम करावेच लागते. तो आपल्या शेतावर काम करतो, गुरे राखतो किंवा जेथे मिळेल तेथे मोलमजुरी करतो. कामाच्या ओझ्याखाली दबल्या गेलेल्या आपल्या आईला मदत करण्याची जबाबदारी मुलींना पत्करावी लागते. तसेच, अशा कुटुंबांत सतत अपत्यांची भर पडत असल्यामुळे मुलींना आपल्या धाकट्या भावंडांची देखभाल करावी लागते. म्हणून, या मुलामुलींना पूर्णवेळच्या शाळेत जाणे सर्वस्वी अशक्य असते. त्यामुळे ही मुले एक तर शाळेत मुळीच जात नाहीत किंवा गेलीच तर लवकर शाळा सोडतात. प्राथमिक शिक्षणामध्ये सध्या जी फार मोठी गळती दिसते तिचे बिकट आर्थिक परिस्थिती हे एक प्रमुख कारण आहे. गळतीचे प्रमाण दोनतृतीयांश किंवा त्याहूनही अधिक असते.

हा प्रचंड अपव्यय टाळण्यासाठी अनेक उपाय योजिता येण्यासारखे आहेत. उदाहरणार्थ, सर्वसामान्य लोकांना आपली मुले पूर्णवेळेच्या शाळेत पाठविता येणे शक्य व्हावे यासाठी त्यांचे जीवनमान उंचावणे हा एक मार्ग होय. या मुलांना शाळेत पाठविल्यामुळे त्यांच्या पालकांचे जे आर्थिक नुकसान होते त्यांना समाजाने रोख रकमेच्या स्वरूपात मदत करावी आणि मग मुलांना शाळेत पाठविणे पालकाना सक्तीचे करावे. किंवा त्याऐवजी ज्या मुलांना आपल्या कुटुंबासाठी अर्थार्जन करणे भाग पडते त्यांना पैसे मिळवत असतानाच शिकणे शक्य व्हावे म्हणून त्यांच्यासाठी अंशकालिक शिक्षणाची सोय केली पाहिजे. यापैकी पहिला पर्याय कितीही प्रशंसनीय असला तरी ती दीर्घकालिन सोडवणूक आहे, हे उघड आहे. दुसरा पर्याय केवळ आजच नव्हे तर नजीकच्या भविष्य-काळातही सरकारच्या आर्थिक कुवतीबाहेरचा आहे. श्रमजीवी मुलांसाठी फार मोठ्या प्रमाणावर अंशकालिक शिक्षणाची सोय करणे हा तिसरा पर्यायच व्यवहार्य ठरतो. सध्याचे आपले धोरण असे आहे की मुलाने एक तर पूर्णवेळेच्या शाळेमध्ये यावे आणि ते जमत नसेल तर शाळा सोडून द्यावी. जेथे फार मोठा समाज गरीब



आहे अशा भारतासारख्या देशामध्ये या निष्ठूर पद्धतीला –गरिबांच्या मुलांबाबत निष्ठूर असलेल्या– स्थान असूच शकत नाही. म्हणून, ज्या मुलाला पूर्णवेळेच्या शाळेत जाणे शक्य आहे त्याने तशा शाळेत जावे आणि ज्याला पूर्णवेळेच्या शाळेत जाणे शक्य नाही त्याच्यासाठी अंशकालिक शिक्षणाची सोय व्हावी, अशी पर्यायी पद्धत अवलंबणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांची रोजगाराची परिस्थिती लक्षात घेऊन अंशकालिक शिक्षणाच्या वेळा ठरविता येतील आणि त्या योगे आपापल्या कुटुंबासाठी आवश्यक असलेल्या त्यांच्या रोजगारामध्ये व्यत्यय न येता त्यांना शिक्षण घेता येईल.

(४) **केवळ व्यावसायिक शिक्षकांचाच वापर** : केवळ पूर्णवेळेच्या व्यावसायिक शिक्षकांच्या सेवेचाच वापर करणे, हा सध्याच्या प्राथमिक शिक्षणपद्धतीचा आणखी एक विशेष आहे. शिक्षणाचा दर्जा टिकविण्यासाठी व्यावसायिक शिक्षकच हवे असतात, असे या बाबतीतील कारण सांगितले जाते. पूर्णवेळेच्या व्यावसायिक शिक्षकांचा वापर करण्याच्या पद्धतीला कोणीच विरोध करणार नाही. परंतु, केवळ व्यावसायिक शिक्षकांवरच अवलंबून राहण्याच्या धोरणामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. शिक्षणावरील खर्च सतत वाढत जातो, हा पहिला प्रश्न होय. केवळ व्यावसायिक शिक्षकांना नेमण्याच्या पद्धतीचा अपरिहार्य परिपाक म्हणजे शिक्षकांच्या वेतनात सतत वाढ होत असते (त्यायोगे प्रत्येक शिक्षकावरील खर्च वाढतो) आणि शिक्षक–विद्यार्थी प्रमाण सतत घटत जाते (त्यायोगे प्रत्येक विद्यार्थ्यावरील खर्चात वाढ होते). शिवाय, या पद्धतीवर भर दिल्यामुळे गुणवत्तेचा मूळ हेतूही साध्य होत नाही. उदाहरणार्थ, असे सुचविले जाते की प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारावयाचा असेल तर स्थानिक अध्यापन-साधनांचाच उपयोग केला पाहिजे. याचा अर्थ असा की स्थानिक सुताराने किंवा शिंप्याने शाळेमध्ये आपापले कसब शिकवावे, किंवा संगीत शिकविण्याचे काम चांगल्या स्थानिक गायकाकडेच सोपवावे. या शिक्षकांनी अध्यापनाचे व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेले असलेच पाहिजे, असे मानायची काहीच गरज नाही. तसेच त्यांच्यासाठी उद्बोधनाचे उचित कार्यक्रम आयोजित करून त्यांना चांगले शिक्षक बनविणे शक्य आहे. पण असे प्रयत्न कधीच केले जात नाहीत. अध्यापनासाठी प्रौढ विद्यार्थ्यांचा वापर करायचे ठरविले तरीदेखील प्राथमिक शाळांवरील खर्च कमी होऊ शकेल. उदाहरणार्थ, भारतातील पारंपरिक देशी शाळांमध्ये बालशिक्षकाच्या पद्धतीचा सर्रास अवलंब केला जात असे. या पद्धतीनुसार विद्यार्थ्यांच्या जोड्या केल्या जात आणि प्रत्येक वरिष्ठ विद्यार्थी त्याच्याकडे सोपविलेल्या कनिष्ठ विद्यार्थ्याला, शिक्षकाच्या सर्वसाधारण मार्गदर्शनाखाली, शिकवित असे. ही किंवा तत्सम पद्धत, एकशिक्षकी शाळांच्या किंवा ज्या शाळांना

प्रत्येक वर्गासाठी वेगळा शिक्षक नेमणे परवडत नाही अशा शाळांच्या दृष्टीने अत्यंत परिणामकारक ठरू शकेल. अनेक विभागांमध्ये, स्थानिक प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी मुलांना शिकविण्याकरिता गावातील तरुणांची मदत घ्यायला काहीच हरकत नाही. त्याबद्दल या तरुणांना अल्प वेतन दिले तर ते त्यांना स्थानिक परिस्थितीत खूपच मोलाचे वाटेल आणि त्याबरोबरच शिक्षणावरील एकूण खर्चात भरीव कपात साध्य करता येईल. पण हे उपायही अद्याप करून पाहण्यात आलेले नाहीत. त्याहूनही वाईट गोष्ट ही आहे की जेव्हा जेव्हा अव्यावसायिक शिक्षकांचा उपयोग करू घेण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला त्या प्रत्येक वेळी व्यावसायिक शिक्षकांच्या संघटनांनी बंड पुकारून, हा उपाय स्वीकारण्याचा वा यशस्वी होण्याचा प्रयत्न हाणून पाडला.

येथे आणखीही एक मुद्याचा उहापोह केला पाहिजे; आपल्या प्राथमिक शाळांना प्राथमिकपूर्व शाळा किंवा पाळणाघरे जोडलेली नसतात. लहान मुलांना सांभाळणे हे काम गरीब कुटुंबांतील मुलींना करावेच लागते. एकीकडे आपण मुलींमध्ये शिक्षणप्रसार व्हावा असे म्हणत असतो आणि मुलींची शाळेतील उपस्थिती वाढावी यासाठी अनेक उपाय योजित असतो; आणि त्याचवेळी, आपण मुलींना, ' लहान मुले आपल्याबरोबर शाळेत घेऊन येऊ नका, त्यांना घरी ठेवून शाळेत या, ' असे सांगत असतो. तसे करणे मुलींना शक्य नसल्यामुळे, या अटीचा एकच परिणाम होतो : मुलींना शाळेपासून दूर ठेवले जाते; गरीब कुटुंबांतील मुलींना शिक्षण घेण्यापासून आपण परावृत्त करतो. प्राथमिक शाळांना छोटी पाळणाघरे किंवा प्राथमिकपूर्व शाळा जोडण्याचे उल्लेखनीय प्रयोग कै. श्रीमती ताराबाई मोडक प्रभृतींनी केले होते. या पाळणाघरांची किंवा प्राथमिकपूर्व शाळांची देखरेख मुलीच शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करीत असत. पाळणाघरे आणि प्राथमिकपूर्व शाळा सुरू करण्यासाठी काहीसा जादा खर्च करावा लागतो. परंतु गरीब कुटुंबांतील मुलींची शाळेतील उपस्थिती वाढविण्याचे कार्य या सोयीमुळे फारच सुकर होते, असा अनुभव आहे. प्राथमिक शाळेचा जो नमुना आपण स्वीकारला आहे त्यात या लवचिकतेचा अभाव असल्यामुळे गरीब कुटुंबांतील मुलींमध्ये शिक्षणप्रसार होण्यात अडसर आलेला आहे.

प्राथमिक शिक्षणाचा सध्याचा नमुना वरिष्ठ वर्गीयांच्या बाजूनेच कललेला आहे, हे यावरून स्पष्ट होते. कारण त्यांची मुले हे शिक्षण यशस्वी रीतीने पुरी करू शकतात. ( माध्यमिक वा उच्च शिक्षण घेणे हे या मुलांचे मुख्य उद्दिष्ट असते आणि त्या शिक्षणाकडे नेणारा टप्पा म्हणूनच ही मुले प्राथमिक शिक्षणाकडे पहात असतात. ) प्रचलित नमुना जनसामान्यांच्या हिताशी विसंवादी आहे. कारण त्यांची मुले या शाळेत अयशस्वी तरी होतात किंवा शाळा सोडून तरी



जातात. म्हणून, प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करायचे असेल तर गरीब कुटुंबांतील मुलांच्या शिक्षणाची आवश्यक सोय करण्यासाठी प्राथमिक शिक्षणाच्या पारंपरिक नमुन्यामध्ये खाली सुचविल्याप्रमाणे मूलगामी बदल करणे आवश्यक ठरते :

( १ ) एका इयत्तेमध्ये प्रवेश देण्याऐवजी अनेक इयत्तांमध्ये प्रवेशाची मुभा असणारी पद्धत स्वीकारली पाहिजे. या पद्धतीनुसार, ९, ११ किंवा १४ वर्षे वयाच्या मुलांसाठी, त्यांच्या गरजांनुसार, शाळेमध्ये वेगळे वर्ग सुरू करायला हवेत.

( २ ) वार्षिक उपस्थिती आणि बढती ही पद्धत रद्द केली पाहिजे. त्याऐवजी वाढीव वयाच्या मुलांना केव्हाही शाळेत प्रवेश मिळाला पाहिजे आणि नेमून दिलेला अभ्यासक्रम कमी कालावधीत पुरा करण्याची मुभा असली पाहिजे.

( ३ ) केवळ पूर्णवेळेच्या व्यावसायिक शिक्षकांकडून दिल्या जाणाऱ्या शिक्षणावर भर देण्याऐवजी श्रमजीवी मुलांना त्यांच्या सोयीनुसार अंशकालिक शिक्षण देण्याचा व्यापक कार्यक्रम संघटित करण्याची आवश्यकता आहे.

( ४ ) केवळ पूर्णवेळेचे व्यावसायिक शिक्षक वापरण्याची प्रथाही नाहीशी करायला हवी. स्थानिक समाजामध्ये उपलब्ध असणाऱ्या सर्व अध्यापन-साधनांचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. प्राथमिक शाळांमधील शिक्षण देण्यासाठी स्थानिक अंशकालिक शिक्षक आणि वरच्या इयत्तांमधील विद्यार्थी यांचीही मदत घेतली गेली पाहिजे.

( ५ ) प्राथमिक शाळा आणि प्राथमिकपूर्व शाळा यांच्यामध्ये साचेबंद विभागणी असता कामा नये. ज्या मुलींवर लहान मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी असते त्यांना शाळेत आपल्या लहान भावंडांना घेऊन यायला मुभा असली पाहिजे. या लहान मुलांची देखभाल प्राथमिक शाळेला जोडलेल्या प्राथमिकपूर्व शाळांत किंवा पाळणाघरांत केली जावी. हे काम मुली शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार करू शकतील. त्यायोगे, फारच थोडा जादा खर्च करून मौलिक सेवा उपलब्ध करून देता येईल आणि गरीब कुटुंबांतील मुलींमध्ये शिक्षणप्रसार करणे सुकर जाईल.

प्राथमिक शिक्षणपद्धतीमध्ये हे प्रमुख रचनात्मक बदल सर्वाधिक प्राधान्य देऊन घडवून आणले पाहिजेत. तरच राज्यघटनेच्या ४५ व्या कलमातील आदेश आपण येत्या दहा वर्षात अमलात आणू शकू.

जाता जाता हेही सांगितले पाहिजे की येथे केलेली सूचना जागतिक शिक्षण-क्षेत्रातील अलीकडच्या प्रवाहांशी मिळतीजुळती आहे. आधुनिक आणि बदलत्या समाजांच्या गरजा भागविल्या जाव्यात आणि सर्वांना निरंतर शिक्षण घेता यावे यासाठी पूर्वीसारखे शिक्षण सर्वस्वी औपचारिक न ठेवता, त्यात अनौपचारिक

शिक्षणाचा फार मोठा भाग असला पाहिजे, असा हा नवा विचारप्रवाह आहे. एकाच इयत्तेत प्रवेश, दरवर्षी एका इयत्तेतून वरच्या इयत्तेमध्ये बढती, पूर्णवेळेच्या अभ्यासक्रमावर आणि व्यावसायिक शिक्षकांवर भर हे विशेष असलेल्या औपचारिक शिक्षणपद्धतीला मुळातच अनेक मर्यादा आहेत. ती केवळ रोजगार न करणाऱ्या लोकांपुरतीच मर्यादित राहाते. अशा लोकांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण खूपच कमी असते. तसेच, हा वर्ग एकूण लोकसंख्येच्या दृष्टीने फारसा परिणामकारकही नसतो. ज्या दुर्दैवी मुलांना या पद्धतीत प्रवेश मिळू शकत नाही किंवा सामाजिक आणि आर्थिक कारणांमुळे तिच्यातून बाहेर पडावे लागते त्यांना ही शिक्षणपद्धती दुसरी संधी उपलब्ध करून देऊ शकत नाही. एखादी व्यक्ती जे एकूण शिक्षण घेते त्यापैकी फारच थोडे शिक्षण औपचारिक पद्धती देत असते ( कारण व्यक्तीचे बरेचसे शिक्षण घरी, समाजामध्ये, वैयक्तिक नि दैनंदिन जीवनातूनच होत असते ). ही शिक्षणपद्धती विशिष्ट हितसंबंध निर्माण करते आणि त्यामुळे समता किंवा निकोप मतभिन्नता विकसित करण्याऐवजी विशिष्ट हितसंबंध आणि रूढ कल्पना जपण्याकडेच तिचा कल असतो. त्याचबरोबर दिवसेंदिवस ती इतकी खर्चिक होत चालली आहे की एवढा खर्च आपल्याला परवडणार नाही असे श्रीमंत देशांनाही वाटू लागले आहे. या सर्व अडचणी दूर करण्यासाठी केवळ औपचारिक शिक्षणपद्धती वापरण्याचा पारंपरिक हव्यास बाजूला ठेवून तिचा अनौपचारिक शिक्षणपद्धतीशी उचित समन्वय साधला पाहिजे, असा साऱ्या जगभर सध्या प्रयत्न केला जात आहे. हा बदल केवळ प्राथमिक शिक्षणातच नव्हे तर सर्व पातळ्यांवरील शिक्षणामध्ये केला जात आहे. म्हणून आपण भारतातील प्राथमिक शिक्षणात या सुधारणा केल्या तर आपण चांगल्या लोकांच्या सहवासात आणि योग्य भूमिकेवर उभे आहोत असे म्हणता येईल. हे बदल माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणात करणेही तितकेच आवश्यक आहे.

## या सुधारणांचे परिणाम

या संकल्पित सुधारणांची प्रत्यक्ष व्यवहारामध्ये थोडक्यात कोणती फलश्रुती दिसून येईल ?

औपचारिक शिक्षणाच्या विस्तार करण्याबाबतच्या सर्व न्याय्य मागण्या पूर्ण केल्याच पाहिजेत हे खरे असले तरी त्यासाठी खास प्रयत्न करावा लागणार नाही, ही पहिली फलश्रुती होय. औपचारिक शिक्षणपद्धतीचा काही प्रमाणातील विस्तार टाळता येणारच नाही. नव्या शाळांची मागणी पुढे येईल आणि ती भागविलीच पाहिजे. प्रत्येक वर्षी, असंख्य नवी मुले शाळेत प्रथमच प्रवेश करतील आणि जी सध्या शाळेत आहेत ती अधिक काळ तेथे राहाण्याचा प्रयत्न



करतील. लोकांच्या आर्थिक परिस्थितीत सर्वसाधारण सुधारणा झाल्यामुळे आणि लोकांमध्ये सतत जागृती होत असल्यामुळे हे असे घडणे अपरिहार्य आहे. त्यामुळे साहजिकच पूर्णवेळेच्या शाळांमधील नावनोंदणी ३ ते ५ टक्क्यांनी वाढेल. या अशा सर्व न्याय्य मागण्या पुऱ्या केल्या पाहिजेत. परंतु ही मागणी कृत्रिम रीतीने पूर्ण करण्यासाठी खास प्रयत्न करण्याची काहीच गरज नाही. कारण त्यामुळे अपव्ययाचे प्रमाण तेवढे वाढते. शिवाय, पूर्णवेळेच्या शाळांच्या नावनोंदणीमधील वाढ आर्थिक सुस्थितीत असलेल्या वर्गांमुळेच होत असते आणि या वर्गाच्या गरजा आवश्यकतेपेक्षाही अधिक प्रमाणामध्ये भागविल्या गेलेल्या असल्यामुळे, त्या दिशेने खास प्रयत्न करण्याचे काहीच कारण नाही.

या सुचनेची दुसरी फलश्रुती ही आहे की गरीब कुटुंबांतील वाढीव वयाच्या मुलांना अंशकालिक शिक्षण देण्यासाठी आपण कसून प्रयत्न करायला हवेत. या सुधारणा दहा वर्षांच्या अल्प कालावधीमध्ये घडवून आणायच्या असल्यामुळे, तेवढ्या अवधीत गरीबांची मुले पूर्णवेळेच्या शाळेमध्ये जाऊ शकणार नाहीत, हे गृहीत धरले पाहिजे. त्यांच्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या अगोदर आपण त्यांना पूर्णवेळेच्या शाळांमध्ये आणण्याचा प्रयत्न करायचे ठरविले तर आपल्याला प्रचारावर आणि त्यांना ' प्रोत्साहन ' देण्यावर बराच पैसा आणि शक्ती खर्च करावी लागेल. आणि एवढे करूनही नावनोंदणीत फारच थोडी वाढ होईल. उलट, अशा मुलांचे अनुत्तीर्ण होण्याचे किंवा शाळा सोडून जाण्याचे प्रमाण वाढेल.[१४] म्हणून, हा खर्चिक आणि निरर्थक प्रयत्न करीत बसण्याऐवजी

---

१४. ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. मुलांना ' प्रोत्साहन ' देण्यावर सध्या जो अवास्तव भर दिला जात आहे त्यामुळे खर्चात भरमसाट वाढ होते आणि त्या प्रमाणात परिणाम दिसून येत नाहीत, असे मला वाटते. कारण, ज्या मुलांना काम करणे आवश्यक असते त्यांना पूर्णवेळेच्या शाळेत दाखल करून घेण्याचा प्रयत्न आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य आहे. याचा अर्थ अशा मुलांना काहीच सवलती दिल्या जाऊ नयेत, असा नव्हे. मोफत पुस्तके आणि वह्या पुरविल्याच पाहिजेत आणि ही सवलत दिली जाईल असे आपण गृहीत धरले आहे. शाळेत भोजनाची व्यवस्था करणे हा वेगळा प्रश्न आहे. शाळेत असो वा बाहेर असो, प्रत्येक मुलाला पुरेसा आहार मिळालाच पाहिजे. म्हणून शाळेत द्यावयाच्या भोजनाचा खर्च पोषक आहाराचा भाग म्हणून धरला पाहिजे. त्याचा शैक्षणिक खर्चात समावेश करता कामा नये. ( नियोजन मंडळाने पाचव्या योजनेत नेमके असेच केलेले होते.)

मध्यंतरीच्या काळामध्ये, गरीब कुटुंबांतील वाढीव वयाच्या मुलांना अंशकालिक शिक्षण देण्यावर भर देणे इष्ट ठरेल. या लोकांची आर्थिक परिस्थिती जसजशी सुधारत जाईल तसतसा हा कार्यक्रम आपोआप कमी होत जाऊन काही वर्षांच्या आत त्याची गरजही उरणार नाही. इंग्लंडमध्येदेखील १९०० पर्यंत ६–१० वयोगटासाठी आणि १९१८ पर्यंत ११–१४ वयोगटासाठी अंशकालिक शिक्षण देण्यात येत होते, हे या संदर्भात ध्यानात ठेवले पाहिजे.

अंशकालिक शिक्षणाचा हा प्रयत्न दोन पातळ्यांवर केला पाहिजे : (१) निम्न प्राथमिक (इयत्ता १ ते ५) पातळीवर : ९–१४ वयोगटातील जी मुले कधी शाळेत गेलेली नाहीत किंवा ज्यांनी लवकर शाळा सोडलेली आहे अशा सर्व मुलांसाठी अंशकालिक शिक्षणाचे १८ ते २४ महिने कालावधीचे खास वर्ग सुरू करायला हवेत; आणि (२) उच्च प्राथमिक (इयत्ता ६ ते ८) पातळीवर : ज्या मुलांनी पाचवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे (किंवा जे कार्योपयोगी साक्षर झालेले आहेत) आणि ज्यांना आणखी शिक्षण घेण्याची इच्छा आहे, पण जे पूर्णवेळेचे शिक्षण घेऊ शकत नाहीत अशा सर्व मुलांसाठी केवळ ऐच्छिक तत्त्वावर अंशकालिक शिक्षणाचे वर्ग संघटित केले जावेत.

या दोन सूचनांपैकी दुसऱ्या म्हणजे ज्या मुलांनी पाचवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेले आहे (किंवा ज्यांनी कार्योपयोगी साक्षरता संपादन केली आहे) आणि ज्यांना पूर्णवेळेचे पुढील शिक्षण घेणे शक्य नाही अशा मुलांसाठी उच्च प्राथमिक पातळीवरील शिक्षणाचे अंशकालिक वर्ग सुरू करण्यात यावेत, या सूचनेवर अधिक भाष्य करण्याची गरज नाही. हे वर्ग कसे संघटित करायचे हाच या बाबतीतील महत्त्वाचा प्रश्न असून, हे वर्ग येत्या दहा वर्षांसाठी ऐच्छिक तत्त्वावर चालवायचे असल्यामुळे हा प्रश्न सोडविणे सोपे जाऊ शकेल. या वर्गांसाठी प्राथमिक शिक्षक किंवा इतर स्थानिक कार्यकर्ते शिक्षक म्हणून उपयोगी पडू शकतील. सध्या उपलब्ध असलेल्या प्राथमिक (किंवा माध्यमिक देखील) शाळांच्या इमारती आणि उपकरणे या वर्गांसाठी वापरता येणे शक्य आहे.

९–१४ वयोगटातील मुलांसाठी सुरू करायच्या वर्गांची संख्या बरीच राहील आणि या वर्गांचे महत्त्वही अधिक असेल. कारण या वयोगटातील जी मुले शाळेत जात नाहीत किंवा ज्यांनी कार्योपयोगी साक्षरता संपादन केलेली नाही त्या सर्वांचा या कार्यक्रमात समावेश करणे हे अत्यंत आवश्यक आहे. या मुलांसाठी वर्ग चालविण्याकरिता स्थानिक व्यक्तींचे (प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षक, माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी, स्थानिक स्वयंसेवी कार्यकर्ते इत्यादींचे) साहाय्य घेता येईल. मुलांना साक्षर करणे आणि भाषणे व चर्चा यांच्याद्वारा त्यांना पाचव्या इयत्तेच्या पातळीपर्यंतचे सर्वसाधारण ज्ञान देणे, हा या वर्गांचा मूलभूत हेतू



असला पाहिजे. पाचव्या योजना काळामध्ये ८० ते ९० टक्के मुले आणि ४० टक्के मुली या कार्यक्रमात समाविष्ट करून घेण्याचे उद्दिष्ट ठरवायला हवे. या वयोगटातील सर्व मुलामुलींना सहाव्या योजना काळात समाविष्ट करून घेतल्यास १९८४ नंतर अशी परिस्थिती निर्माण होईल की वयाची १५ वर्षे पूर्ण व्हायच्या आत प्रत्येक मुलामुलीने कार्योपयोगी साक्षरता संपादन केलेली आहे. सुरुवातीला हा कार्यक्रम ऐच्छिक स्वरुपाचा ठेवण्यात आला तरी नंतर तो सक्तीचा केला पाहिजे. शिक्षण आयोगाने म्हटल्याप्रमाणे, या कार्यक्रमानुसार शिकणाऱ्या मुलांची संख्या दर वर्षी कमीकमी होत जाऊन १९८४ पर्यंत ती पूर्णपणे नाहीशी झालेली असेल. कमीतकमी खर्चामध्ये अत्यंत व्यापक साक्षरता साध्य करण्याच्या दृष्टीने या कार्यक्रमाचे विशेष महत्त्व आहे.

या बदलांमुळे निर्माण होणारी नवी शिक्षणपद्धती खालीलप्रमाणे असेल :

(१) सध्याप्रमाणे यापुढेही प्रत्येक मुलाला वयाच्या सहाव्या वर्षी पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश करण्याची आणि पाचवी किंवा आठवीपर्यंतचे शिक्षण पूर्णवेळेच्या शाळेत घेण्याची मुभा राहील. परंतु प्राथमिक शिक्षण घेण्याचा हा एवढाच मार्ग राहाणार नाही.

(२) जी मुले वयाच्या सहाव्या वर्षी पूर्णवेळेच्या शाळेमध्ये पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश करू शकणार नाहीत ती ९ ते १४ या वयोगटात असताना केव्हाही अंशकालिक खास वर्गात शिक्षण घेऊन १८ ते २४ महिन्यात कार्योपयोगी साक्षर होऊ शकतील. कार्योपयोगी साक्षर होण्यापूर्वीच ज्या मुलांनी शाळा सोडलेली असेल त्यांनाही या वर्गात प्रवेश मिळवून कार्योपयोगी साक्षरता मिळविता येईल.

(३) ज्या मुलांनी पाचवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेले आहे किंवा जी कार्योपयोगी साक्षर झालेली आहेत, परंतु ज्यांना पूर्णवेळेच्या शाळेमध्ये जाणे शक्य होत नाही त्यांना, त्यांची इच्छा असल्यास, सहावी ते आठवीपर्यंतचे अंशकालिक शिक्षण घेता येईल.

(४) ११-१४ वयोगटातील सर्व मुलांनी (जी शाळेत जात नाहीत किंवा कार्योपयोगी साक्षर झालेली नाहीत) वर (२) मध्ये निर्देश केलेल्या खास अंशकालिक वर्गांमध्ये येत्या दहा वर्षांमध्ये प्रवेश करावा, यासाठी कसोशीने प्रयत्न केला जाईल. त्यायोगे १९८४ मध्ये वयाची १५ वर्षे पूर्ण होण्याच्या अगोदर प्रत्येक मूल साक्षर झालेले असेल.

सध्याच्या आणि संकल्पित धोरणातील फरक थोडक्यात विशद करणे इष्ट ठरेल :

(१) ६-११ वयोगटातील सर्व मुलांनी पूर्णवेळेच्या शाळांमध्ये नावे दाखल

करावीत, यावर सध्याच्या धोरणाचा भर आहे. परंतु या वयोगटातील अनेक मुले नंतर शाळा सोडून देत असल्यामुळे प्रत्यक्षामध्ये ६–९ या वयोगटातील मुलांच्या नोंदणीवरच भर पडतो. ६–११ वयोगटातील मुलांनी पूर्ण वेळेच्या शाळांमध्ये जावे यासाठी नव्या धोरणानुसार प्रोत्साहन दिले जाईल आणि त्या दृष्टीने ज्या न्याय्य मागण्या पुढे येतील त्या पुरविण्याचा प्रयत्न केला जाईल.

(२) आर्थिक कारणांमुळे जी मुले शाळा सोडून देतात किंवा जी मुले वयाच्या सहाव्या वर्षी शाळेत दाखल होत नाहीत त्यांची सध्याच्या धोरणात पूर्णपणे उपेक्षा होते. नव्या पद्धतीनुसार, अशा सर्व मुलांना अनेक इयत्तांमध्ये प्रवेश आणि अंशकालिक शिक्षण या सुविधांमुळे आपले शिक्षण चालू ठेवता येईल.

(३) सध्याच्या पद्धतीत गळती हा सर्वात मोठा प्रश्न आहे. नव्या पद्धतीनुसार, गळती जवळजवळ होणार नाही. कारण श्रमजीवी मुलांना पूर्णवेळेच्या शिक्षणाऐवजी अंशकालिक शिक्षणाचा अंगिकार करून, आपल्या गरजा भागविता येतील.

(४) ६–११ वयोगटातील सर्व मुलांची नावनोंदणी झाल्यावर ११–१४ वयोगटातील मुलांच्या सार्वत्रिक नोंदणीचा विचार करायचा, असे सध्याचे धोरण आहे. एकाच इयत्तेमध्ये प्रवेश आणि वार्षिक बढती असे सध्याच्या प्राथमिक शिक्षणाचे स्वरूप असल्यामुळे, असे होणे अपरिहार्य आहे. ६–११ वयोगटातील सर्व मुलांसाठी शिक्षण उपलब्ध करून देत असतानाच ११–१४ वयोगटातील मुलांसाठी सार्वत्रिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करणे नव्या धोरणाला अभिप्रेत आहे. यामुळे, ६–९ वयोगटाच्या नावनोंदणीवर आणि हजेरीवर भर देण्याऐवजी ११–१४ वयोगटाच्या नावनोंदणीवर आणि हजेरीवर भर दिला जाणार आहे. या वयोगटातील मुलांनी शक्य असेल तर पूर्णवेळेचे आणि आवश्यक असेल तर अंशवेळेचे शिक्षण घ्यावे, असे गृहीत धरण्यात आले आहे. असे करणे अधिक काटकसरीचे आणि परिणामकारक ठरेल.[१५]

(५) ६–९ वयोगटावर भर दिल्यामुळे आणि गळतीच्या फार मोठ्या प्रमाणामुळे सध्याची शिक्षणपद्धती साक्षरताप्रसाराला फारच थोडा हातभार लावते. उलटपक्षी, ११–१४ वयोगटावर भर दिल्यामुळे आणि अनेक इयत्तांमध्ये प्रवेश व अंशकालिक शिक्षण या कार्यक्रमांच्या द्वारा गळती पूर्णपणे नाहीशी करणार असल्यामुळे नवी पद्धती प्रौढ-साक्षरतेला फार मोठ्या प्रमाणामध्ये चालना देते. तसेच, वयाची १५ वर्षे पूर्ण व्हायच्या आत प्रत्येक मुलाने कार्योपयोगी साक्षरता संपादन केलेली आहे अशी परिस्थिती १९८४ नंतर निर्माण करण्याची ही पद्धती ग्वाही देते.



## गुणात्मक सुधारणेचे कार्यक्रम

पारंपरिक नमुन्यामध्ये जे रचनात्मक बदल सुचविण्यात आलेले आहेत ते अमलात आले तर प्राथमिक शिक्षणामध्ये गुणात्मक सुधारणाही घडवून येईल. कारण, ६-१४ वयोगटातील प्रत्येक मूल शाळेत दाखल होईल आणि ते कार्योपयोगी साक्षर होईपर्यंत किंवा १४ वर्षांचे होईपर्यंत किंवा आठवी इयत्ता पूर्ण करीपर्यंत, शक्य असेल तर पूर्णवेळेच्या आणि आवश्यक असेल तर अंशकालिक शाळेत राहील अशी दक्षता या बदलांमुळे घेतली जाणार आहे. पण येथे हे ध्यानात ठेवले पाहिजे की सार्वत्रिक नावनोंदणी किंवा हजेरी हे या कार्यक्रमाच्या विकासामागील आपले मूलभूत उद्दिष्ट नव्हे. आधुनिक जीवनाला आवश्यक असलेली माहिती, कौशल्ये आणि मूल्ये संपादन करता यावीत, याद्दष्टीने प्रत्येक मुलाला योग्य शिक्षण देणे हा या कार्यक्रमाचा प्रधान हेतू आहे. म्हणून, प्राथमिक शिक्षणाच्या गुणात्मक सुधारणेच्या कार्यक्रमाचे स्वतंत्र महत्त्व आहे. संख्यात्मक उद्दिष्टे साध्य करण्यासाठीही गुणात्मक सुधारणेच्या कार्यक्रमाकडे योग्य लक्ष देणे आवश्यक आहे. कारण, मुलाला शाळा आकर्षक आणि उपयुक्त वाटली नाही तर ते शाळेत राहाणार नाही. प्राथमिक शिक्षणाची गुणात्मक सुधारणा हे सर्वोच्च साध्य तर आहेच; त्याशिवाय या कार्यक्रमाच्या संख्यात्मक अंगाच्या यशस्वितेसाठीही गुणात्मक सुधारणा अत्यावश्यक ठरते.

ही गुणात्मक सुधारणा मुख्यतः शिक्षणाच्या आशयाशी निगडित आहे. म्हणून या पातळीवरील मूलभूत अभ्यासक्रमामध्ये साक्षरता (किंवा भाषाकौशल्य), अंकज्ञान (किंवा गणितीय कौशल्ये), तंत्रज्ञान (किंवा शास्त्रीय आणि तांत्रिक माहिती आणि अनुभव), कार्यानुभव (किंवा समाजोपयोगी उत्पादक कामाचा अनुभव), आरोग्य आणि शारीरिक शिक्षण, व्यावसायिक कौशल्यांचा विकास आणि सामा-

---

१५. डॉ. झाकिर हुसेन नेहमी म्हणत असत, " माझ्यापाशी देशातील मुलांना तीन वर्षे शिक्षण देण्याइतकाच पैसा असेल (आणि सध्या तशीच परिस्थिती आहे) तर मी ६-९ वयोगटाऐवजी ११-१४ वयोगटासाठी शिक्षण सार्वत्रिक करीन. कारण अधिक वयाची मुले चांगले आणि लवकर शिकतात आणि शिकलेले दीर्घकाळ त्यांच्या स्मरणात राहाते." राज्यघटनेने सार्वत्रिक शिक्षणासाठी १४ ही वरची वयोमर्यादा निश्चित केलेली असली तरी किमान वयाचा उल्लेख केलेला नाही, यावर भर देऊन ते म्हणत असत, " ११-१४ वयोगटातील मुलांसाठी शिक्षण सक्तीचे करून घटनात्मक तरतुदीची कार्यवाही करता येईल. ६-९ किंवा ६-११ वयोगटासाठी तसे करून घटनात्मक तरतूद पूर्ण होत नाही."

जिक सेवेच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग यांचा समावेश असावा. हे वेगवेगळे विषय एकत्रित पद्धतीने शिकविले जाणे आणि लगतच्या सामाजिक आणि नैसर्गिक परिसराभोवती घनिष्ठ रीतीने निगडित असणे, हे या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे आहे.

येथे आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे; ती ही की प्राथमिक शिक्षणामध्ये (इयत्ता १ ते ५) अभ्यासक्रमाचा बोजा वाढविला तर त्याचा चांगला परिणाम होत नाही. कारण एक तर असंख्य मुले हे शिक्षण घेत असतात आणि त्या मानाने साधनसामुग्री मात्र अपुरी असते. म्हणून प्राथमिक शाळेमधील अभ्यासक्रम सोपा ठेवून कार्योपयोगी साक्षरतेवर भर देणे लाभदायक ठरेल. अभ्यासक्रम अधिक सखोल करायला उच्च प्राथमिक पातळीवर (इयत्ता ६ ते ८) प्रारंभ करून तो माध्यमिक पातळीवर आणखी सघन करणे इष्ट ठरेल.

प्राथमिक शिक्षणात गुणात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यात कार्यानुभवाचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणाची सध्याची पद्धत मुख्यतः मध्यमवर्गीय कुटुंबांतील मुलांसाठी विकसित करण्यात आलेली असल्यामुळे तिच्यात शारीरिक श्रमांना किंवा उत्पादक कार्याला काहीच महत्त्व देण्यात आलेले नाही. त्यामुळे या शिक्षणातून बैठ्या कामाची प्रवृत्ती वाढते. असे होणे मध्यमवर्गीयांच्या दृष्टीनेही हितावह नसतानाही जनसामान्यांच्या मुलांसाठी हीच पद्धत अनुसरण्यात आली तर तिचे अत्यंत घातक परिणाम होतील. म्हणून प्राथमिक शिक्षणामध्ये कार्यानुभवाचा अंतर्भाव करण्याच्या दिशेने आपण ताबडतोब पावले उचलली पाहिजेत. पूर्वी मूलोद्योग शिक्षणामध्ये जे साधे कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आले होते तशा स्वरूपाचे कार्यक्रम प्राथमिक शिक्षणामध्ये समाविष्ट करावेत आणि उच्च प्राथमिक पातळीवरील विद्यार्थी अधिक प्रगल्भ असल्यामुळे तेथे कार्यानुभवाचा कार्यक्रम अधिक सघन करून वरच्या पातळीवरून शिकविणे इष्ट ठरेल. प्राथमिक शिक्षणामध्ये हा कार्यक्रम कसा विकसित करता येणे शक्य आहे याची उत्कृष्ट रूपरेषा, जम्मू आणि काश्मीर राज्याच्या शिक्षणविषयक पुनर्रचना समितीने दिलेली आहे.[१६]

प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याचे कार्यक्रम परस्परांशी संबंधित असल्यामुळे त्यांची एकाच वेळी कार्यवाही केली तर चांगले परिणाम दिसून येतील. हे कार्यक्रम असे : (१) अभ्यासक्रमामध्ये सुधारणा; (२) पाठ्यपुस्तकांमध्ये आणि अन्य अध्यापन-अध्ययन साहित्यामध्ये सुधारणा; (३) अध्यापनाच्या परिणामकारक पद्धतींचा स्वीकार; (४) परीक्षापद्धतीत सुधारणा; (५) सर्वसाधारण

---

१६. यासंबंधीच्या शिफारशी पहिल्या परिशिष्टात दिलेल्या आहेत.



शिक्षणात आणि शिक्षकांच्या प्रशिक्षणात सुधारणा; (६) पर्यवेक्षणामध्ये सुधारणा; (७) शाळांना आणि शिक्षकांना उपक्रमशीलता आणि प्रयोगशीलता अंगिकारण्याबद्दल प्रोत्साहन; आणि (८) संस्थात्मक नियोजन आणि शाळासमूह यांच्यामार्फत प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता-सुधारणेच्या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक यांचा सहभाग. हे सर्व कार्यक्रम सुपरिचित असून त्यासंबंधी बरेच वाङ्मय उपलब्ध आहे. म्हणून त्याबाबत येथे तपशीलवार ऊहापोह करण्याची गरज नाही. तरीदेखील, शेवटच्या चार कार्यक्रमांची काही खास वैशिष्टे येथे सांगणे उचित ठरेल. कारण सहसा या चार कार्यक्रमांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.

शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत दोन गोष्टी ध्यानात घ्यायला हव्यात. त्यांना सेवांतर्गत प्रशिक्षण द्यायची व्यवस्था झाली पाहिजे, ही पहिली गोष्ट आहे. सध्या शिक्षकांना दोन वर्षाचे सेवापूर्व (काही ठिकाणी तर केवळ एक वर्षाचेच) प्रशिक्षण दिले जाते आणि सेवांतर्गत प्रशिक्षण अत्यल्प असते किंवा जवळजवळ नसतेच. ही परिस्थिती निश्चितच चांगली नव्हे. नजीकच्या भविष्यकाळामध्ये शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये झपाट्याने बदल होणार असल्यामुळे, सेवापूर्व प्रशिक्षणापेक्षाही सेवांतर्गत शिक्षणाला अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. म्हणून, प्राथमिक शिक्षकांना सतत सेवांतर्गत शिक्षण मिळत राहील अशा रीतीने त्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांची पुनर्रचना केली पाहिजे. सुरुवातीला दर पाच वर्षाच्या सेवाकाळामध्ये किमान दोन महिन्यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण द्यायची सोय झाली पाहिजे.

त्याचप्रमाणे, शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी फार मोठ्या प्रमाणावर अनौपचारिक कार्यक्रम विकसित करण्याचीही अत्यंत आवश्यकता आहे. अनेक प्रकारच्या कार्यक्रमांसाठी असंख्य कार्यकर्त्यांची अंशकालिक सेवा उपलब्ध करून घेणे, हे प्राथमिक शिक्षणाच्या नव्या पद्धतीचे एक सूत्र राहाणार आहे, हे या संदर्भात ध्यानात घेतले पाहिजे. या नव्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी कार्यकर्त्यांचे व्यावसायिक उद्बोधन करणे हे एक मोठेच आव्हान आहे. तसेच, याबाबतीत आपल्यापाशी पूर्वानुभव नाही आणि त्यामुळे या क्षेत्रामध्ये प्रयोगशीलतेला आणि नवनिर्मितीला बराच वाव राहील. शिक्षकांच्या सेवापूर्व आणि सेवांतर्गत प्रशिक्षणाबाबतही हेच म्हणावे लागेल. उदाहरणार्थ, सेवांतर्गत प्रशिक्षण पत्रद्वारे अभ्यासक्रमातून देता येईल. शिवाय आकाशवाणी आणि दूरदर्शन (जेथे उपलब्ध असेल तेथे) या माध्यमांचाही चांगला उपयोग करून घेता येईल. सेवापूर्व प्रशिक्षणातही, सध्याप्रमाणे केवळ पूर्णवेळेचे शिक्षण चालू ठेवण्याची काहीच गरज नाही. शिक्षकांचे सेवापूर्व प्रशिक्षण पत्रद्वारे अभ्यासक्रमातून करणे श्रेयस्कर ठरेल. आणखी एक चांगला पर्याय आहे; तो असा की शिक्षकाची भरती करण्यात आल्यानंतर त्याला सहा महिने प्रशिक्षण देण्यात यावे, नंतर त्याने शाळेत वर्षभर काम करावे, पुन्हा

सहा महिने त्याला प्रशिक्षण संस्थेमध्ये धाडावे आणि नंतर त्याला सेवापूर्व प्रशिक्षणाचे प्रशस्तिपत्र वा पदविका दिली जावी. अनौपचारिक पद्धतीनुसार किंवा अनौपचारिक आणि अनौपचारिक पद्धतींचा योग्य समन्वय करून सेवापूर्व आणि सेवांतर्गत प्रशिक्षण देण्याचे अनेक पर्याय शोधून काढता येण्यासारखे आहेत.

पर्यवेक्षणामध्ये सुधारणा करण्यासाठी पर्यवेक्षकांच्या संख्येमध्ये वाढ करणे हा पारंपरिक दृष्टिकोन होता. कारण पर्यवेक्षकाच्या हाताखाली जेवढे कमी शिक्षक असतील (जसा छोटा वर्ग चांगला असे मानले जात होते त्याप्रमाणे) तेवढे त्याचे पर्यवेक्षणाचे कार्य चांगले होते, असे मानले जात होते. परंतु अशा धोरणाला अपरिहार्य मर्यादा पडतात. म्हणून पर्यवेक्षकांची संख्या कमी करून त्यांच्या गुणवत्तेत सुधारणा करणे अधिक लाभदायक ठरेल. त्यासाठी शाळांना आणि शिक्षकांना अधिक स्वातंत्र्य दिले पाहिजे आणि शिक्षकांना पर्यवेक्षणामध्ये सहभागी करून घ्यायला हवे. शेवटच्या कार्यक्रमाबाबत शिक्षण आयोगाने एक अतिशय व्यवहार्य उपाय सुचविला आहे. या उपायाला शाळासमूह असे नाव देण्यात आलेले आहे. जवळपासच्या साधारणतः १५ ते २५ शाळा परस्परांशी अशा रीतीने जोडल्या जाव्यात की त्यामुळे प्रत्येक शाळेचे एकलेपण नाहीसे होऊन या शाळांनी छोट्या-छोट्या सहकारी गटांसारखे काम करावे. त्यासाठी त्यांना शिक्षण खात्याकडून आवश्यक ते अधिकारही मिळाले पाहिजेत. या सूचनेची मौलिकता सर्वांनी मान्य केलेली आहे. या सूचनेची काही विभागांमध्ये प्रयोगादाखल अंमलबजावणी करण्यात आलेली असून चांगले परिणाम दिसून आलेले आहेत. म्हणून या कार्यक्रमाची कक्षा वाढवून तो साऱ्या देशभर अमलात आणण्याची आता वेळ आलेली आहे. हा कार्यक्रम अमलात आल्यावर, साऱ्या देशात मिळून ४०,००० शाळासमूह (प्रत्येक जिल्ह्यामागे १०० याप्रमाणे) अस्तित्वात येतील आणि हे समूह आठ लाख शाळांची देखभाल करतील. सहाव्या योजनेअखेर शाळांची एकूण संख्या आठ लाखांपर्यंत जाईल, असे अपेक्षित आहे. असे शाळासमूह निर्माण केल्यामुळे शैक्षणिक नियोजनात आणि विकासात शिक्षक अधिक सहभागी होऊ शकतील हेही ध्यानात घेतले पाहिजे. तसेच त्यायोगे शिक्षण खात्याला थोडे पण चांगले पर्यवेक्षक पुरेसे वाटतील.

शिक्षण आयोगाच्या मतानुसार, शाळासमूहामध्ये कोणते कार्यक्रम विकसित करता येणे शक्य आहे याची यादी खाली संदर्भासाठी दिली आहे :

(१) मूल्यमापनाच्या चांगल्या पद्धती अवलंबिण्यासाठी आणि एका वर्गातून दुसऱ्या वर्गात किंवा एका पातळीवरील शाळेतून दुसऱ्या पातळीवरील शाळेत विद्यार्थ्यांना द्यावयाची बढती नियंत्रित करण्यासाठी शाळासमूहाला एक घटक म्हणून कार्य करता येईल.



(२) पूर्वी म्हटल्याप्रमाणे, प्रत्येक शाळेला ज्या सुविधा आणि उपकरणे स्वतंत्रपणे पुरविता येणे शक्य नसते त्या एका समूहातील सर्व शाळांना संयुक्त रीतीने पुरविता येणे शक्य होईल. या उपकरणांमध्ये चित्रपट दाखविण्याचे यंत्र आणि लहान आकाराचा जनित्र यांचा समावेश होऊ शकेल. ही यंत्रे एका शाळेतून दुसऱ्या शाळेमध्ये सहज नेता येतील. त्याचप्रमाणे, मध्यवर्ती माध्यमिक शाळेमध्ये चांगली प्रयोगशाळा असेल आणि त्या समूहाच्या प्राथमिक शाळांमधील मुलांना सुट्टीच्या वेळात किंवा एखाद्या सुट्टीच्या दिवशी प्रत्यक्ष कामासाठी किंवा प्रात्यक्षिकासाठी तेथे आणले जाईल. मध्यवर्ती विद्यालयात फिरते ग्रंथालय ठेवण्यात येऊन या ग्रंथालयातील पुस्तके त्या समूहातील शाळांकडे धाडता येतील. खास शिक्षकांच्या सेवांचा लाभ सर्व शाळांना विभागून घेता येईल. उदाहरणार्थ, प्रत्येक प्राथमिक शाळेला शारीरिक शिक्षणासाठी किंवा चित्रकलेसाठी वेगवेगळे शिक्षक नेमणे शक्य नसते. परंतु असे शिक्षक माध्यमिक शाळांमध्ये नेमलेले असतात. हे शिक्षक प्राथमिक शाळांमधील शिक्षकांना मार्गदर्शन करू शकतील; तसेच ते प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसमवेत काही काळ व्यतीत करू शकतील.

(३) शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण करणे आणि विशेषतः कमी प्रशिक्षित असलेल्या शिक्षकांचा अध्यापन–दर्जा वाढविणे ही शाळासमूहाची प्रमुख जबाबदारी राहील. त्यासाठी शाळासमूहाने शिक्षकांसाठी एक फिरते मध्यवर्ती ग्रंथालय स्थापन केले पाहिजे. शाळासमूहातील सर्व शिक्षकांची साधारणतः महिन्यातून एकदा बैठक घेऊन तेथे सामाजिक प्रश्नांसंबंधी चर्चा घडवून आणणे, व्याख्याने आयोजित करणे, चित्रपट दाखविणे किंवा काही धड्यांची प्रात्यक्षिके घेणे असे कार्यक्रम आयोजित करता येतील. सुट्ट्यांमध्ये शिक्षकांसाठी अल्प मुदतीचे काही खास प्रशिक्षण कार्यक्रमही ठेवता येण्यासारखे आहेत.

(४) प्रत्येक शाळेने आगामी शैक्षणिक वर्षामध्ये हाती घ्यावयाच्या कामाचा तपशीलवार आराखडा तयार करावा असे अपेक्षित आहे. ही आखणी शक्यतो त्या समूहातील शिक्षकांनीच करावी. त्यांनी एकत्र येऊन, विकासाची स्थूल सूत्रे निश्चित करावीत. त्या आधारे प्रत्येक शाळा विकासाचा आपापला कार्यक्रम आखू शकेल.

(५) प्राथमिक शाळा लहान असल्यामुळे, रजेवर जाणाऱ्या शिक्षकांच्या बदली काम करायला शिक्षक नेमणे शक्य होत नाही. त्यामुळे, एखादा शिक्षक रजेवर गेला की त्या वर्गाला पर्यायी शिक्षक उपलब्ध करून देणे अनघड जाते. एकशिक्षकी शाळांबाबत तर ही अडचण अधिकच जाणवते.

कारण तो शिक्षक रजेवर गेला की सारी शाळाच बंद पडते. शाळासमूहाच्या संकल्पनेनुसार, मध्यवर्ती माध्यमिक शाळेला असे एक-दोन राखीव शिक्षक नेमता येतील आणि समूहातील एखाद्या शाळेला गरज पडेल तेव्हा हे शिक्षक त्या शाळेची गरज भागवू शकतील.

(६) नव्या पाठ्यपुस्तकांचा, शिक्षक-मार्गदर्शिकांचा आणि अध्यापन-साहित्याचा प्रयोग आणि मूल्यमापन करण्यासाठी निवडक शाळासमूहांचा उपयोग करून घेता येणे शक्य आहे.

(७) नेहमीच्या अभ्यासक्रमामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक वाटले तर शाळासमूह विशिष्ट मर्यादा सांभाळून आणि जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांची संमती घेऊन तशी सुधारणा करण्याचा शाळासमूहाला अधिकार राहील.[१७]

प्रयोग आणि नवनिर्मिती या बाबतीत अद्याप फारशी प्रगती झालेली नाही. शिक्षकांना स्वातंत्र्य देऊन, त्यांनी काही प्रयोग आणि नवनिर्मिती करावी आणि शैक्षणिक पुनर्घटनेच्या कार्यात सहभागी व्हावे या दृष्टीने फारच थोडे प्रयत्न करण्यात आले. आपली शिक्षणपद्धती अजूनही केंद्रित आणि साचेबंद असून तिचे हे स्वरूप अधिकाधिक वाढत चालले आहे. अभ्यासक्रम मुख्यतः राज्य शिक्षण विभागच ठरवितात. त्याबाबतीत शिक्षकांना सहभागी करुन घेतले जात नाही आणि त्यात बदल करण्याचा शाळांना जवळजवळ काहीच अधिकार नसतो. बहिस्थ परीक्षांचा विचार करूनच अध्यापनपद्धती ठरविल्या जातात. वरून लादण्यात आलेल्या धोरणामध्ये काहीही बदल करण्याची शाळांना वा शिक्षकांना मुभा नसते. म्हणून संपूर्ण शिक्षणपद्धती लवचिक आणि गतिशील करण्याची नितांत आवश्यकता आहे. सर्व शिक्षणसंस्थांना शैक्षणिक स्वातंत्र्य देण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत.

संस्थात्मक नियोजनाची पद्धत स्वीकारणे हे या दिशेने टाकायचे आणखी एक पाऊल आहे. सध्या बहुतेक नियोजन राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवरून केले जाते. म्हणून नियोजनाची प्रक्रिया व्यापक करून, संस्थानिहाय योजना आखण्याची आणि अमलात आणण्याची पद्धत स्वीकारली पाहिजे. कारण याच पातळीवर शिक्षणाच्या नियोजनबद्ध विकासामध्ये शिक्षक, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक सहभागी होऊ शकतात. या संबंधामध्ये शिक्षण आयोगाने म्हटले आहे :

> प्रत्येक शिक्षणसंस्थेने चांगले नियोजन आणि अधिक कष्ट केले तर तिच्यापाशी उपलब्ध असलेली साधनसामग्री कितीही मर्यादित असली तरी

१७. अहवाल, पृष्ठे ४६९–७०



> तिला शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे शक्य आहे. म्हणून, शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी भौतिक साधनांवर भर देण्याऐवजी, या क्षेत्रात कार्य करीत असलेल्या व्यक्तींना, परस्पर सहकार्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करायला उद्युक्त करणे अधिक महत्त्वाचे आहे, असे आमचे मत आहे. कारण भौतिक साधनांची उणीव हे प्रयत्न निश्चित भरून काढू शकतील. भौतिक साधनांची उणीव असतानाही, मानवी प्रयत्नांच्या बळावर शिक्षणसंस्थांना हाती घेता येतील असे अनेक कार्यक्रम आहेत. त्यापैकी काही असे : विद्यार्थ्यांचे अनुत्तीर्ण आणि गळती होण्याचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न, अध्यापनपद्धतीत सुधारणा, मंद बुद्धीच्या मुलांना मार्गदर्शन, बुद्धिमान मुलांकडे विशेष लक्ष, अभ्यासक्रमात समृद्धता, कार्यपद्धतीमधील नव्या तंत्रांचा प्रयोग, शाळेतील शैक्षणिक कार्यक्रम संघटित करण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणा, आणि स्वाध्यायाचा अवलंब करून शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतेत वाढ. अशा तऱ्हेच्या कार्यक्रमांमध्ये नियोजन आणि कार्यवाही महत्त्वाची असते, हे अवश्य लक्षात ठेवले पाहिजे.[१८]

संस्थानिहाय नियोजनामध्ये आणि शैक्षणिक पुनर्घटनेमध्ये शिक्षक, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक यांच्या घनिष्ठ सहभागासंबंधीची अधिक तपशीलवार चर्चा दुसऱ्या परिशिष्टात करण्यात आलेली आहे.

आता एक शेवटचा मुद्दा. गुणवत्ता-सुधारणेच्या कार्यक्रमांसाठी काही पैसा खर्च करावा लागणार आहे. पैशाशिवाय भागणार नसले तरी त्याची फारच थोडी गुंतवणूक करावी लागेल. कारण या कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी मुख्य गरज आहे ती मानवी प्रयत्नांची आणि सखोल, शैक्षणिक जाणिवेची; सक्षम, कष्टाळू आणि समर्पित वृत्तीचे शिक्षक, सद्हेतूने प्रेरित झालेले, विद्याप्रेमी आणि निष्ठावान विद्यार्थी, शिक्षणासंबंधी आस्था बाळगणारे, सहकारी वृत्तीचे आणि उत्साही पालक अशा दृढ मानवी प्रयत्नांशिवाय आणि सखोल बौद्धिक जाणिवेशिवाय अभ्यासक्रमात सुधारणा करणे, चांगल्या दर्जाची पाठ्यपुस्तके निर्माण करणे, अध्यापनाच्या गतिशील पद्धती स्वीकारणे, परीक्षापद्धतीत सुधारणा घडवून आणणे, स्थानिक परिस्थितीशी शिक्षण निगडीत करणे, परस्पर सहकार्याच्या भूमिकेवरून शाळा आणि समाज यांना एकत्र आणणे, यापैकी काहीही शक्य होणार नाही. समर्पित वृत्तीने परिश्रम करणाऱ्या आणि बौद्धिक आशय ओतणाऱ्या वातावरणाचाच नेमका अभाव आहे आणि म्हणून जोपर्यंत आपण असे अनुकूल वातावरण निर्माण करीत नाही तोपर्यंत कितीही पैसा ओतला तरी शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे सर्वस्वी अशक्य आहे.

१८. अहवाल, पृष्ठे ४६०–१.

**प्रौढशिक्षण**

या संदर्भामध्ये, प्रौढशिक्षणाचे कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर विकसित करण्याचे महत्त्व ध्यानात घेणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपासून आपण असे गृहीत धरून चाललेलो आहोत की प्राथमिक शिक्षण शक्य तितक्या लवकर सार्वत्रिक करणे हाच जनतेची निरक्षरता दूर करण्याचा सर्वात चांगला मार्ग होय. हे धोरण मुळातच चुकीचे आहे आणि ते पूर्णपणे अयशस्वी झालेले आहे. सर्वसामान्य पालकाला ज्या प्रमाणात शिक्षणाचे महत्त्व कळले आणि आपल्या मुलाला शाळेत धाडण्यासाठी आवश्यक तो त्याग करण्याची त्याची तयारी झाली त्या प्रमाणातच सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम यशस्वी झालेला आहे. म्हणून, साक्षर पालकच आपल्या मुलांनी शाळेत जावे आणि शाळेतील शिक्षणाचा त्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, इकडे लक्ष देऊ शकतो. उलट, पालक जर निरक्षर असेल तर मुलाला शाळेत घालण्याबाबत आणि शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्याला तेथे ठेवण्याबाबत उदासीन असतो. मुलांनी मध्येच शाळा सोडून देण्यामागचे हेच सर्वात मोठे कारण आहे. अशा परिस्थितीत, बहुसंख्य पालक निरक्षर असताना, सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम यशस्वी होईल असे गृहीत धरणे तत्त्वतःच चूक होते.

खरे म्हणजे आपण सामुदायिक निरक्षरतेच्या निर्मूलनाचा प्रत्यक्ष कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर हाती घ्यायला हवा होता आणि त्याचवेळेला सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा व्यापक कार्यक्रम प्रवर्तित करणे आवश्यक होते. परंतु आपण यापैकी काहीच केले नाही. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण १९६० पर्यंत उपलब्ध करून द्यायचे असे आपण ठरविले होते, हे खरे आहे. तो कार्यक्रम अमलात आला असता तर परिस्थिती काहीशी सुधारली असती. परंतु अजूनही हा कार्यक्रम अमलात आलेला नाही आणि तो केव्हा अमलात येईल, हेही कोणी सांगू शकत नाही, अशी अवस्था आहे. त्याचबरोबर, प्रौढांची निरक्षरता नाहीशी करण्याचा प्रत्यक्ष कार्यक्रमही आपण हाती घेतला नाही. या कार्यक्रमासाठी फारच थोडा पैसा लागणार आहे, (एका प्रौढाला साक्षर करण्यासाठी, सध्याच्या भावपातळीवरही, साधारणतः ३० ते ४० रुपये खर्च येईल) आणि खर्चाच्या मानाने खूपच मोठा लाभ होणार आहे. कारण साक्षरतेमुळे केवळ संबंधित व्यक्तीच्या दृष्टीने नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या दृष्टीनेही मूलभूत फरक पडतो. म्हणून हा कार्यक्रम म्हणजे अल्प खर्चात घडून येणारे सामाजिक परिवर्तन ठरू शकते. असे असूनही स्वातंत्र्यप्राप्तीपासून आतापर्यंत शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चापैकी एक टक्क्यापेक्षाही कमी रक्कम आपण प्रौढ साक्षरता कार्यावर खर्च करीत आहोत आणि त्यामुळे दरवर्षी फक्त पाच लाख प्रौढच साक्षर होत



आहेत. औपचारिक साक्षरतेसह किंवा तिच्याशिवायही प्रौढशिक्षण देता येते; पण तसे शिक्षण देण्याचाही आपण प्रयत्न केला नाही. त्याचेच अनिष्ट परिणाम सध्या भोगावे लागत आहेत. १९४७ साली आपल्या देशात साक्षरांचे प्रमाण १४ टक्के होते, ते १९७१ मध्ये अवघे २९ टक्के झाले. याचा अर्थ असा की लोकसंख्या दरवर्षी दोन टक्क्यांपेक्षाही अधिक प्रमाणात वाढत असताना साक्षरताप्रसाराचे प्रमाण अवघे पाच अष्टमांश टक्केच राहिले. त्यामुळे १९४७ मध्ये देशात जेवढे निरक्षर होते त्यापेक्षा आज अधिक निरक्षर आहेत. जगातील एकूण निरक्षरांपैकी अर्ध्याहून अधिक निरक्षर एकट्या भारतात आहेत.

यावरून आपण कोणता धडा घेतला पाहिजे, हे स्पष्ट आहे. यापुढील काळात आपण प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करीत असतानाच प्रौढ साक्षरतेचे प्रत्यक्ष कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. या कार्यक्रमासाठी वेतन देऊन कार्यकर्ते नेमले तरीदेखील फार खर्च येणार नाही. शिवाय, शिक्षक, विद्यार्थी आणि सार्वजनिक क्षेत्रातील इतर कर्मचारी यांच्या स्वयंसेवेचा लाभ घेऊन हा खर्च आणखी कमी करणेही शक्य आहे. पंचवार्षिक योजनांमधील रोजगारविषयक किंवा विकासविषयक कार्यक्रमांशी या कार्यक्रमाचा दुवा जोडण्यात आला तर ते अधिक फायदेशीर ठरेल. त्याबरोबरच १५-२५ वयोगटातील शालाबाह्य युवकांना कार्योपयोगी साक्षरतेसह अनौपचारिक शिक्षण देण्यावरही भर द्यायला हवा.

प्रौढशिक्षणाची तीन प्रमुख उद्दिष्टे असली पाहिजेत. व्यावसायिक कौशल्यात सुधारणा घडवून आणणे किंवा सेवांतर्गत प्रशिक्षण देणे हे पहिले उद्दिष्ट होय. त्यायोगे प्रौढ व्यक्तीला आपला व्यवसाय अधिक चांगल्या रीतीने करता येऊन आपले उत्पन्न वाढविणे आणि जीवनमान सुधारणे शक्य होईल. गरिबी ही आपल्या देशातील सर्वात महत्त्वाची समस्या असल्यामुळे, प्रौढांना अधिक अर्थार्जनासाठी प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम खूपच उपयुक्त ठरेल. प्रौढांना विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यासंबंधीची मूलभूत माहिती सुगम रीतीने देणे हे या कार्यक्रमाचे दुसरे उद्दिष्ट असले पाहिजे. ही माहिती त्यांच्या रोजगारांशी, आरोग्याशी, कुटुंबनियोजनाशी आणि जीवनातील तत्सम आवश्यक गरजांशी निगडीत असली पाहिजे. प्रौढांना नागरिकत्वाचे शिक्षण देणे हे तिसरे उद्दिष्ट होय. त्यासाठी आपल्या देशाचा सांस्कृतिक वारसा, स्वातंत्र्य-आंदोलनाचा इतिहास, दारिद्र्य, बेकारी, लोकसंख्यावाढ, संरक्षण आदी देशाला भेडसावत असलेल्या प्रश्नांची बुद्धिवादी चर्चा आणि हे प्रश्न सोडविण्यासाठी आणि राष्ट्रीय विकासात सहभागी होण्यासाठी आपण काय केले पाहिजे इत्यादी गोष्टींचा प्रौढांना परिचय करून दिला पाहिजे. त्यांच्या जाणीवजागृतीवर विशेष भर द्यायला हवा. तसेच त्यांना नागरिक म्हणून आपले अधिकार आणि जबाबदाऱ्या कोणत्या

आहेत हेही कळायला हवे. त्यांना व्यक्तिप्रतिष्ठेचेही मोल समजले पाहिजे. त्यामुळे त्यांच्या अधिकारांवर जेव्हा आक्रमण होईल तेव्हा ते प्रतिकाराला सिद्ध होतील. या संदर्भामध्ये मला पाऊलो फ्रिअरी यांचा 'जाणीव-जागृती'सारखा कार्यक्रम अभिप्रेत आहे. तसे केले तरच प्रौढशिक्षण राष्ट्रीय विकासाच्या इतर कार्यक्रमांशी सुसंवादी ठरू शकेल.

व्यावसायिक कौशल्यात सुधारणा, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा परिचय आणि नागरिकत्वाचे शिक्षण ही प्रौढशिक्षणाची जी प्रमुख उद्दिष्टे आहेत तीच १५–२५ वयोगटातील शाळाबाह्य युवकांसाठी आयोजित करावयाच्या अनौपचारिक शिक्षणाच्या आशयाचीही असली पाहिजेत. त्याशिवाय या युवकांच्या शिक्षणात आणखी दोन घटक आवश्यक आहेत : (१) शारीरिक शिक्षण, खेळ, मैदानी क्रीडा आणि मनोरंजन; आणि (२) स्थानिक समाजाच्या सेवा कार्यक्रमामध्ये सहभाग. शक्यतो प्रत्येक युवकाला वैयक्तिक शिक्षण देण्याचा आणि प्रत्येक व्यक्तीला आपल्या गरजा भागविण्यासाठी सक्षम करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न व्हायला हवा.

## अर्थकारण

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण देण्याच्या कार्यक्रमाला बराच खर्च येणार आहे हे सामान्यतः ध्यानात घेतले जात नाही. त्यामुळे विद्यमान नमुन्यानुसार हा कार्यक्रम हाती घेणे आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखे नाही, इकडे दुर्लक्ष होते. ही वस्तुस्थिती ध्यानात घेतली जात नसल्यामुळेच हा कार्यक्रम अमलात आणताना काटकसर करणे आवश्यक आहे याचा विचार होत नाही. म्हणून आर्थिक बाबींचा तपशीलवार विचार करणे आवश्यक आहे.

६–१४ वयोगटातील मुलांना १९८५–८६ पर्यंत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून द्यायचे असेल तर किती खर्च येईल याचा शिक्षण आयोगाने विचार केलेला आहे.[१९] निम्न प्राथमिक शाळेतील शिक्षकाचा १९८५–८६ मध्ये वार्षिक पगार साधारणतः २,५०० रुपये (१९६५–६६ मधील किमतीच्या आधारे) असेल असे आयोगाने गृहीत धरले आहे. उच्च प्राथमिक शाळेमध्ये वार्षिक २,५०० रुपये पगार (१९६५–६६ मधील किमतीच्या आधारे) मिळविणाऱ्या प्रत्येकी तीन प्राथमिक शिक्षकांमागे एक प्रशिक्षित पदवीधर शिक्षक असेल आणि त्याचा वार्षिक पगार ४,००० रुपये असेल, असेही गृहीत धरण्यात

१९. अधिक माहितीसाठी त्या अहवालातील पुरवणी टिपण क्र. २ मधील ०७ ते ०२१ हे परिच्छेद पहा.



आले आहे. शिक्षकांवर होणाऱ्या खर्चाच्या २० टक्के खर्च शिक्षकेतर विभागासाठी होईल. तसेच निम्न प्राथमिक पातळीवर शिक्षक-विद्यार्थी प्रमाण ४० आणि उच्च प्राथमिक पातळीवर शिक्षक-विद्यार्थी प्रमाण ३५ असेल, असेही गृहीत धरण्यात आलेले आहे. त्या आधारे पूर्णवेळेच्या शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यामागे करावा लागणारा खर्च निम्न प्राथमिक पातळीवर ८०.४ रु. आणि उच्च प्राथमिक पातळीवर ११९.४ रु. राहील. याचाच अर्थ असा की साऱ्या देशाचा विचार केला तर या कार्यक्रमासाठी लोकसंख्येतील प्रत्येक व्यक्तीमागे १८ रु. किंवा राष्ट्रीय उत्पन्नाच्या २ टक्के (१९६५–६६ मधील किमतीच्या आधारे) खर्च करावे लागतील. गेल्या काही वर्षातील भाववाढ लक्षात घेता वरील अंदाजाला आता काहीच अर्थ उरलेला नाही.

अशाच तऱ्हेचा खर्च विचारात घेऊन १९७३–७४ मध्ये प्रत्येक विद्यार्थ्यामागे किती पैसा उपलब्ध करावा लागेल याचा हिशेब करता येण्यासारखा आहे. तो हिशेब खाली दिलेला आहे :

(१) प्राथमिक शिक्षकाचा सध्याचा सरासरी पगार महिना ३०० रु. किंवा वार्षिक ३,६०० रु. गृहीत धरावा लागेल. (तरीदेखील शिक्षण आयोगाने प्रत्यक्ष स्वरूपामध्ये अंदाज केल्यापेक्षा तो कमीच राहील.) त्यामध्ये भविष्य-निर्वाह निधीमधील चालकांचा १/१२ हिस्सा मिळविला पाहिजे. बहुसंख्य शिक्षकांना आता निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आल्यामुळे चालकांची आर्थिक जबाबदारी अधिकच वाढेल. म्हणून शिक्षण आयोगाप्रमाणे आपणही निवृत्तिवेतनासाठी शिक्षक खर्चामध्ये त्याच्या सध्याच्या पगाराच्या १० टक्के रक्कम मिळविली पाहिजे. त्यामुळे प्रत्येक शिक्षकामागे वार्षिक ३,९६० रु. खर्च करावे लागतील.

(२) नैमित्तिक खर्च, इमारतीचे भाडे किंवा दुरुस्ती, नव्याने बांधलेल्या इमारतीच्या कर्जफेडीचा हप्ता, उपकरणे इत्यादींवर होणारा खर्च शिक्षकेतर खर्च या सदरात येतो आणि तो साधारणतः शिक्षकांवर होणाऱ्या खर्चाच्या २० टक्के होतो असे सामान्यतः गृहीत धरले जाते. सध्या हा खर्च साधारणतः १० टक्के होतो. परंतु प्राथमिक शाळांची सध्याची अवस्था इतकी केविलवाणी आहे की प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारायचा असेल तर या खर्चात ताबडतोब वाढ होणे आवश्यक आहे. म्हणूनच, शिक्षण आयोगाने शिक्षकेतर खर्चाचे प्रमाण शिक्षकांवर होणाऱ्या खर्चाच्या २० टक्के असावे, असे सुचविले आहे. ही २० टक्क्यांची तरतूदही अपुरी आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. कारण यात सर्व आवश्यक गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही. उदाहरणार्थ मुलांना शाळेत जेवण द्यायचे ठरविले तर हा

खर्च वाढेल. (या एकाच तरतुदीसाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरवर्षी ५० रु. खर्च येईल.) वैद्यकीय उपचारांचा खर्च येथे अंतर्भूत करण्यात आलेला नाही. तसेच, या प्रमाणानुसार जास्तीत जास्त एकतृतीयांश मुलांनाच मोफत पुस्तके आणि अन्य अध्ययन साहित्य पुरविता येईल. शिक्षकेतर खर्चाचे प्रमाण कमीत कमी ठेवायचे ठरविले देखील तो रु. ७९२ राहील.

(३) अशा रीतीने प्रत्येक शिक्षकामागे एकूण शिक्षक खर्च आणि शिक्षकेतर खर्च दरवर्षी रु. ४,७५२ येईल.

(४) सामान्यतः शिक्षक-विद्यार्थी प्रमाण ४० धरले तर प्रत्येक विद्यार्थ्यामागे रु. ११८.८ खर्च होईल. हिशोबाच्या सोयीसाठी तो रु. १२० धरायला हरकत नाही.

उच्च प्राथमिक शाळेत, हे प्रमाण काहीसे वेगळे असेल.

(१) एका पदवीधर शिक्षकाचा वार्षिक पगार रु. ६,००० आणि तीन शिक्षकांचा वार्षिक पगार रु. १०,८०० गृहित धरावा लागेल. या चार शिक्षकांवरील एकूण खर्च रु. १६,८०० म्हणजेच प्रत्येक शिक्षकामागे दरवर्षी रु. ४,२०० खर्ची पडतील. यामध्ये आपल्याला निवृत्तिवेतनासाठी १० टक्के रक्कम मिळवावी लागेल. म्हणजे प्रत्येक शिक्षकावरील खर्च रु. ४,६२० होईल.

(२) निम्न प्राथमिक शाळेपेक्षा उच्च प्राथमिक शाळेमध्ये गुणवत्तेवर अधिक भर देण्यात येत असल्यामुळे, उच्च प्राथमिक शाळेचा शिक्षकेतर खर्च निम्न प्राथमिक शाळेपेक्षा अधिक राहील. तरीदेखील या पातळीवरील शिक्षकांची वेतनश्रेणी वरची असल्यामुळे, आपण शिक्षकेतर खर्चाचे प्रमाण २० टक्केच राहील, असे मानू या. म्हणजे प्रत्येक शिक्षकामागे शिक्षकेतर खर्च रु. ९२४ होईल.

(३) प्रत्येक शिक्षकावरील एकूण खर्च रु. ५,५४४ होईल.

(४) शिक्षक-विद्यार्थी प्रमाण ३० धरले पाहिजे. कारण सध्या तेच प्रमाण आहे.

(५) म्हणून, प्रत्येक विद्यार्थ्यामागे रु. १८४.८ खर्च येईल. हिशोबाच्या सोयीसाठी तो आपण रु. १८० धरू.

१९७३-७४ मधील ६-११ वयोगटातील मुलांची एकूण संख्या ७,७९,८०,००० होती. आकडेवारीच्या सोयीसाठी आपण ती सात कोटी ऐंशी लाख धरू या. या वयोगटातील प्रत्येक मुलाला पूर्णवेळेच्या शाळेमध्ये सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण द्यायचे ठरविले तर प्रत्येक मुलामागे वर्षाला १२० रुपये याप्रमाणे निम्न प्राथमिक पातळीवरील शिक्षणाचा एकूण खर्च ९३६ कोटी रुपये येईल. तसेच, १९७३-७४ मध्ये ११-१४ वयोगटातील मुलांची एकूण संख्या ४,२३,५०,००० होती.



आकडेवारीच्या सोयीसाठी आपण ती चार कोटी तीस लाख धरू या. या सर्व मुलांना उच्च पूर्णवेळेच्या प्राथमिक शाळेमध्ये सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण द्यायचे ठरविले तर प्रत्येक मुलामागे १८० रुपये याप्रमाणे एकूण खर्च ७५६ कोटी रुपये येईल. याचा अर्थ असा की पारंपरिक नमुन्यानुसार सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण द्यायचे असेल तर १७९२ कोटी रुपये खर्च करावे लागतील. (सध्याच्या किमतीनुसार हे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या साडेतीन टक्के पडते.) सध्या आपण सर्व शिक्षणावर एकूण फक्त १३५० कोटी रुपये खर्च करीत आहोत. यावरून हे दिसून येईल की ६-१४ वयोगटातील सर्व मुलांना पूर्णवेळेच्या शाळांमधून सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण देण्याचे ठरविले तर सध्या आपण सर्व प्रकारच्या शिक्षणावर एकूण जो खर्च करीत आहोत त्यापेक्षाही अधिक खर्च करावा लागेल.

पारंपरिक नमुन्यानुसार सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण द्यायचे ठरविले तर खर्च किती येईल यासंबंधी संपूर्ण भारताच्या दृष्टीने यापूर्वी अनेक वेळा हिशेब करण्यात आलेले आहेत. अनेक राज्यांनीही निरनिराळ्या वेळी ही आकडेवारी करून पाहिलेली आहे. या सर्व हिशेबांमधून एकच निष्कर्ष निघाला होता. ६-१४ वयोगटातील सर्व मुलांसाठी पारंपरिक नमुन्यानुसार सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद करणे आपल्या आर्थिक कुवतीबाहेरचे आहे. म्हणून एक तर आपल्याला हा कार्यक्रम सोडून द्यायला हवा, किंवा कमी खर्चाचा पर्यायी नमुना अनुसरायला हवा.

आपण हा कार्यक्रम सोडून देणार नाही; उलट येत्या दहा वर्षांमध्ये आपल्याला त्याची अमलबजावणी करायची आहे. अशी परिस्थितीत या कार्यक्रमावरील खर्च आपल्याला परवडण्याइतका कमी करण्याशिवाय दुसरा पर्यायच उरत नाही. त्या दृष्टीने खालील पद्धती अनुसरणे अत्यंत उपयुक्त ठरेल :

(१) आवश्यक असेल तर पहिल्या आणि दुसऱ्या इयत्तांसाठी दुसऱ्या पद्धतीचा अवलंब करून शिक्षक-विद्यार्थी प्रमाण वाढविणे.

(२) जेथे शक्य असेल तेथे स्वयंसेवी शिक्षकांचे किंवा स्थानिक कार्यकर्त्यांचे सहकार्य घेऊन शिक्षकांवरील खर्च कमी करणे.

(३) अनेक इयत्तांमध्ये प्रवेश देण्याची सोय करून अंशकालिक शिक्षणाची व्यापक व्यवस्था करणे.

(४) स्थानिक यंत्रणा आणि साहित्य यांचा वापर करून इमारतींवरील खर्च कमी करणे.

(५) सर्व मुलांना शाळेच्या वेळेमध्ये पाठ्यपुस्तके आणि अध्ययन साहित्य मोफत पुरवून पाठ्यपुस्तकांवरील आणि अध्यापन-अध्ययन सहित्यावरील खर्च कमी करणे.

यापैकी पहिल्या तीन पद्धतींबाबत यापूर्वी विवेचन करण्यात आलेलेच आहे. चौथी पद्धत पुरेशी स्पष्ट आहे. पाचव्या पद्धतीसंबंधी मात्र थोडासा उहापोह करणे आवश्यक वाटते. प्रत्येक मुलाने स्वतःला लागणारी पुस्तके विकत घ्यावीत असे सध्या अपेक्षिले जाते. गरीब मुलांना ती मोफत पुरविली जातात. यामुळे खर्चात बरीच वाढ होते आणि वाया जाण्याचेही प्रमाण वाढते. लवकरच अशी परिस्थिती निर्माण होणार आहे की आपल्यापाशी पैसा असला तरीही या पुस्तकांसाठी आवश्यक असणारा पुरेसा कागद मिळविणे कठीण जाईल. म्हणून पाठ्यपुस्तकांचे संच शाळेत ठेवून तेथे ते मुलांना उपलब्ध करून देणे खूप फायदेशीर ठरेल. ( जर एखाद्या मुलाला घरी पाठ्यपुस्तके हवीशी वाटत असतील तर त्याचे पालक ती विकत घेऊ शकतील. ) पुस्तके शाळेत ठेवण्याच्या पद्धतीमुळे पुस्तकांचे आयुष्यही वाढेल. कारण पुस्तक तीन ते पाच वर्षे वापरता येईल. उलट सध्याच्या परिस्थितीमुळे ते वर्षभरही टिकत नाही. या पद्धतीचा काटकसरीशिवाय आणखीही एक फायदा आहे. तो असा की मुलांमध्ये सामूहिक मालकीची जाणीव निर्माण होईल आणि सार्वजनिक वस्तू जपून वापरली पाहिजे याची त्यांना सवय लागेल.

एक संभाव्य गैरसमजाचे येथे निराकरण करायला हवे. इतर कार्यक्रमांवर अधिक पैसा खर्च करता यावा म्हणून प्राथमिक शिक्षणावरील सध्याच्या खर्चात कपात सुचविण्यात येत आहे असा आक्षेप घेतला जाण्याची शक्यता आहे. या आक्षेपात किंचितही तथ्य नाही. वर सुचविलेल्या काटकरीच्या सर्व योजना अमलात आणल्यावरही सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या कार्यक्रमावरील खर्च आपण सध्या करीत आहोत त्यापेक्षाही किती तरी अधिक असेल. म्हणून शक्य ती काटकसर करूनही देशाने राष्ट्रीय उत्पन्नापैकी दोन टक्के रक्कम सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्याची तयारी केलीच पाहिजे. प्राथमिक शिक्षणाचा सध्याचा नमुना अनुसरायचे ठरविले तर सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणावरील एकूण खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या साडेतीन ते चार टक्के राहील. एवढा खर्च करणे आपल्याला मुळीच परवडण्यासारखे नाही. त्यामुळे, या कार्यक्रमावरील एकूण खर्च कमी करून आपल्याला परवडण्याइतक्या पातळीवर आणणे हाच काटकसरीचे उपाय सुचविण्यामागचा हेतू आहे.

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या दोन टक्के रक्कम खर्च करणेदेखील मुळीच सोपे नाही. केंद्र आणि राज्य शासनांनी त्या दृष्टीने अत्यंत व्यापक प्रयत्न केल्याशिवाय हे उद्दिष्ट गाठणे शक्य होणार नाही. शिक्षण हा राज्य शासनाच्या अखत्यारीतील विषय असल्यामुळे सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणासाठी जास्तीत जास्त पैसा उपलब्ध करून देणे हे प्रत्येक राज्य शासनाचे कर्तव्य आहे.



साधारणतः प्रत्येक राज्याने आपल्या एकूण खर्चापैकी ३० टक्के रक्कम शिक्षणावर आणि त्यापैकी निम्मी ते दोन तृतीयांश रक्कम केवळ प्राथमिक शिक्षणावर खर्च केली पाहिजे, असे म्हणता येईल. परंतु राज्य शासनाच्या प्रयत्नांना, केन्द्र शासनाच्या खास मदतीचे पाठबळ मिळाले नाही तर केवळ राज्य शासनांचा प्रयत्न पुरा पडणार नाही. याबाबतीत प्रत्येक राज्याला किती भार स्वीकारावा लागेल (ज्यांना शिक्षण द्यायचे आहे अशा मुलांची एकूण संख्या) आणि त्याची आर्थिक क्षमता किती आहे ( दर माणशी उत्पन्न ) यामध्ये खूप तफावत आढळते. तसेच दुर्दैवाची गोष्ट ही आहे की ज्या राज्यांपाशी सर्वात कमी आर्थिक क्षमता आहे, त्यांनाच सर्वात अधिक भार उचलावा लागणार आहे (उदाहरणार्थ बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा ). म्हणून, या कार्यक्रमावर राज्य शासन जेवढा खर्च करील तेवढे केंद्र शासनाने त्याला अनुदान देणे आवश्यक आहे. या दृष्टीने, नियोजन मंडळाने प्रत्येक राज्याला या कार्यक्रमासाठी एकूण किती खर्च करावा लागेल आणि त्यापैकी तेथील राज्य शासन किती भार उचलू शकेल याचा अंदाज घेणे श्रेयस्कर ठरेल. या कार्यक्रमासाठी करावा लागणारा एकूण खर्च आणि राज्य शासनाची क्षमता यामधील फरक केन्द्र शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या विकासासाठी बाजूला ठेवलेल्या अनुदानातून राज्य शासनाला द्यावा.[२०]

थोडक्यात, सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी होणाऱ्या खर्चाची आर्थिक तरतूद करण्याचा मार्ग खालीलप्रमाणे राहील :

( १ ) वर निर्देश केलेल्या सूचनांनुसार काटकसर करून, या कार्यक्रमाचा एकूण खर्च परवडण्याच्या पातळीवर आणणे.

( २ ) प्रत्येक राज्याने या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त पैसा उपलब्ध करून दिला पाहिजे. त्या दृष्टीने काही वस्तुनिष्ठ निकष ठरवून देता येणे शक्य आहे.

( ३ ) (१) आणि (२) यामधील फरकाइतके केंद्र सरकारने अनुदान द्यावे.

आतापर्यंत या तिन्ही आघाड्यांवर आपल्याला अपयश आलेले आहे. म्हणून या सर्व आघाड्यांवर यशस्वी होण्याचा आपण यापुढे कसोशीने प्रयत्न केला पाहिजे.

## परिसर शाळा

भिन्न सामाजिक वर्गांना आणि गटांना एकत्र आणून सामाजिक एकात्मतेला चालना देणे ही वर्ग आणि जातीं यांनी बुजबुजलेल्या विषमताधिष्ठित भारतीय

२०. या विषयासंबंधीच्या अधिक विवेचनासाठी पहा : जे. पी. नाईक-**एलिमेन्टरी एज्युकेशन इन इंडिया : दि अन्‌फिनिश्ड टास्क**, आशिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९६६, परिशिष्ट ३.

समाजाच्या दृष्टीने शिक्षणाची मूलभूत जबाबदारी आहे. परंतु आपली शिक्षण पद्धती ही जबाबदारी पार पाडण्याऐवजी वेगळेच कार्य करीत आहे. या संदर्भामध्ये शिक्षण आयोगाने म्हटले आहे :

> आपली सध्याची शिक्षणपद्धती सामाजिक विभागणी वाढवत असून वर्गावर्गातील फरक रुंद आणि कायम करण्याचा प्रयत्न करीत आहे. सरकार-मार्फत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येत असलेल्या प्राथमिक शाळांमधील प्रवेश विनामूल्य असल्यामुळे गरीब लोक आपली मुले त्या शाळांमध्ये धाडतात; पण तेथील शिक्षणाचा दर्जा सामान्यतः निकृष्ट असतो. काही खाजगी शाळा निश्चितच चांगल्या आहेत; परंतु त्या बरेच शुल्क आकारत असल्यामुळे केवळ मध्यम आणि वरिष्ठ वर्गातील मुलेच त्या शाळांमध्ये जाऊ शकतात. चांगल्या दर्जाच्या बऱ्याच माध्यमिक शाळा खाजगी संस्थांमार्फत चालविण्यात येतात आणि त्याही बरेच शुल्क आकारतात. त्यामुळे त्या शाळांमध्ये प्रवेश घेणे आर्थिक उत्पन्नाच्या सर्वात वरच्या गटातील अवघ्या दहा टक्के लोकांनाच शक्य होते. या शाळांमध्ये काही मध्यमवर्गीय पालकही आपली मुले धाडतात; पण त्यासाठी त्यांना बराच आर्थिक ताण सहन करावा लागतो. त्यामुळे आपल्या शिक्षणातच सामाजिक विभागणी आहे : वरिष्ठ वर्गाची गरज भागविणाऱ्या काही थोड्या, चांगले शिक्षण देणाऱ्या, शुल्क आकारणाऱ्या, खाजगी मालकीच्या शाळा आणि इतर सर्व समाजासाठी मोफत शिक्षण देणाऱ्या, सार्वजनिक मालकीच्या, निकृष्ट दर्जाच्या बहुसंख्य शाळा. ही विभागणी वाढत आहे आणि उच्चवर्गीय आणि जनता यांच्यातील दरी रुंद होत आहे, ही तर अत्यंत अनिष्ट बाब आहे ![२१]

आपल्या शिक्षणपद्धतीमधील ही उणीव दूर करण्यासाठी, शिक्षण आयोगाने, सार्वजनिक शिक्षणासाठी समान शालेय पद्धती निर्माण करण्याची आणि प्राथमिक शिक्षणामध्ये परिसर शाळांची संकल्पना स्वीकारण्याची शिफारस केलेली आहे. शिक्षण आयोगाने म्हटले आहे :

> आपल्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये सध्या जी सामाजिक विभागणी केली जाते तिच्यासंबंधी आम्ही यापूर्वी विवेचन केलेलेच आहे. तसेच, शिक्षण हे राष्ट्रीय विकासाचे आणि विशेषतः सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रभावी साधन करण्यासाठी ही विभागणी नाहीशी केली पाहिजे, असेही आम्ही म्हटले आहे. त्या दृष्टीने, प्रथम निम्न प्राथमिक पातळीवर आणि नंतर उच्च प्राथमिक पातळीवर परिसर शाळांच्या संकल्पनेचा स्वीकार

२१. **अहवाल**, पृष्ठ १८



> व्हावा, असे आम्ही सुचविले आहे. एका विशिष्ट परिसरातील सर्व मुलांनी एकाच शाळेत दाखल झाले पाहिजे असे परिसर शाळा या संकल्पनेमध्ये अभिप्रेत आहे. जात, पंथ, समाज, धर्म, आर्थिक परिस्थिती किंवा सामाजिक दर्जा असा या प्रवेशाबाबत कोणताही भेदभाव केला जाता कामा नये. तसे झाले तरच शाळांमध्ये सामाजिक विभागणीला स्थान उरणार नाही. परिसर शाळां-मुळे सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मतेव्यतिरिक्त आणखी दोन महत्त्वाच्या गोष्टी साध्य होतील. एक तर, परिसर शाळा सर्व मुलांना ' चांगले ' शिक्षण देऊ शकतील. कारण, सर्वसामान्य लोकांसमवेत जीवन व्यतीत करणे हा चांगल्या शिक्षणाचा एक अत्यावश्यक घटक आहे, असे आम्हाला वाटते. दुसरे असे की, अशा शाळा स्थापन केल्यामुळे, आपण सार्वजनिक शिक्षणामध्ये रस घ्यावा असे श्रीमंत आणि सामर्थ्यशाली वर्गांना वाटू लागेल आणि त्यायोगे शिक्षणपद्धतीत लवकर सुधारणा घडून येऊ शकेल.[२२]

शिक्षण आयोगाच्या या अत्यंत महत्त्वाच्या शिफारशीकडे आतापर्यंत दुर्लक्ष झालेले आहे. म्हणून आता तरी तिची त्वरित अंमलबजावणी केली पाहिजे.

## सामाजिक आणि आर्थिक विषमतेवर प्रत्यक्ष प्रहार

समता प्रस्थापित करण्याचे शिक्षणामध्ये फार मोठे सामर्थ्य आहे. जर प्राथ-मिक शिक्षण सार्वत्रिक करण्यात आले तर सामाजिक आणि आर्थिक विषमता निश्चितच कमी होईल. परंतु त्याचबरोबर सामाजिक आणि आर्थिक विषमतेमुळे प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्यासाठी अडसर येणार आहे. म्हणून प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करीत असतानाच, सामाजिक आणि आर्थिक विषमता कमी करण्यासाठी प्रत्यक्ष पावले उचलली पाहिजेत.

सामाजिक आणि आर्थिक विषमता नाहीशी करण्यासाठी दोन गोष्टी करायला हव्यात. वरिष्ठ गटातील ३० टक्के लोकांचा उपभोग कमी करण्याचे उपाय योजिले पाहिजेत; आणि त्याचवेळी गरिबांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याचे आणि तळच्या ३० टक्के लोकांचा उपभोग वाढविण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. म्हणून गरिबांच्या किमान गरजा भागविण्याच्या कार्यक्रमाला आपल्या सर्व योजनांमध्ये सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. त्यासाठी पुढील गोष्टी करायला हव्यात :

(१) सर्व लोकांना जीवनावश्यक वस्तू वाजवी दराने मिळण्यासाठी व्यापक सार्वजनिक वाटपव्यवस्था निर्माण केली पाहिजे; (२) प्रत्येक कुटुंबाला जीवना-वश्यक वस्तू खरेदी करता याव्यात यासाठी सर्वांना रोजगार मिळायला हवा;

२२. **अहवाल**, पृष्ठ ४५८.

(३) प्रौढांमधील निरक्षरता नाहीशी करून १५-२५ वयोगटाला अनौपचारिक शिक्षण उपलब्ध करून दिले पाहिजे; (४) कमी खर्चामध्ये आरोग्यसेवा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत (यामध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यावर आणि मलमूत्राचा निचरा करण्यावर भर दिला पाहिजे); (५) घरे बांधण्यासाठी जमीन मिळवून दिली पाहिजे. तसेच लोकांना स्वस्त घरे बांधता यावीत यासाठी आर्थिक साहाय्य द्यायला हवे. हा कार्यक्रम अमलात आला तरच गरीब लोकांची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती अत्यंत अल्प कालावधीत सुधारू शकेल आणि त्यायोगे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला चालना लाभेल.

## कार्यवाही

शेवटी, या शिफारशींची त्वरित आणि परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने मला काही सूचना कराव्याशा वाटतात.

देशाच्या सर्व भागांमध्ये येत्या दहा वर्षांमध्ये सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी पर्यायी नमुना स्वीकारला पाहिजे, ही महत्त्वाची शिफारस येथे करण्यात आलेली आहे. कोणता नमुना स्वीकारण्यात आला पाहिजे यासंबंधी वेळोवेळी मी सूचना केलेल्या असल्या तरी एकच पर्यायी नमुना असू शकत नाही हे अगदी उघड आहे. खरे म्हणजे, प्रत्येक ठिकाणी अनेक पर्याय आणि अग्रक्रम असू शकतात आणि म्हणून, एकच एक पर्याय न मानता पर्यायी नमुन्यांची मालिका मान्य केली पाहिजे. अशा परिस्थितीत अनेक प्रश्नांबाबत एकमत होणे कठीण आहे. आपल्यासारख्या विशाल आणि अनेकस्वरूपी समाजामध्ये कोणत्याही प्रश्नाची एकच एक सोडवणूक असू शकत नाही. म्हणून एकच नमुना तयार करून तो अंमलात आणणे चांगले असले तरी शक्य नाही. शिवाय, एकरूपता हा गुण आहे, असे मी मानत नाही. उलट, मला तर असे वाटते की आपल्या राष्ट्रीय जीवनामध्ये शैक्षणिक कल्पनांची आणि आकृतिबंधांची समृद्ध विविधता हवी आणि एका कल्पनेने वा आकृतिबंधाने दुसऱ्या कल्पनेला वा आकृतिबंधाला बळ पुरविले पाहिजे; समृद्ध केले पाहिजे. म्हणून, मला असे सुचवायचे आहे की या सूचना ध्यानात घेऊन राज्य शासनांनी आपापल्या विभागांमध्ये सहाव्या योजनेच्या अखेरीपर्यंत प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याच्या दृष्टीने वास्तववादी आणि व्यवहार्य योजना आखावी. अशी योजना प्रत्येक जिल्ह्याकरिताही तयार करता येण्यासारखी आहे. जिल्हावार योजना साहजिकच स्थानिक गरजा व प्रश्न लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या असतील आणि त्यामुळे प्रत्येक योजना दुसरीहून तसेच येथे सुचविलेल्या 'सर्वसामान्य' योजनेहून भिन्न असेल. ही अशी विविधता स्वागतार्हच आहे. या विविधतेमुळे एक प्रमुख हेतू



निश्चितच साध्य होईल. तो असा की मूलभूत प्रश्न ध्यानात घेऊन ते कसे सोडवावेत यासाठी मूलगामी विचार करायला लोकांनी प्रवृत्त व्हावे. असे स्वतंत्र विचारमंथन सुरू झाले तरच शैक्षणिक नियोजन सध्याच्या दुरवस्थेमधून बाहेर पडून रचनात्मक कार्याच्या नव्या पर्वामध्ये प्रवेश करू शकेल.

म्हणून, प्राथमिक शिक्षणाचा विकास करण्यासाठी (१९७४–८३) येत्या सहा महिन्यांमध्ये सुधारित राज्य आणि जिल्हा योजना तयार करणे, हे कार्यवाहीच्या दृष्टीने पहिले पाऊल होय. प्रत्येक राज्याने यासाठी एक कार्यगट स्थापन केला तर हे शक्य आहे. या कार्यगटाला शिक्षण मंत्रालय, नियोजन मंडळ, राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान आणि प्रशिक्षण मंडळ आणि शैक्षणिक नियोजक आणि प्रशासक महाविद्यालय या संस्थांमधील अधिकाऱ्यांचे आवश्यक ते मार्गदर्शन लाभेल. नंतर आपापल्या विभागासाठी अशाच तऱ्हेच्या योजना आखायला राज्य पातळीवरील कार्यगट जिल्हाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतील.

हा कार्यक्रम संरचनात्मक बदल घडवून आणणार असल्यामुळे, या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व व्यक्तींनी – राज्य शिक्षण खात्यातील अधिकारी, शिक्षक, शिक्षक-प्रशिक्षक इत्यादींनी – नव्या तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून ते प्रत्यक्षात आणण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करणे ही या कार्यक्रमाच्या परिणामकारक कार्यवाहीच्या दृष्टीने दुसरी सूचना आहे. म्हणून, या पुस्तकात ग्रथित करण्यात आलेल्या मूलभूत कल्पनांचा जास्तीत जास्त प्रसार करण्यासाठी व्यापक आणि सघन प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणासंबंधी राष्ट्रीय परिसंवाद घेऊन, शिक्षण सचिव आणि शिक्षक संचालक यांच्या बैठकींमध्ये, तसेच राज्य आणि जिल्हा पातळीवर बैठकी आयोजित करून या मूलभूत कल्पनांची चर्चा करणे शक्य आहे. राज्यांच्या योजना शालेय शिक्षकांना कळाव्यात आणि त्यांच्यामार्फत त्या लोकांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी त्या सर्व आधुनिक भारतीय भाषांमध्ये उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. या मूलभूत कल्पनांसंबंधीच्या विचारविनिमयात आणि या कार्यक्रमाची आखणी आणि कार्यवाही करण्यात शिक्षणक्षेत्रातील सर्व व्यक्तींनी मनःपूर्वक भाग घेतला पाहिजे. हा प्रयत्न बराच प्रचंड आहे आणि एवढ्या मोठ्या प्रमाणावर आपण यापूर्वी कधीही प्रयत्न केला नव्हता हे खरे असले तरी तसे केल्याखेरीज या कार्यक्रमाची योग्य कार्यवाही होणार नाही. कारण या कार्यक्रमामध्ये प्रत्येक शिक्षकाचा, प्रत्येक विद्यार्थ्याचा आणि प्रत्येक पालकाचा जाणीपूर्वक सहभाग अत्यावश्यक आहे.

हा कार्यक्रम येत्या दहा वर्षांमध्ये अंमलात यावा या दृष्टीने मार्गदर्शन करण्यासाठी केंद्रीय पातळीवर एक समर्थ यंत्रणा असली पाहिजे, ही कार्यवाहीच्या दृष्टीने तिसरी सूचना होय. त्यासाठी शिक्षण मंत्रालयातील एका अत्यंत वरिष्ठ

अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली प्राथमिक शिक्षण मंडळ स्थापन करण्यात आले पाहिजे; तसेच या मंत्रालयाची प्राथमिक शिक्षणासाठी एक स्थायी समितीही असायला हवी. या कार्यक्रमाच्या शैक्षणिक बाजूकडे राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान आणि प्रशिक्षण मंडळ आणि राज्य शिक्षणशास्त्र संस्था लक्ष देतील. हा कार्यक्रम विकसित करण्यासाठी राज्य, जिल्हा आणि स्थानिक अशा प्रत्येक पातळीवर सरकारी आणि बिनसरकारी व्यक्तींची योग्य यंत्रणा स्थापन करणे आवश्यक ठरेल. प्रत्येक शिक्षकाने आणि प्रत्येक पालकाने या कार्यक्रमात घनिष्ठ रीतीने निगडीत होणे, ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. अशा प्रकारचा कार्यक्रम कार्यवाहीत आणण्यासाठी विशाल, संलग्न आणि विकेंद्रित यंत्रणा निर्माण होणे नितांत आवश्यक आहे.

## मूलभूत प्रश्न

आतापर्यंतच्या विवेचनावरुन आपल्याला हे कळून येईल की प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याच्या मागणीला १८८२ मध्ये दादाभाई नौरोजींपासून प्रारंभ झाला. या मागणीचा गोपाल कृष्ण गोखले यांनी (१९११–१२) पाठपुरावा केला आणि नंतर हे कार्य श्री. रा. वि. परुळेकर (१९३४–४९) यांनी पुढे रेटले. महात्मा गांधींनी मूलोद्योग शिक्षणाची कल्पना १९३७ मध्ये देशापुढे ठेवली आणि त्या शिक्षणामध्ये नंतर श्री. सी. राजगोपालाचारी, आचार्य विनोबा भावे आणि शिक्षण आयोग यांनी काही सुधारणा सुचविल्या. यावरून, प्राथमिक शिक्षण कसे सार्वत्रिक करायचे हे आपल्याला माहीत नसल्यामुळे ते ध्येय गाठता आले नाही, असे म्हणणे बरोबर ठरणार नाही. या संबंधी आतापर्यंत अनेक कल्पना पुढे आलेल्या आहेत आणि त्या अमलात आणल्या तरी देखील येत्या दहा वर्षांत हे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करणे मुळीच कठीण जाणार नाही.

असे आहे तर प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचा मार्गातील खरे अडथळे कोणते आहेत? लोकांची गरिबी हे या संबंधात देण्यात येणारे एक ठरीव कारण आहे. परंतु ते आता पटण्यासारखे नाही. कारण केरळ हे आपल्या देशातील एक अत्यंत गरीब राज्य असूनही त्याने हे उद्दिष्ट जवळजवळ साध्य केलेले आहे; तर अनेक श्रीमंत विभाग या उद्दिष्टापासून खूपच दूर राहिलेले आहेत. शिवाय गरीब लोकांना आपला रोजगार चालू ठेवून अनौपचारिक कार्यक्रमांमधून शिक्षण देणे शक्य आहे. सरकारपाशी पुरेसा पैसा नाही ही आणखी एक ठराविक सबब पुढे केली जात असते, परंतु यापुढे तीही पटण्यासारखी नाही. कारण अनौपचारिक कार्यक्रम सुरू करून आणि शिक्षण-विद्यार्थी प्रमाण वाढविण्यासारखे उपाय योजून या अडचणीवर मात करता येईल.



या वरून, हे दिसून येते की प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यामध्ये पुढील दोन प्रमुख अडथळे येत आहेत : (१) आपल्या समाजामध्ये वर्गाधिष्ठित सत्तासंरचना असल्यामुळे आपल्या स्थानाला धक्का लागू नये असाच तिचा प्रयत्न असतो आणि वरून ती काहीही बोलत असली तरी सर्वसामान्य जनता शिक्षित करण्याचा प्रत्येक प्रयत्न हाणून पाडते; आणि (२) वर्गाधिष्ठित सत्तासंरचनेचा हा अडथळा दूर करण्यासाठी जी राजकीय इच्छाशक्ती हवी असते तिचा आपल्यापाशी अभाव आहे. भविष्यकाळात काय लिहिले आहे हे सत्ताधारी वर्गांनी जाणून घेऊन जनतेला शिक्षित करण्याचा आणि स्वतःच्या व्यापक हितासाठी तिच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याचा निर्धार केला तर पहिली अडचण दूर होऊ शकेल. तसे होणार नसेल तर वर्गीय संरचनेमुळे निर्माण होणारे विशिष्ट हितसंबंध मोडून काढण्यासाठी समाजामधून नव्या सामाजिक आणि राजकीय शक्ती जागृत होऊन त्यांनी सरकारला आवश्यक ती राजकीय इच्छाशक्ती आणि बळ पुरविले पाहिजे. या दोन घटनांचा काही प्रमाणात समन्वय होणे शक्य आहे आणि त्यातूनही अपेक्षित परिवर्तन घडून येऊ शकेल. यापैकी अखेरीस कोणती घटना घडून येईल आणि ती केव्हा घडून येईल आणि देशातील सर्व मुलांना सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देईल, यासंबंधीचा अंदाज ज्याचा त्याने बांधायचा आहे.

ते काहीही असो, या कार्यावर ज्यांची श्रद्धा आहे त्यांनी आपले कर्तव्य करीत राहून भारतात सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण शक्य तितक्या लवकर उपलब्ध व्हावे यासाठी झगडले पाहिजे. असे झगडत राहणे वरकरणी निरर्थक वाटले तरी, सक्तीच्या शिक्षणासंबंधीच्या आपल्या विधेयकाच्या वेळी, अपयश येत असतानाही निर्धाराने झुंजताना गोखले यांना जी जिद्द आणि जे समाधान लाभले तीच जिद्द आणि तेच समाधान या कार्यकर्त्यांनाही लाभेल हे निश्चित. उन्मत्त बहुमताच्या आधारावर सरकार आपले हे विधेयक लवकरच फेटाळून लावणार आहे हे पक्के माहीत असूनही, चर्चेला उत्तर देताना गोखले यांनी पुढील संस्मरणीय उद्गार काढले :

> आजचे कामकाज संपण्यापूर्वी माझे हे विधेयक फेटाळून लावण्यात येणार आहे हे मला माहीत आहे. त्याबद्दल मला काहीच तक्रार करायची नाही. तरी देखील मी हताश झालेलो नाही. खुद्द इंग्लंडमध्ये देखील, १८७० चा कायदा संमत होण्यापूर्वी किती अमाप प्रयत्न करावे लागले होते हे मला माहीत असल्यामुळे, मला तक्रारही करायची नाही किंवा निराश व्हावेसेही वाटत नाही. शिवाय, अपयश पत्करूनही आमच्या पिढीतील लोक देशाची सेवा करू शकतात असेच मी नेहमी मानत आलेलो आहे; तसे मी

बोलूनही दाखविले आहे. यशसिद्धीने देशाची सेवा करण्याचे भाग्य पुढल्या पिढ्यांमधील स्त्री-पुरुषांना लाभणार आहे. देशाच्या वाटचालीमध्ये आम्हाला जे काही स्थान मिळेल ते आम्ही आनंदाने स्वीकारलेच पाहिजे. हे विधेयक आज फेटाळण्यात आले तरी ते पुन्हा पुन्हा मांडण्यात येईल, आणि साऱ्या देशभर ज्ञानाचा प्रकाश पाडणारे हे विधेयक मंजूर होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही. कदाचित आमचे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरणारही नाही; कदाचित असेही होईल की जे कार्य आम्हाला प्रिय आहे त्याला अप्रत्यक्ष चालना द्यायलाही आमचे प्रयत्न साहाय्यभूत ठरणार नाहीत. समुद्रकिनाऱ्यावर नांगरट करण्याइतकाच तो विफल प्रयोग ठरू शकेल. आमच्या प्रयत्नांचे भवितव्य काहीही होवो; एक गोष्ट स्पष्ट आहे : आम्ही कर्तव्य पार पाडले हे आमचे समाधान कोणीच हिरावून घेऊ शकणार नाही. जेव्हा कर्तव्याची हाक स्पष्ट ऐकू येते तेव्हा मुळीच प्रयत्न न करण्यापेक्षा प्रयत्न करून अयशस्वी होणे अधिक चांगले असते.[२३]

ꕥ ꕥ

२३. कर्वे आणि आंबेकर, पृष्ठ १३१–२.





# कार्यानुभव*

६०. महात्मा गांधींनी प्रवर्तित केलेल्या मूलोद्योग शिक्षणपद्धतीचा कार्यानुभव हा गाभा होता. शिक्षण आयोगाने देखील त्याची शिफारस केलेली असून तात्त्विक दृष्टीने सर्वांचा पाठिंबा या शिफारशीला मिळाला आहे. पूर्वी केले गेलेले सर्व प्रयोग विचारात घेऊन आणि इतर देशांच्या या संबंधीच्या अनुभवांपासून योग्य तो बोध घेऊन, कार्यानुभव प्रत्यक्ष अमलात आणण्यासाठी एका शक्य अशा कार्यक्रमाची आता खरी गरज आहे.

६१. या विषयासंबंधी आम्ही पुढील शिफारशी करीत आहोत :

(१) १ ते १० वर्गांसाठी देण्यात येणाऱ्या सर्वसाधारण शिक्षणाचा कार्यानुभव हा एक महत्त्वाचा आवश्यक भाग असावा. एक पंचमांशापासून एक षष्ठांशापर्यंत इतका, एकूण वेळेपैकी, वेळ त्यासाठी राखून ठेवण्यात यावा. शिकविला जाणारा आणि परीक्षेसाठी असा हा विषय असावा.

(२) १ ते ५ या वर्गांसाठी सोपे हस्तव्यवसाय आणि कार्यानुभव यांचा समावेश असावा. त्यात परसातील बागकाम, फुलांची मशागत, मातीकाम, लगदाकाम, कागदकाम, पुठ्ठाकाम, तयार सुतापासून साधे विणकाम करणे, सोपे विणकाम इ. समावेश असावा. या स्तरावर उत्पादन कमी असून वाया जाण्याचे प्रमाण मोठे असते. कार्यानुभवाला या स्तरावर फक्त शैक्षणिक मूल्य आहे आणि त्यापासून मोबदला मिळालाच तर तो फार अल्प राहील.

(३) ६ ते १० इयत्तांत मात्र कार्यानुभवाला विशेष अर्थ प्राप्त होतो. पांढरपेशा वृत्ती या काळातच निर्माण होतात आणि त्यांचा विकास करण्यासाठी कार्यानुभवावर विशेष जोर देणे आवश्यक ठरते.

* हा उतारा, 'जम्मू आणि काश्मीर राज्यातील शिक्षणाचा विकास' या अहवालातील आहे. राज्य सरकारने स्थापन केलेल्या समितीचा अहवाल, १९७२.

(४) ६ ते १० इयत्तांसाठी शक्य तितका विविध प्रकारचा कार्यानुभव देण्याची सोय करण्यात यावी. त्यात शेती (त्यात बागकाम आलेच), रेशम-किड्यांचे संगोपन, फळे टिकविणे, विणकाम, (सुती आणि लोकरीचे), शिवणकाम, भरतकाम, गब्बा तयार करणे, गालीचे आणि दुल्या तयार करणे, लाकूडकाम, लगदाकाम, मेंढीपालन, मत्स्यपालन, स्थानिक हस्तोद्योग, स्थानिक उपयोगाच्या विजेच्या आणि यांत्रिक कामाचे शिक्षण, विद्युत्परिमाणूशक्तीचा वापर इ. गोष्टी असाव्यात. कार्यानुभवाची निवड करताना त्याचे स्थानिक जीवनातील महत्त्व, उपयोग आणि बाजारातील मागणी हे निकष मुख्यतः विचारात घ्यावेत.

(५) कार्यानुभव हा इतर विषयांपासून अलग असा विषय राहू न देण्याची दक्षता घ्यावी. त्याचा अर्थ असा नाही की सर्व विषयांशी त्याचा समन्वय साधलाच पाहिजे किंवा तो शिक्षणाचे माध्यम झाला पाहिजे. आमची अपेक्षा अशी आहे की या कार्यक्रमाची शास्त्रीय आणि तांत्रिक बैठक चांगली तयार व्हावी आणि तो अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून संबंधित विषयांच्या बरोबर शिकविला जावा. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाच्या एखाद्या भागाचा जर अन्य विषयांशी संबंध येत असेल तर तोही लक्षात आणून देणे आवश्यक आहे.

(६) बहुतेक ग्रामीण भागातील शाळांत शेती हा कार्यानुभव राहील. म्हणून जमीन धारणा कायदा अमलात आणताना, शाळांना पुरेशी जमीन उपलब्ध होईल याकडे योग्य ते लक्ष पुरविणे आवश्यक आहे.

६२. कार्यानुभव शाळेत सुरू करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाची सुधारणा आवश्यक आहे ती शिक्षकासंबंधी. पूर्वी अशी एक प्रथा होती की शिक्षकांना विविध मुदतीच्या हस्तव्यवसायाचे वर्गातून शिक्षण देण्यात येत असे आणि मग ते शिक्षक कार्यानुभवाचे शिक्षण आपापल्या शाळांतून देत असत. सामान्यतः हा कार्यक्रम यशस्वी झालेला दिसत नाही. बहुतांश शिक्षक प्रचलित शिक्षणपद्धतीचे शिक्षण घेऊन बाहेर पडलेले असल्याने त्यांना या कामात रुची नसते. त्यांचे हस्तव्यवसायाचे तांत्रिक ज्ञानही निकृष्ट दर्जाचे असते. साहजिकच पुष्कळ अंशी शिक्षक हस्तव्यवसायास लागणारी हत्यारे दुरुस्त करू शकत नाहीत; स्वतः चांगल्या वस्तू बनवू शकत नाहीत किंवा योग्य रीतीने शिकवूही शकत नाहीत. तेव्हा आम्हाला असे वाटते की केवळ प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांनीच कार्यानुभव शाळेत न शिकविता, त्यांच्या जोडीने पूर्णवेळ किंवा अर्धवेळ तज्ञ, कुशल अशा हस्तव्यवसायनिपुण कारागिरांनाही कार्यानुभव शिकविण्यासाठी शाळेत नेमावे व त्यांना पगार किंवा मुशाहिरा देण्यात यावा. अशा व्यक्ती नेमताना त्यांचे हस्तव्यवसायातील कौशल्य हा निकष सर्वात महत्त्वाचा मानावा. सुरुवातीस नेमणुका करताना अशा व्यक्ती निरक्षर असल्या तरी चालतील. नेमणुकीनंतर त्यांना थोडे-



फार शिक्षण देण्यात यावे व त्यासाठी ते आनंदाने तयार होतील. पण नेमणुका करताना किंवा त्यांची नोकरी चालू ठेवताना, त्यांचा शैक्षणिक दर्जा किंवा अशा प्रकारच्या शिक्षणाचा अभाव, अडसर ठरता कामा नये. हस्तव्यवसायाविषयी आवड निर्माण व्हावी आणि शाळेतही त्या दृष्टीने योग्य वातावरण निर्माण व्हावे म्हणून शिक्षकांना हस्तव्यवसायाचे प्रशिक्षण देण्यास हरकत नाही. १ ते ५ इयत्तांमध्ये त्यांनी प्रारंभीचा हस्तव्यवसाय शिकवायलाही हरकत नाही. ज्यांच्यापाशी वरच्या वर्गांना हस्तव्यवसाय शिकविण्याची क्षमता असेल त्यांनी तो शिकवावा. पण ६ ते १० या वर्गांत शक्यतो कुशल हस्तव्यावसायिकांनी तो शिकवावा असे आम्हाला वाटते. कारण या स्तरावर उच्च पातळीवरील दर्जा अपेक्षित असतो तो मुख्यतः प्रत्यक्ष शिकविताना आणि विद्यार्थ्यांनी सराव करताना.

६३. दुसरा महत्त्वाचा बदल सुचवायचा म्हणजे शाळेत सुरू करण्यात आलेल्या कार्यानुभवाच्या कार्यक्रमासंबंधीची राज्य शासनाची जबाबदारी. यासाठी लागणारी आवश्यक ती साधने शासनाकडून पुरवावी लागतील आणि ती व्यवस्थितपणे ठेविली जात आहेत किंवा नाहीत यासाठी योग्य ती देखभाल करणारी व्यवस्था निर्माण करावी लागेल. त्याचप्रमाणे कच्चा माल पुरविणे आणि तयार मालाची बाजारात विक्री करणे या जबाबदाऱ्याही शासनाला उचलाव्या लागतील. या कामासाठी लागणारे सुरुवातीचे भांडवलही शासनाने पुरवावे. यासाठी शिक्षण खात्यात या सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी योग्य अशी अधिकृत यंत्रणा हवी हे उघड आहे. पूर्वी या जबाबदाऱ्या शासनाने स्वीकारून पार पाडलेल्या नाहीत. साहजिकच हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी शाळांच्याजवळ पुरेशी साधने नव्हती आणि परिणामी आर्थिक आणि गुणवत्तेच्या बाबतीत त्यांना नुकसान सोसावे लागले.

६४. आमची तिसरी महत्त्वाची सूचना म्हणजे विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीतून येणारी रक्कम या कार्यानुभवाच्या कार्यक्रमांशी निगडीत असलेल्या विद्यार्थ्यांना मोबदला म्हणून वाटण्यात यावी. पूर्वी या बाजूकडे लक्ष दिले गेले नाही. या कार्यक्रमांची अंमलबजावणी आणि व्यवस्थापन इतके वाईट झाले की वाटून देण्यासाठी नफाच उरला नव्हता आणि जरी थोडाफार नफा झाला तरी तो सरकारी तिजोरीत जमा केला जात असे. नफा ठरविताना उदार धोरण स्वीकारण्यात यावे. कच्च्या मालाला लागणारी किंमत आणि तयार मालाची किंमत यातील फरक हा नफा मानला जावा. साधनांची झीज, भांडवलावरील व्याज किंवा या सोयी पुरविण्यावर झालेला खर्च इ. बाबी त्यातून वजा करण्यात येऊ नयेत. दुसरी गोष्ट म्हणजे हा नफा विद्यार्थ्यांना मोबदल्याच्या स्वरूपात वाटणे हे उत्तेजन देण्यासारखे ठरेल. त्यामुळे या कार्यक्रमांत ते अधिक रस घेऊ लागतील. तसेच वस्तूंच्या किंमतीची जाणीव आणि त्या अनुरूप वृत्ती यांचा विकास होऊन उद्योजक

वृत्तीची वाढ विद्यार्थ्यांत होईल. यायोगे पालकही आपल्या मुलांच्या शिक्षणात अधिक लक्ष घालू लागतील. त्याचा परिणाम मुलांचा नियमितपणा आणि हजेरी यांच्यावर होईल आणि सर्वसामान्यतः लोक शिक्षणपद्धतीशी अधिकाधिक समरस होऊ लागतील.

६५. चौथा महत्त्वाचा बदल आम्हाला सुचवायचा तो असा की सर्वसामान्य शिक्षणासाठी जो वेळ ठरविण्यात आला असेल त्यापेक्षा अधिक व्यापक वेळ कार्यानुभवासाठी उपलब्ध करून देण्यात यावा. प्रत्येक विद्यार्थ्याला कार्यानुभवाच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे लागेल. मात्र हस्तव्यवसाय नेहमीच्या शाळेच्या वेळेपूर्वी किंवा त्या वेळेनंतर करण्याची त्याला मुभा असावी. वेळेची निवड विद्यार्थ्यांवर सोपवावी. त्याचप्रमाणे रविवारच्या सुट्टीच्या दिवशी किंवा अन्य सुट्टीच्या दिवसांत शाळेत येऊन त्याला हस्तव्यवसाय करता यावा. त्याचप्रमाणे मोठ्या सुट्टीच्या अवधीतही शाळेत येऊन त्याला आपला हस्तव्यवसाय करता यावा. हा कार्यक्रम, उत्पादन केंद्र धर्तीवर आखण्यात येऊन त्यातून निर्माण होणाऱ्या उत्पन्नातून त्याला थोडे फार द्रव्यसाहाय्य, वर सांगितल्याप्राणे मिळावे. शाळेव्यतिरिक्तच्या वेळात, भरपूर अवधीपर्यंत हस्तव्यवसाय करण्याची वृत्ती त्याच वेळेला वाढेल की विद्यार्थ्यांचे त्या कामातील कौशल्य वाढले आहे आणि आपण स्वतः काम करून पैसे मिळवतो याचा त्याला प्रत्यय येईल तेव्हा. आमची अशी खात्री आहे की या सूचनांचा जर स्वीकार झाला तर मोठ्या प्रमाणात विद्यार्थी निरनिराळ्या श्रेणीत मोबदला मिळवतील आणि त्याचवेळी त्यांचे शिक्षणही चालू राहील. ही फार चांगली गोष्ट होईल आणि यामुळे शिक्षणाच्या दर्जातही वाढ होईल.

६६. १० व्या इयत्तेनंतर कार्यानुभव हा सक्तीचा राहाणार नाही किंवा अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणूनही असणार नाही. तरी देखील उच्च माध्यमिक स्तरावर, महाविद्यालयात आणि विद्यापीठात विद्यार्थ्यांना स्वतः कमाई करून शिकण्याची संधी मिळाली पाहिजे. कारण माध्यमिक शाळेत ज्यांनी कार्यानुभवाच्या कार्यक्रमात भाग घेऊन कमाई करून शिक्षण केले आहे असे विद्यार्थी उच्च माध्यमिक शाळात, महाविद्यालयात किंवा विद्यापीठात येतील. म्हणून आमची शिफारस अशी आहे की निवडक कार्यानुभवावर आधारलेली उत्पादन केंद्रे उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे या ठिकाणी स्थापन करणे आवश्यक आहे. ज्यांनी विशेष कौशल्य आत्मसात केले आहे व हे काम करण्यात ज्यांना रस वाटतो अशांना सवडीप्रमाणे काम करण्यास या केंद्रांतून प्रवेश मिळाला पाहिजे. येथेही शासनाने आवश्यक तो कच्चा माल, साधनसामग्री आणि शिक्षक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे तयार माल घेऊन त्याची विक्रीही केली पाहिजे.



यातून होणारा फायदा वर निर्देश केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना वाटून मिळाला पाहिजे. विशिष्ट माल विकणाऱ्यांच्या सहकार्याने अशी केंद्रे स्थापन करणे शक्य आहे.

६७. या कार्यक्रमाचा विस्तार सर्व शिक्षणसंस्थांपर्यंत जाऊन पोचला पाहिजे आणि त्यात सर्व विद्यार्थ्यांचा समावेश झाला पाहिजे. अर्थात हे ताबडतोब करता येणे शक्य नाही. म्हणून आमची सूचना अशी आहे की प्रायोगिक पातळीवर बऱ्याच मोठ्या प्रमाणात याची सुरुवात करणे इष्ट ठरेल, आणि तीही शक्य तितक्या लवकर. १९७३–७४ मध्येच वर निर्देश केल्याप्रमाणे प्रारंभ व्हावा.

(१) एका शाळा-तपासनीसाच्या अधिकारकक्षेत येणाऱ्या कमीत कमी दोन प्राथमिक शाळांत आणि एका निम्न माध्यमिक शाळेत कार्यानुभवाची सुरुवात करावी. त्यामुळे देखरेख करणे सुलभ होईल व कामाचा व्याप आटोक्यात राहून व्यवस्था पाहाता येईल.

(२) सुमारे बारा प्रकारचे कार्यानुभव निवडून, सुमारे शंभर माध्यमिक शाळांतून ते, स्थानिक परिस्थितीला मिळतेजुळते असे, सुरू करण्यात यावेत. हा कार्यक्रम सहज अमलात आणण्यासारखा आहे. अवघड कार्यानुभवाचे शिक्षण देण्यासाठी आवश्यक असे कुशल कारागीर उपलब्ध होणे हा निकष लावावा लागेल व त्यामुळे त्याचे कार्यक्षेत्र ठरविणे सुलभ होईल.

(३) शाळेत एखादा असा कार्यक्रम सुरू केला तर तो सर्वांसाठी सक्तीचा करण्याची गरज नाही. सुरुवातीला सहभागी होणे ऐच्छिक ठेवावे; पण तीन वर्षांच्या अवधीत सर्व विद्यार्थ्यांना तो आवश्यक केला जावा.

६८. आमची शिफारस अशी आहे की कार्यानुभवाचा तपशीलवार आराखडा तयार करून तो व्यवस्थित अमलात आणण्यासाठी या खास कामावर योग्य व्यक्तींची नेमणूक पुढील वर्षापासून करण्यात यावी. काही काळानंतर शिक्षण खात्यातच योग्य आणि कार्यक्षम यंत्रणा निर्माण करणे व त्याद्वारे कार्यानुभवाच्या सर्व कार्यक्रमांचे व्यवस्थापन करणे हे कार्य करावे लागेल.

६९. प्रयोग किती प्रमाणावर केला जातो याला महत्त्व नसून त्याची गुणवत्ता ही महत्त्वाची गोष्ट आहे. वर नमूद केलेली मूलभूत तत्त्वे जर योग्य तऱ्हेने पाळली गेली तर कार्यानुभवाचे कार्यक्रम यशस्वी होतील आणि आपल्या शिक्षणपद्धतीला नवे वळण लागेल. मिळालेल्या अनुभवांच्या आधारे मग इतर संस्थांत त्यांची अमलबजावणी करता येईल. या दशकाच्या अखेरीपर्यंतचे उद्दिष्ट असे हवे की कार्यानुभवाचे कार्यक्रम सर्व संस्थांत सुरू व्हावेत आणि त्यांच्याशी सर्व विद्यार्थी निगडीत केले जावेत.

परिशिष्ट २

# शैक्षणिक नियोजन आणि विकास यांमधील शिक्षकांची भूमिका

आपल्याला चार पंचवार्षिक योजनांचा आणि तीन वार्षिक योजनांचा अनुभव आहे. शिक्षकांच्या दृष्टीने बोलावयाचे तर आणखी आखणी आणि अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने यापैकी कोणत्याही योजनेशी शिक्षक सक्रिय रीतीने सहभागी झालेले नाहीत. शैक्षणिक नियोजनाची आखणी आणि अंमलबजावणी यांपासून शिक्षक अलिप्त राहणे हा आपल्या शिक्षणपद्धतीतील फार मोठा कच्चा दुवा आहे. या परिस्थितीत दुरुस्ती केल्याशिवाय मोठ्या प्रमाणात शिक्षणाचा विकास घडवून आणणे शक्य होणार नाही.

शिक्षणविषयक नियोजनाची आखणी आणि अंमलबजावणी यात शिक्षकांचा सक्रिय भाग असावा हे तत्त्व अपवाद करण्यासारखे नाही, हे सर्व संबंधितांनी मान्य केलेले आहे. पण ते प्रत्यक्षात आणले गेले नाही ते तीन मुख्य कारणांमुळे. पहिले असे की यासाठी संस्थात्मक यंत्रणा निर्माण करून त्याद्वारे सर्व शिक्षकांना प्रभावीपणे शैक्षणिक नियोजनाची आखणी आणि अंमलबजावणी करण्यात सहभागी होता येईल याचा विचारच कधी केला गेला नाही. दुसरे कारण असे की दर्जाच्या दृष्टीने शिक्षकांचे इतके अनेक प्रकार आहेत की त्यामुळे हा व्यवसाय कमजोर बनला आणि त्यामुळे या कार्यक्रमात सहभागी होण्याची त्याची क्षमताच कमी झाली. आणि तिसरे कारण म्हणजे शैक्षणिक नियोजन आणि विकास यांच्याशी निगडीत अशा समस्यांबद्दल शिक्षकांची अनास्था आणि यासाठी आवश्यक असणारा व्यासंग आणि नेतृत्व या गुणांचे संवर्धन करण्यात शिक्षकांना आलेले अपयश हे होय. शैक्षणिक नियोजन आणि विकास या कार्यात शिक्षकांना नेतृत्व करावयाचे असेल तर वरील उणीवा नाहीशा केल्या पाहिजेत. त्यायोगे शिक्षणाचा फायदा तर होईलच, शिवाय शिक्षकांचा स्वतःचा दर्जाही वाढेल.

सध्याची शैक्षणिक नियोजनाची पद्धती शिखरकेंद्रित असून ती उलटी करून ठेवलेल्या पिरॅमिडसारखी दिसते. कारण बहुतेक सर्व नियोजन राष्ट्रीय किंवा



राज्य पातळीवर केले जाते. ही नियोजनाची प्रक्रिया विकेंद्रित आणि व्यापक पायावर व्हावी म्हणून आणखी दोन पातळ्यांवर- जिल्हा आणि संस्थानिहाय- योजना तयार केल्या जाणे आवश्यक आहे. जर या चार पातळ्यांवर सुसूत्र असे नियोजन केले गेले तर त्याची फलनिष्पत्ती चांगली होईल. त्याचप्रमाणे नियोजन वरच्या पातळीवरुन खालपर्यंत आणि खालपासून वरपर्यंत असे होत गेले पाहिजे.

## १. संस्थानिहाय नियोजन

या नव्या पद्धतीने केलेल्या नियोजनाचा पाया संस्थानिहाय नियोजनातून तयार होईल. एक संस्था दुसऱ्या संस्थेसारखी असते यावर विश्वास ठेवायला मी तयार नाही; किंबहुना प्रत्येक विद्यार्थ्याप्रमाणे प्रत्येक शैक्षणिक संस्थेला स्वतःचे असे वेगळे व्यक्तिमत्व असते. तेव्हा प्रशासन–पद्धती अशी हवी की योग्य दिशेने प्रत्येक संस्थेला स्वतःच्या विकासाची योजना तयार करण्यास उत्तेजन आणि मार्गदर्शन मिळेल.

संस्थानिहाय योजना तयार करण्यासाठी योग्य अशा तंत्रांचा विकास करणे आवश्यक आहे. खरा धोका हा आहे की संस्थांच्या योजनांना केवळ मागण्यांच्या खालची अवकळा येईल आणि त्या पूर्ण करणे कोणत्याही शासनव्यवस्थेच्या शक्तीबाहेरचे होईल. हे टाळण्याची दक्षता घ्यावी लागेल. संस्थानिहाय योजना या ' कृतिमूल असा कार्यक्रम ' म्हणून तयार कराव्या लागतील आणि आज उपलब्ध असलेल्या साधनांच्या बळावर किंवा व्यावहारिक दृष्ट्या शक्य अशा आणखी मिळणाऱ्या साहाय्यावर शाळांना त्या हाती घेता येतील. किंबहुना संस्थांच्या योजनांचा प्रारंभच मुळी पुढील प्रश्नाच्या अनुरोधाने व्हावा. तो प्रश्न असा : आज उपलब्ध साधनांच्या बळावर किंवा त्यात थोडीशी शक्य अशी भर घालून तुम्ही काय करू शकाल ? हा प्रश्न क्वचितच विचारला जातो. पण संस्थांचा काळजीपूर्वक अभ्यास केल्यावर असे आढळून येते की उपलब्ध अशा भौतिक आणि आर्थिक साधनांच्या बळावर करता येण्याजोग्या अशा असंख्य गोष्टी आहेत की ज्या प्रत्येक संस्थेला करणे शक्य आहे. पण त्यासाठी कर्तव्यबुद्धीची जाणीव, प्रभावी कल्पनाशक्ती, आणि एखादी समस्या सोडविण्यासाठी कठोर परिश्रम करण्याची तयारी यांची जोड दिली गेली पहिजे. म्हणून संस्थानिहाय योजना तयार करण्यासाठी या दृष्टिकोनावर भर देणे आवश्यक आहे.

एखाद्या राज्यात संस्थानिहाय योजनापद्धती सुरू करण्यासाठी कोणत्या उपायांची गरज आहे ? या संबंधी राज्य शासनांच्या विचारार्थ काही सूचना पुढे नमूद केल्या आहेत :

(१) प्रत्येक संस्थेने आपल्या विकासाची एक दीर्घकालीन योजना तयार करावी अशी अट अनुदान संहितेत व मंजुरी देताना घालण्यात यावी. या योजनेच्या पार्श्वभूमीवर, राज्याच्या पंचवार्षिक योजनेशी सुसंगत अशी एक पंचवार्षिक योजना आणि पुढील वर्षात कोणत्या गोष्टी हाती घेणार हे दर्शविणारी वार्षिक योजना संस्थेने तयार करावी.

(२) या योजनांच्या आधारे संस्थेची वार्षिक तपासणी करण्यात यावी. वेळोवेळी होणाऱ्या तपासणीचे उद्दिष्ट असे असावे की उपलब्ध साधनसामग्रीच्या बळावर अधिकाधिक चांगल्या योजना कशा तयार करण्यात येतील या संबंधीचे मार्गदर्शन तपासणीच्या वेळी मिळावे, आणि त्यांची यशस्वी अंमलबजावणी करण्यासंबंधी सल्ला मिळावा. यामुळे आजच्या जुजबी तपासणीचे स्वरूप पालटून जाईल.

(३) राज्य शिक्षण खात्याने योजना तयार कशा कराव्यात या संबंधी मार्गदर्शक आराखडे प्रसृत करावेत. त्यात राज्याने ठरविलेली धोरणे सूचित व्हावीत. म्हणजे संस्थांच्या योजनात शासकीय योजनांचे योग्य असे स्वरूप उमटणे शक्य होईल. परंतु हे स्पष्ट केले जावे की राज्य शासनाने सूचित केलेली रूपरेषा शिफारसवजा राहील; पालन करावयाचे आदेश असे तिचे स्वरूप असणार नाही. विशिष्ट कारणासाठी, आराखड्यात सूचित केलेला कार्यक्रम न स्वीकारणे, सुचविलेल्या कार्यक्रमात काटछाट करणे किंवा आराखड्यात नमूद न केलेला एखादा नवीन कार्यक्रम हाती घेणे या बाबतीत शाळेला मुभा असावी.

(४) सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे राज्य सरकारच्या तपासणी अधिकाऱ्यांना आणि मुख्याध्यापकांना कार्यक्रमासंबंधीचे योग्य प्रशिक्षण देण्याची व्यवस्था ही होय. राज्य शिक्षण शास्त्र संस्थेकडे ही जबाबदारी सोपवावी.

(५) आपल्याला सोयिस्कर वाटेल अशी दीर्घ मुदतीची योजना संस्था तयार करील व तिची अंमलबजावणीही करील. वर सांगितल्याप्रमाणे संस्थेच्या पंचवार्षिक योजना राज्य योजनांशी सुसंगत असाव्यात. वार्षिक योजना तयार करण्यासाठी शालेय वर्षातील निश्चित काळ ठरविण्यात यावा.

ही कालमर्यादा केवळ सूचक आहे. नेमका काळ हा संस्थेच्या गरजेप्रमाणे ठरविणे शक्य आहे. शालेय वर्गाचा सुरुवातीचा आणि शेवटचा आठवडा यासाठी राखून ठेवण्यात यावा. त्यासाठी पुढील पद्धत उपयोगी होईल :

(अ) शिक्षकांसाठी शाळा ठरलेल्या दिवशी सुरू होईल; पण विद्यार्थी मात्र एका आठवड्यानंतर येतील. म्हणजे शाळा सुरू झालेल्या पहिल्या आठवड्यात प्रत्येक वर्गावर शिक्षक जात नसले तरी ते कामावरच आहेत असे मानणे सयुक्तिक ठरेल. या काळात सतत सभा, चर्चा होऊ वार्षिक योजना, तपशीलवार तयार केली जाईल. त्यात अभ्यासानुवर्ती, अभ्यासविषयक वर्ग–योजना, विषय–योजना आणि हाती घ्यावयाचा कार्यक्रम तपशीलासकट नोंदणे यांचा समावेश असेल.



(ब) शालेय वर्षाच्या अखेरीस एका आठवडा शिक्षक कामावर असतील, पण विद्यार्थ्यांना मात्र सुट्टी दिली जाईल. या आठवड्यात अंमलबजावणी केलेल्या वार्षिक योजनांचे काळजीपूर्वक मूल्यमापन केले जाईल.

या सूचनेचा अर्थ असा की शिक्षकांपेक्षा विद्यार्थ्यांना दोन आठवडे अधिक सुट्टी मिळेल. असे वाटेल की यामुळे शिकविण्याचा वेळ कमी झालेला आहे. पण जास्त नसली तरी गुणवत्तेच्या वाढीने या काळाची पुरेपूर भरपाई झालेली आहे असे दिसून येईल.

(६) वर्षाच्या आरंभी तयार केलेल्या वार्षिक योजनांचे अहवाल तपासणी अधिकाऱ्यांना लगोलग उपलब्ध होणे आवश्यक आहे. तसेच वर्षअखेरच्या मूल्यमापनाचे अहवालही त्यांना अल्पावधीत मिळाले पाहिजेत. या योजनांवर, मूल्यमापनावर शिक्षक आणि संस्थाचालक व आवश्यक असेल तेथे विद्यार्थी यांच्या समवेत चर्चा होणे हे तपासणीचे मुख्य कार्य राहील.

(७) संस्थांच्या योजनांच्या संदर्भात आवर्जून सांगण्यासारखा मुद्दा म्हणजे त्यांची यशस्वी अंमलबजावणी. फार मोठ्या महत्त्वाकांक्षी योजना आखायची प्रवृत्ती सामान्यतः दिसून येते. कागदावर त्या निर्दोष दिसतात. पण त्यांची अंमलबजावणी मात्र निष्काळजीपणे केली जाते. ही प्रवृत्ती वाढण्याचे कारण म्हणणे तपासणी अधिकारी शाळांवर अनेक कार्यक्रम हाती घेण्याची सक्ती करतात. त्यातून अपरिणामकारक अंमलबजावणी, अकार्यक्षमता, आणि अर्धवट काम करण्याची प्रवृत्ती हे दोष निर्माण होतात. त्यामुळे मूळच्या गुणवत्तापोषक अशा या कार्यक्रमाची उपयुक्तता नष्ट होते. हे दोष घालविण्यासाठी, 'अपयश हा गुन्हा आहे, पण मर्यादित ध्येय बरे' हा विचार सतत डोळ्यांसमोर हवा. इच्छेप्रमाणे छोट्या योजना आखण्याची मुभा शाळांना असावी आणि महत्त्वाकांक्षी योजना त्यांच्यावर लादण्याचा प्रयत्न होता कामा नये. योजना कोणत्याही स्वरूपाची असो, तिची अंमलबजावणी अत्यंत कार्यक्षमतेने केली पाहिजे असा आग्रह धरला पाहिजे. सुरुवात जरी लहान गोष्टींनी झाली तरी आलेल्या अनुभवाच्या जोरावर आणि यशस्वी अंमलबजावणीतून अपरिहार्यपणे निर्माण होणाऱ्या आत्मविश्वासावर, संस्था भावी काळात महत्त्वाकांक्षी योजना हाती घेऊ शकेल. या दिशेने विकास होईपर्यंत थोडा धीर धरला तर त्याचे इष्ट परिणाम होतील.

(८) संस्थांच्या योजना तयार करीत असताना त्या लोकशाही पद्धतीने तयार करण्यावर भर दिला पाहिजे; आणि संबंधित असे सर्व घटक या कार्याशी

निगडीत केले गेले पाहिजेत. ही जबाबदारी मुख्यतः मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांची असली तरी संस्थेच्या कार्यकारी मंडळाला या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावायची आहे. मुख्याध्यापकांनी शिक्षकांना या कामात सहभागी करून घेतले पाहिजे. किती तरी कार्यक्रमांत स्थानिक समाजाला देखील सहभागी करून घ्यावे लागेल. काही कार्यक्रमांत विद्यार्थ्यांचा सहभाग प्राप्त करावा लागेल. शैक्षणिक सोपानाच्या वरच्या पातळ्यावर या गोष्टींना फार महत्त्व आहे. शैक्षणिक संस्थेची योजना म्हणजे या सर्व निगडीत करून घेतलेल्या घटकांच्या सहकार्याची निष्पत्ती आहे, हे लक्षात घेणे अगत्याचे आहे.

संस्थानिहाय योजना ही मूलभूत कल्पना यशस्वी व्हावयाची असेल तर अनेक दृष्टिकोनातून पावले टाकावी लागतील. त्यापैकी महत्त्वाच्या अशा पुढील गोष्टी आहेत :

(१) राज्याच्या शिक्षण खात्यांना एका नव्या दृष्टिकोनाचा लाभ करून देणे आवश्यक आहे. ताठरपणा आणि एकसाचीपणा यावर भर देण्याच्या त्यांच्या वृत्तीच्या जागी लवचिकपणा आणि गतिमानता येणे आवश्यक आहे. संस्थांनी आणि शिक्षकांनी स्वतः होऊन नवे उपक्रम करण्याला उत्तेजन दिले गेले पाहिजे. चांगल्या शाळा निवडून त्यांना भरघोस पाठिंबा, अधिक स्वातंत्र्य देऊन अधिक वरच्या दर्जाच्या बनण्यास साहाय्य करणे आणि त्याच वेळी दुर्बळ संस्थांना योग्य दर्जाच्या बनविण्यासाठी आवश्यक असे मार्गदर्शन आणि सल्ला देणे ही मुख्यतः त्यांची जबाबदारी आहे.

(२) संस्थांच्या योजनात भौतिक आणि आर्थिक बाबीत अधिक गुंतवणूक करण्याऐवजी मानवी परिश्रमांवर भर दिला गेला पाहिजे, हे खरे असले तरी हे आवर्जून सांगितले पाहिजे की राज्य शासनांनी शैक्षणिक संस्थांना उदारपणे अनुदाने देऊन अधिक साधने पुरविण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे. त्याचवेळी प्रत्येक संस्थेने आपल्या विकासासाठी स्वतःच्या साधनसंपत्ती-मध्ये भर घालण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

(३) संस्थानिहाय योजना या नव्या संकल्पनेचा विकास होण्यासाठी वेग-वेगळ्या शिक्षणसंस्थांनी एकमेकांना साहाय्य केले पाहिजे. या दृष्टीने शिक्षण आयोगाने शिफारस केलेला 'शाळा–समूह' हा कार्यक्रम लक्षात घेण्यासारखा आहे. या कार्यक्रमानुसार प्रत्येक माध्यमिक शाळा आपल्या परिसरातील प्राथमिक शाळांच्या सहकार्याने काम करील. मार्गदर्शन करणे, सल्ला देणे, सोयींचा लाभ सर्वांनी घेणे या द्वारे प्राथमिक शाळांना आपली सुधारणा घडवून आणता येईल. हीच गोष्ट वरच्या पातळीवर विद्यापीठे आणि महाविद्यालये यांच्या सहकार्याने त्या परिसरातील माध्यमिक शाळांमध्ये घडवून आणता येईल. आज शिक्षणाच्या



विविध पातळ्यांवरील शिक्षक एकमेकावर दोषारोप करण्यात मग्न असून आपापली जबाबदारी टाळीत आहेत. उदाहरणार्थ विद्यापीठे आपल्याकडे कच्चे विद्यार्थी धाडल्याबद्दल माध्यमिक शाळांना दोष देतात तर माध्यमिक शाळा हा दोष प्राथमिक शाळांना देतात. शिक्षण आयोगाने शिफारस केलेल्या 'शाळा–समूह' कार्यक्रमामुळे याला पायबंद बसेल आणि सर्व शैक्षणिक पातळ्या एकत्र येऊन परस्परांना साहाय्य आणि सेवा करू लागतील.

## (४) तपासणी मंडळ

प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या योजना तयार करताना, त्यांची अंमल-बजावणी करताना शिक्षकांचे मार्गदर्शन मिळविण्यासाठी योजावयाची दुसरी पद्धत म्हणजे 'तपासणी मंडळ' ही होय. शिक्षण आयोगाने या पद्धतीची शिफारस केलेली आहे. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांची वार्षिक तपासणी सध्या शिक्षण खात्याचे अधिकारी करतात. ही पद्धत चालू ठेवून, तिला पूरक म्हणून आयोगाने, दर तीन ते पाच वर्षांची करावयाच्या तपासणी मंडळ पद्धतीची शिफा-रस केली आहे. अशा मंडळात निवडक शिक्षक किंवा मुख्याध्यापक (ज्या शाळेची तपासणी करावयाची तिचे मुख्याध्यापक धरून) असतील व त्या मंडळाचा चिटणीस म्हणून खात्याचा एखादा अधिकारी काम पाहील. मंडळाने पुरेसा वेळ शाळेत घालवावा म्हणजे कामाचे योग्य मूल्यमापन करता येऊन मार्गदर्शन करणे शक्य होईल. याचा फायदा असा की ज्येष्ठ व कार्यक्षम शिक्षकांचा अनुभव आणि तज्ञ सल्ला यांचा लाभ दुसऱ्यांना होऊ शकेल.

## जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय योजना

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून हे स्पष्ट होईल की संस्थांच्या योजना तयार करण्यात आणि त्यांची अंमलबजावणी करण्यात शिक्षकांकडे नेतृत्व राहिले पाहिजे आणि इतर अधिकारी सहाय्यकाची भूमिका पार पडतील. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील योजना तयार करण्यात आणि त्यांची अंमलबजावणी कर-ण्यात त्या त्या पातळीवरील संबंधित योग्य असे अधिकारी नेतृत्व करतील. उदाहर-णार्थ शिक्षण आयोगाने शिफारस केल्याप्रमाणे, जिल्हा परिषद किंवा जिल्हा स्कूल बोर्ड जिल्हा पातळीवरील योजना तयार करण्यास आणि त्यांची अंमलबजावणी करण्यास जबाबदार राहातील. त्याचप्रमाणे राज्य शिक्षण योजना तयार करणे आणि तिची अंमलबजावणी करणे ही कामे राज्य शासन आणि त्याचे शिक्षण खाते करील, तर राष्ट्रीय योजनांची जबाबदारी भारत सरकार आणि शिक्षण मंत्रालय यांची राहील. पण शिक्षकांना या पातळ्यांवरदेखील प्रभावीपणे

सहभागी करून घेतले जाईल अशी दक्षता घेतली पाहिजे. या दृष्टीने पुढील सूचना करण्यात येत आहेत :

(१) जिल्ह्यातील शिक्षणविषयक विकास योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ज्यांची असेल त्या अधिकाऱ्यांनी शिक्षकांची जिल्हा सल्लागार मंडळे तयार करावीत. त्या मंडळांवर जिल्ह्यात काम करणाऱ्या शिक्षक संघटनांना प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. शिक्षणाचे नियोजन आणि विकास यासंबंधी या सल्लागार मंडळांचा सल्ला सर्व प्रश्नांबाबत घेण्यात यावा.

(२) त्याचप्रमाणे राज्य पातळीवर, राज्य सरकारने संयुक्त शिक्षक सल्लागार मंडळे स्थापन करावीत आणि त्यात राज्यात काम करणाऱ्या वेगवेगळ्या शिक्षक संघटनांना प्रतिनिधित्व दिले जावे. या मंडळांचा सल्ला पगार, कामाची परिस्थिती, शिक्षकांची नोकरी, त्याचप्रमाणे शिक्षणाचे नियोजन आणि विकास अशा सर्व प्रश्नांबाबत घेतला जावा.

(३) शिक्षण मंत्रालयाने राष्ट्रीय शिक्षक सल्लागार मंडळ स्थापन करून त्यात राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या सर्व शिक्षक संघटनांना प्रतिनिधित्व दिले जावे. राज्य पातळीवर काम करणाऱ्या संयुक्त शिक्षक सल्लागार मंडळाप्रमाणेच या मंडळाची कामे राहतील. या राष्ट्रीय पातळीवरील मंडळाला शिक्षणविषयक योजना तयार करताना व त्यांची अंमलबजावणी करताना पूर्णपणे सहभागी करून घेण्यात यावे.

संस्थानिहाय योजनापद्धती ही संपूर्ण नियोजन-प्रक्रियेचा पाया म्हणून स्वीकारली, शिक्षणाचे नियोजन आणि विकास यासंबंधी शिक्षकांचा सल्ला घेतला आणि संस्थात्मक यंत्रणा जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर वर सूचित केल्याप्रमाणे निर्माण केली गेली तर संपूर्ण शिक्षकवर्ग, शिक्षण योजना तयार करण्यात आणि तिची अंमलबजावणी करण्यात प्रभावीपणे सहभागी होत जाईल. या सर्व सूचना मुख्यत्वेकरून शिक्षण आयोगाच्या शिफारशींवर आधारलेल्या आहेत, आणि असा विश्वास वाटतो की त्यांचा स्वीकार संबंधित अधिकारीवर्गाकडून होईल.

## संघटित शिक्षकवर्ग

यानंतर निर्माण होतो तो फार महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आज शिक्षकवर्ग ही नवी जबाबदारी घेण्यास तयार आहे किंवा नाही. यासंबंधी माझ्या मनात संशय नाही. पण मला असे वाटते की शिक्षकांच्या कार्यक्षमतेवर उफराटा परिणाम झाला आहे तो स्थानानुसार केलेल्या विभागणीमुळे. विद्यापीठात काम करणारे शिक्षक एक स्वतंत्र वर्ग म्हणून अलग राहिला आहे. माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांचा



वेगळा गट आहे आणि माध्यमिक शिक्षकांच्या वेगळ्या संघटना आहेत. प्राथमिक शिक्षकांचा आणखी एक वेगळा गट आहे. या विविध गटांत आज कसलाच संवाद प्रस्थापित झालेला दिसत नाही. तसेच समान उद्दिष्टासाठी एकत्र येऊन कार्य करणे आणि परस्परांशी निकटचे संबंध प्रस्थापित करणे यासाठी संधी उपलब्ध होताना दिसत नाही. म्हणून अशा एखाद्या ( किंवा अनेक ) कार्यक्रमांची खरी गरज आहे की त्यायोगे सर्व स्थानभेद नष्ट होऊन, अध्यापनाचा व्यवसाय करणारे सर्व शिक्षक एकत्र संघटित होतील. शिक्षणविषयक योजना तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे या कामाच्या दृष्टीने फार मोठे साहाय्य करण्याचा अधिकार आणि सामर्थ्य संघटित होण्यामुळे लाभेल यात शंका नाही. मला जर कोणी विचारले की या क्षणी भारतातील सर्व शिक्षकांनी कोणत्या एका गोष्टीकडे आपले सर्व लक्ष केंद्रित करावे तर, मार्क्सच्या जाहीरनाम्यात थोडा बदल करून म्हणावे लागेल की 'विविध पातळ्यांवरील शिक्षकांनो, संघटित व्हा!' भारतात आपण शिक्षकवर्ग कसा संघटित करू शकू ? त्यासाठी मूलतः दोन कार्यक्रमांची गरज आहे.

### (१) वृत्ति-परिवर्तन

शिक्षकांच्या वृत्तीत बदल घडवून आणणे हे पहिले काम. त्यांच्या वृत्तीवर जुन्या वसाहतवादी अवशेषांच्या परंपरेची किंवा जातीयतेची छाप पडलेली दिसते व तिचे प्रतिबिंब शिक्षणात उमटलेले आढळते. आपण उच्च वर्गाचे आहेत या भावनेने विद्यापीठात काम करणारे शिक्षक पछाडलेले दिसतात. जणू या व्यवसायातील ते ब्राह्मणच. त्यांच्यातही आपापसात विद्यापीठात नेमलेले शिक्षक, महाविद्यालयातील शिक्षक, सरकारी महाविद्यालयातील शिक्षक (त्यांच्यातही राजपत्रित वर्ग पहिला, वर्ग दुसरा आणि अराजपत्रित अशी विभागणी आहे ) असे गट आणि उपजाती आहेत. माध्यमिक शिक्षक हा मधला गट, म्हणजे या व्यवसायातील क्षत्रिय किंवा वैश्य. हे स्वतःला उच्च वर्गाचे मानून प्राथमिक शिक्षकांपासून दूर राहतात. महाविद्यालयातील शिक्षक होण्याची आकांक्षा जे माध्यमिक शिक्षक बाळगतात, त्यांना महाविद्यालयातील शिक्षक दूर अंतरावर ठेवतात. या पद्धतीतील सर्वात मोठा असा जो गट, प्राथमिक शिक्षकांचा, तो शूद्रांचा वर्ग होय. सर्व बाबतीत त्यांना तशीच वागणूक दिली जाते. उद्याच्या भारताने न्याय, स्वातंत्र्य आणि समता आणि व्यक्तीची प्रतिष्ठा यांवर आधारलेली नवी समाजरचना निर्माण करण्याची ईर्षा बाळगलेली आहे. अशा व्यवस्थेत या पारंपरिक आणि कालबाह्य वृत्तींना मुळीच स्थान मिळणार नाही. सर्व शिक्षकांचा मिळून एकच वर्ग राहील आणि त्यात ते सर्व समान असतील. या भ्रातृभावाचे संगोपन सर्वांना

जाणीवपूर्वक करावे लागणार आहे.

## (२) संस्थात्मक संरचना

वृत्तीत बदल घडवून आणणे अगर ती दीर्घकाळ प्रस्थापित करणे ही गोष्ट, जर या परिवर्तनाला अनुरूप असा संस्थेच्या संरचनेचा आधार लाभला नाही तर साध्य करणे अवघड आहे. सर्व थरांतील शिक्षकांमध्ये बंधुभावाची भावना दृढ करावयाची असेल तर त्यांना तशा संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे आणि त्यासाठी अनुरूप अशी संस्थासंरचना करावी लागेल. म्हणजे समान अशा उद्दिष्टासाठी एकमेकाबद्दल आदर बाळगणे या गोष्टी शक्य होतील. या संदर्भात गंमतीची गोष्ट अशी आहे की वर शिफारस केलेली, व्यापक पायावर आधारलेली शैक्षणिक नियोजनाची रचनापद्धती या व्यवसायाला संघटित करू शकेल. उदाहरणार्थ शाळा-समूह पद्धतीमुळे माध्यमिक शिक्षकांना प्राथमिक शिक्षकांबरोबर काम करण्याची आणि विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील शिक्षकांना माध्यमिक शिक्षकांच्या बरोबर काम करण्याची संधी निर्माण होईल. त्याचप्रमाणे जिल्हा शिक्षक सल्लागार मंडळे, राज्य पातळीवरील संयुक्त शिक्षक सल्लागार मंडळे किंवा अखिल भारतीय पातळीवरील राष्ट्रीय शिक्षक सल्लागार मंडळ, या संघटनांवर सर्व थरांतील शिक्षकांना प्रतिनिधित्व दिले गेले तर, त्यांच्या स्थापनेमुळे सर्व शिक्षकांना एका समान उद्दिष्टासाठी एकत्र येऊन काम करण्यास एक फार मोठे साधन निर्माण होईल. विषयवार शिक्षक संघटना निर्माण करूनही हे उद्दिष्ट साध्य करता येईल. यामुळे उपक्रमशीलता आणि प्रयोग करण्याची वृत्ती यांची वाढ होईल. शिवाय अधिक चांगल्या अध्यापन-साधनांच्या आधारे आणि अध्यापन-मूल्यमापनविषयक नव्या तंत्रांच्या साहाय्याने अभ्यासक्रमांची पुनर्रचना करून त्यांचा दर्जा वाढविणे ही कामेही व्यवस्थितपणे होऊ शकतील. यामुळे आणखी एक फायदा होईल; तो असा की सर्व स्तरांवरील शिक्षक, पूर्व-प्राथमिक कक्षेपासून तो पदव्युत्तर कक्षेपर्यंतचे, एकाच व्यासपीठावर आणले जातील. अशा संघटना जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर निर्माण केल्या गेल्या पाहिजेत.

## शिक्षणविषयक योजनांची आखणी आणि त्यांची अंमलबजावणी यासाठी कार्यक्षमतेचा विकास

अध्यापन व्यावसायिकांचे संघटन ही फार मोठी मौल्यवान शक्ती आहे. शिक्षकांनी तिचे संगोपन केले पाहिजे, त्यामुळे शैक्षणिक नियोजन आणि विकास या कार्यात त्यांना नेतृत्व मिळू शकेल. केवळ परिस्थितीचे आव्हान स्वीकारणे



पुरेसे नाही. जर त्यांना आपली जबाबदारी यशस्वी रीतीने पार पाडावयाची असेल तर आणखी दोन कौशल्यांचे किंवा गुणांचे त्यांनी संगोपन केले पाहिजेः शैक्षणिक नियोजनात रस घेणे व आवश्यक कार्यक्षमता अंगी बाणविणे.

## (१) अभिरुची

दुर्दैवाची गोष्ट ही आहे की शिक्षकांनी या महत्त्वाच्या विषयाकडे आजवर दुर्लक्ष केले आहे. तीन पंचवार्षिक योजना आणि तीन वार्षिक योजना यांमध्ये शिक्षण संघटनांनी विशेष रस घेतल्याचे दिसले नाही. या योजनांवर त्यांनी सखोल किंवा सविस्तर अशी टीकाही केली नाही. शिक्षकांकडून केवळ टीका अपेक्षित नाही, त्यांच्याकडून शासकीय योजनेला पर्यायी योजनाही सुचविली गेली नाही की ज्यायोगे जनतेला शासकीय योजनेशी त्या पर्यायाची तुलना करून काही निर्णय घेता येईल. ही अनास्था जितक्या लवकर नाहीशी होईल तितके बरे.

## (२) कार्यक्षमता

शैक्षणिक नियोजनाच्या कार्यासंबंधी व्यक्तिगत प्रयत्नांच्या किंवा संघटनांच्या आधारे शिक्षकांना आवश्यक कार्यक्षमतेचा विकास करावा लागेल. मागील भागात वर्णन केलेला विकेंद्रीकरणाचा कार्यक्रम अमलात आणला आणि शिक्षक शैक्षणिक नियोजनाच्या प्रत्यक्ष आखणी आणि अंमलबजावणीमध्ये पूर्णपणे एकरूप झाले तर त्यांच्या कार्यक्षमतेचा विकास होईल हे खरे आहे. पण त्या दृष्टीने उद्बोधक स्वरूपाचे संस्था – पातळीवर प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, प्रशिक्षण देणाऱ्या सर्व पातळ्यांवरील संस्थांच्या अभ्यासक्रमात शैक्षणिक नियोजन आणि भारतीय शिक्षणातील समस्या या विषयांना स्थान मिळाले पाहिजे. आपापल्या संस्थांत या कार्यक्रमांचा विकास करण्यासाठी प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण करून सर्व भारतीय भाषांत या विषयावरचे साहित्य तयार केले गेले पाहिजे. काही निवडक केंद्रांतून पदव्युत्तर पातळीवर शैक्षणिक नियोजनविषयक प्रगत स्तरावरील अभ्यासक्रम सुरू करणे आवश्यक आहे. विशेषतः शिक्षक संघटनांनी या विषयाच्या अभ्यासक्रमासाठी आणि सर्व शिक्षकवर्गाला या विषयाचे सर्वांगीण ज्ञान करून देण्यासाठी अभ्यासगट स्थापन केले पाहिजेत; पाश्चिमात्य देशांप्रमाणे शिक्षक संघटनांनी प्रयोग केले पाहिजेत आणि शैक्षणिक नियोजनविषयक प्रकाशने आणि पत्रिका प्रसिद्ध केल्या पाहिजेत. शासनाने अशा प्रयत्नांना उत्तेजन देऊन साहाय्य केले पाहिजे.

## उपसंहार

शिक्षणविषयक नियोजनाच्या आखणीत आणि कार्यवाहीत शिक्षकांना सहभागी करून घेतल्याशिवाय शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याचे कोणतेही कार्यक्रम यशस्वी होणार नाहीत, हे येथे पुन्हा आग्रहपूर्वक सांगायचे आहे. या कार्यक्रमांमध्ये शिक्षकांना सहभागी करून घेता यावे यासाठी नियोजनाची प्रक्रिया अधिक विकेंद्रित आणि व्यापक पायावर आधारित असली पाहिजे. त्यासाठी संस्था, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा भिन्न पातळ्यांवर नियोजन-प्रक्रिया कार्यान्वित होणे जरूरीचे आहे. त्याचप्रमाणे, शिक्षणविषयक विकासाशी संबंधित असलेल्या सर्व प्रश्नांबाबत शिक्षकांशी वेळोवेळी विचारविनिमय करता यावा म्हणून जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळ्यांवर शिक्षकांच्या संघटना अस्तित्वात यावयास हव्यात. संस्थात्मक पातळीवरील नियोजनाचा मी येथे सविस्तर ऊहापोह यासाठी केलेला आहे की, या पातळीवरील नियोजनाला मूलभूत महत्त्व तर आहेच; शिवाय या पातळीवरच शिक्षक नियोजन प्रक्रियेत अधिक आस्थापूर्वक आणि अधिक परिणामकारक रीतीने सहभागी होऊ शकतात. आपापसातील दुरावा बाजूला ठेवून शिक्षक जर संघटनेच्या मार्फत एकत्र आले तर शैक्षणिक नियोजनाच्या आखणीत आणि कार्यवाहीत सहभागी होण्याची त्यांची समता निश्चितच वाढीस लागेल. शैक्षणिक विकासाच्या सर्व अंगांसंबंधी शिक्षकांनी सतत आस्था दाखविली पाहिजे आणि त्यासंबंधीचे विशेष ज्ञान संपादन केले पाहिजे.

शिक्षणविषयक विकासाच्या कार्यक्रमांची आखणी आणि कार्यवाही करण्याच्या कार्यातील आपला सहभाग लक्षणीय व्हावा अशी जर शिक्षकांची धारणा असेल तर त्यांच्यापाशी व्यावसायिक संघटना, क्षमता आणि तज्ज्ञता तर हवीच; शिवाय कर्तव्यपरायणता आणि विद्यार्थ्यांच्या हितासंबंधीची कळकळ या गुणांचीही आवश्यकता आहे. म्हणून या प्रवृत्ती आत्मसात करणे आणि वस्तुनिष्ठता व सत्यशीलता या बाबतीत काही किमान व्यावसायिक दर्जा सांभाळणे हे शिक्षकांचे कर्तव्यच ठरते. समाजाला आणि आपण स्वीकारलेल्या या उदात्त व्यवसायाला आपण हे देणे लागतो.





# शिफारशींचा सारांश

या पुस्तकात करण्यात आलेल्या प्रमुख सूचना खाली संक्षिप्त स्वरूपात देण्यात येत आहेत.

१. राज्यघटनेतील ४५ व्या कलमातील आदेशानुसार प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचा कार्यक्रम, शिक्षण आयोगाने सुचविल्याप्रमाणे, दहा वर्षांत किंवा उशीरात उशीरा १९८६ पर्यंत निश्चितपणे पुरा करण्यात यावा.

२. गरीब लोकांच्या मुलांकरिता शिक्षणाची योग्य व्यवस्था करण्यासाठी प्राथमिक शिक्षणाच्या पारंपरिक नमुन्यामध्ये खालील मूलगामी बदल केले पाहिजेत :

(अ) ९, ११ किंवा १४ वर्षे वयाच्या मुलांना शाळेत प्रवेश मिळविता यावा यासाठी अनेक इयत्तांमध्ये प्रवेश देण्याची पद्धत अनुसरली जावी आणि या वाढीव वयाच्या मुलांच्या गरजा ध्यानात घेऊन त्यांच्यासाठी वेगळे वर्ग सुरू केले जावेत.

(ब) वार्षिक उपस्थिती आणि बढती ही पद्धत रद्द करून, वाढीव वयाच्या मुलांना केव्हाही शाळेत प्रवेश करण्याची आणि नियोजित अभ्यासक्रम कमी वा अधिक मुदतीत पुरा करण्याची मुभा असली पाहिजे.

(क) सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये केवळ पूर्णवेळेच्या शालेय अध्यापनावर जो सर्वस्वी भर दिलेला आहे त्याऐवजी, ज्या मुलांना अर्थार्जन करावे लागते त्यांच्यासाठी, त्यांच्या सोयीनुसार अंशकालिक शिक्षणाची व्यापक प्रमाणावर सोय व्हायला हवी.

(ड) केवळ पूर्णवेळेच्या प्रशिक्षित शिक्षकांचा वापर करण्याची पद्धतही रद्द केली पाहिजे. स्थानिक समाजामध्ये उपलब्ध असलेल्या घटकांचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न व्हायला हवा. प्राथमिक शाळांमधील शिक्षणाला चालना मिळण्याच्या दृष्टीने स्थानिक अंशकालिक शिक्षक आणि वरच्या इयत्तांमधील विद्यार्थी यांच्या सेवेचाही पूर्ण लाभ करून घेतला पाहिजे.

(ई) प्राथमिक शाळा आणि प्राथमिकपूर्व शाळा यांच्यात साचेबंद विभागणी असता कामा नये. ज्या मुलांना लहान भावंडांचा सांभाळ करावा लागतो त्यांना,

भावंडांसह शाळेत यायची परवानगी दिली पाहिजे. प्राथमिक शाळांना जोडण्यात आलेल्या प्राथमिकपूर्व शाळांमध्ये किंवा पाळणाघरांमध्ये त्या लहान मुलांची देखभाल केली जाईल. या प्राथमिकपूर्व शाळा किंवा पाळणाघरे मुली शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली चालवू शकतील. त्यायोगे थोडासा जादा खर्च करून मौलिक सेवा उपलब्ध करून देता येईल आणि गरीब कुटुंबांतील मुलींमध्ये शिक्षणप्रसार व्हायला बरीच चालना मिळू शकेल. हे प्रमुख संरचनात्मक बदल तातडीने घडवून आणले पाहिजेत.

३. औपचारिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी खास प्रयत्न करण्याची गरज नाही. मात्र औपचारिक शिक्षणाच्या प्रसारासंबंधीच्या रास्त मागण्या पुऱ्या केल्या पाहिजेत.

४. अनौपचारिक पद्धतीनुसार प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी विशेष आणि सघन प्रयत्न केले पाहिजेत. मुलींना आणि गरीब कुटुंबांतील मुलांना या पद्धतीने शिक्षण देण्यावर खास भर द्यायला हवा. पाचव्या योजनेमध्ये या पद्धतीला सर्वाधिक प्राधान्य मिळाले पाहिजे. त्यासाठी पुढील दोन उपाय योजायला हवेत: (अ) ११-१४ वयोगटातील जी मुले शाळेत जात नाहीत किंवा ज्या मुलांनी कार्योपयोगी साक्षरता संपादन केलेली नाही अशा सर्व मुलांसाठी १८ ते २४ महिन्यांच्या कालावधीचे खास साक्षरता वर्ग सुरू केले पाहिजेत; आणि (ब) ज्या मुलांनी पाचव्या इयत्तेपर्यंतचा अभ्यास पुरा केलेला आहे (किंवा ज्यांनी कार्योपयोगी साक्षरता संपादन केलेली आहे) आणि ज्यांची पुढचे शिक्षण घेण्याची इच्छा आहे, परंतु पूर्णवेळेचे शिक्षण घेणे ज्यांना शक्य नाही अशा सर्व मुलांसाठी ऐच्छिक तत्त्वावर अंशकालिक वर्ग सुरू करावेत. या सुधारणांमुळे प्राथमिक शिक्षण बऱ्याच प्रमाणामध्ये साक्षरताप्रसाराला साहाय्यभूत होऊ शकेल.

५. या बदलानुसार अस्तित्वात येणाऱ्या नव्या शिक्षणपद्धतीची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे राहतील:

(अ) सध्याप्रमाणे यापुढेही प्रत्येक मुलाला वयाच्या सहाव्या वर्षी पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश घेऊन आपले पाचव्या किंवा आठव्या इयत्तेपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्णवेळेच्या शाळेत पूर्ण करण्याची मुभा राहील. परंतु प्राथमिक शिक्षण घेण्याचा यापुढे हाच एकमेव मार्ग राहणार नाही.

(ब) जी मुले वयाच्या सहाव्या वर्षी पूर्णवेळेच्या शाळेमधील पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश करू शकणार नाहीत ती ९-१४ वयोगटामध्ये असताना केव्हाही अंशकालिक खास वर्गांमध्ये प्रवेश करून १८-२४ महिन्यांमध्ये कार्योपयोगी साक्षरता संपादन करू शकतील. कार्योपयोगी साक्षरता संपादन करण्यापूर्वीच ज्या मुलांनी शाळा सोडली असेल तीही या वर्गात प्रवेश करून कार्योपयोगी साक्षर होऊ शकतील.



(क) ज्या मुलांनी पाचवीपर्यंतचा अभ्यासक्रम पुरा केलेला आहे किंवा वरील (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्योपयोगी साक्षरता संपादन केलेली आहे, परंतु ज्यांना पुढचे शिक्षण पूर्णवेळेच्या शाळेत घेणे शक्य नाही त्यांना जर पुढचे शिक्षण घ्यायची इच्छा असेल तर ते त्यांना सहावी व आठवीपर्यंतच्या अंशकालिक वर्गांमध्ये मिळू शकेल.

(ड) ११-१४ वयोगटातील जी मुले शाळेत जात नाहीत किंवा जी कार्योपयोगी साक्षर नाहीत अशा सर्व मुलांनी वरील (ब) मध्ये उल्लेख केलेल्या खास अंशकालिक वर्गांमध्ये येत्या दहा वर्षांमध्ये प्रविष्ट व्हावे यासाठी कसोशीने प्रयत्न केले जातील आणि त्यायोगे १९८४ नंतर प्रत्येक मूल पंधरा वर्षे वयाचे व्हायच्या आत साक्षर होईल.

६. प्राथमिक शिक्षणामध्ये गुणात्मक सुधारणा घडवून आणण्याच्या कार्यक्रमांना स्वतंत्र आणि सर्वोच्च महत्त्व आहे. प्राथमिक शिक्षणाचा संख्यात्मक प्रसार होण्याच्या दृष्टीनेही गुणात्मक सुधारणा महत्त्वाची ठरते. कारण प्राथमिक शाळेत दिले जात असलेले शिक्षण उपयुक्त आहे अशी खात्री पटल्याशिवाय पालक आपल्या मुलाला शाळेत घालणार नाही आणि शाळेतील वातावरण आकर्षक वाटल्याशिवाय मूलही शाळेत राहणार नाही.

७. प्राथमिक शिक्षणामध्ये गुणात्मक सुधारणा घडवून आणण्याचे कार्यक्रम परस्परपूरक असल्यामुळे ते एकाच वेळी अमलात आले पाहिजेत. तसे झाले तरच या कार्यक्रमांचे सुपरिणाम दिसून येतील. हे कार्यक्रम पुढीलप्रमाणे: (१) अभ्यासक्रमात सुधारणा, (२) पाठ्यपुस्तकांमध्ये व अन्य अध्यापन-अध्ययन साहित्यामध्ये सुधारणा, (३) अध्यापनाच्या गतीशील पद्धतींचा स्वीकार, (४) परीक्षापद्धतीत सुधारणा, (५) सर्वसाधारण शिक्षणांत आणि शिक्षकांच्या प्रशिक्षणात सुधारणा, (६) पर्यवेक्षणामध्ये सुधारणा, (७) प्रयोग आणि नवनिर्मिती या बाबतीत शाळांना आणि शिक्षकांना प्रोत्साहन, आणि, (८) संस्थात्मक नियोजन आणि शाळासमूह या संकल्पनाच्या द्वारा करायच्या प्राथमिक शिक्षणाच्या गुणात्मक सुधारणेच्या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि स्थानिक नागरिक यांचा सहभाग.

८. प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अभ्यासक्रमामध्ये पुढील गोष्टींचा समावेश असावा: साक्षरता (किंवा भाषाकौशल्य), अंकज्ञान (किंवा गणितकौशल्य), तांत्रिक तयारी (किंवा शास्त्रीय आणि तांत्रिक माहिती आणि अनुभव), कार्यानुभव (किंवा समाजोपयोगी उत्पादक कार्याचा अनुभव), आरोग्य आणि शारीरिक शिक्षण, कलात्मक कौशल्यांचा विकास, आणि समाजसेवेच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग. हे सर्व विषय परस्परनिगडीत पद्धतीने शिकविले जावेत आणि ते भोवतालच्या

सामाजिक आणि नैसर्गिक परिसराशी संबंधित असायला हवेत. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की पहिली ते पाचवी इयत्तेपर्यंत अभ्यासाचा बोजा वाढविण्यात आला तर तो शिक्षणप्रसारामध्ये अडचण ठरतो. कारण एक तर हे शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या बरीच असते आणि त्यामानाने साधने अपुरी असतात. म्हणून या पातळीवरील अभ्यासक्रम सोपा ठेवून कार्योपयोगी साक्षरतेवर भर देणे श्रेयस्कर ठरेल. अभ्यासक्रम अधिक सखोल करण्याची प्रक्रिया उच्च प्राथमिक पातळीवर (सहावी ते आठवी) सुरू करून माध्यमिक पातळीवर तो अधिक सखोल करणे इष्ट ठरेल.

९. शिक्षक–प्रशिक्षणाचे अनौपचारिक कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर विकसित करायला हवेत. त्यामध्ये व्यावसायिक शिक्षकांच्या केवळ सेवापूर्व आणि सेवांतर्गत प्रशिक्षणाचा समावेश करून चालणार नाही. अनौपचारिक शिक्षणासाठी असंख्य अव्यावसायिक शिक्षकांची भरती करावी लागणार असून त्या दृष्टीने त्यांचे उद्बोधन केले पाहिजे.

१०. पर्यवेक्षकांच्या संख्येत वाढ केली की पर्यवेक्षण सुधारते असा पारंपरिक दृष्टिकोन आहे. परंतु त्याऐवजी पर्यवेक्षकांची संख्या कमी करून त्यांची गुणवत्ता वाढविणे अधिक श्रेयस्कर ठरेल. त्याचप्रमाणे, शाळांना आणि शिक्षकांना अधिक स्वायत्तता देऊन आणि शिक्षकांनाच पर्यवेक्षणात सहभागी करून हे उद्दिष्ट गाठता येईल. त्यासाठी शिक्षण आयोगाने सुचविलेला शाळासमूहांचा कार्यक्रम विकसित करणे हा व्यवहार्य मार्ग ठरेल.

११. प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण पद्धती लवचिक आणि गतिशील करणे ही तातडीची गरज आहे. तसेच सर्व शिक्षणसंस्थांना स्वायत्तता देण्याच्या दृष्टीने पावले टाकायला हवीत. संस्थात्मक नियोजन आणि जिल्हानिहाय योजना यांचाही या संदर्भात उपयोग होऊ शकेल.

१२. गुणात्मक सुधारणेचे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मानवी आणि संस्थात्मक प्रयत्न अत्यावश्यक आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे. तसेच संपूर्ण शिक्षणपद्धतीमध्ये समर्पित आणि सातत्यपूर्ण विकासविषयक प्रयत्नांचे वातावरण निर्माण करणे आणि शाळांना व शिक्षकांना प्रयोग आणि नवनिर्मिती करण्याबद्दल प्रोत्साहन देणे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

१३. प्रौढांना साक्षर करण्याचे कार्यक्रम एकाच वेळी सुरू करण्यात आले तर प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचा कार्यक्रम यशस्वी होण्याचे प्रमाण वाढू शकेल. १५–२५ वयोगटातील शाळाबाह्य युवकांना कार्योपयोगी साक्षर करण्यासाठी खास प्रयत्न करायला हवेत. या कार्यक्रमांमध्ये पुढील पाच गोष्टींवर भर द्यायला हवा : व्यावसायिक कौशल्यात सुधारणा; विज्ञान आणि तंत्रशास्त्र यांचा परिचय;



नागरिकत्व, शारीरिक शिक्षण, मैदानी खेळ, क्रीडा आणि मनोरंजन, आणि, स्थानिक समाजसेवेच्या किंवा राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग.

१४. सध्याच्या नमुन्यानुसार सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणासाठी होणारा एकूण खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या साडेतीन ते चार टक्के असेल. एवढा खर्च करणे आपल्याला शक्य नसल्यामुळे खालील उपाय योजून, हा खर्च कमी करणे आवश्यक आहे :

(अ) विद्यार्थी–शिक्षक प्रमाणात वाढ करणे; त्यासाठी आवश्यक असेल तर पहिल्या आणि दुसऱ्या इयत्तांसाठी दुबार पद्धत सुरू करावी.

(ब) जेथे शक्य असेल तेथे स्वयंसेवी शिक्षकांची आणि स्थानिक कार्यकर्त्यांची मदत घेऊन शिक्षकांवरील खर्च कमी करणे.

(क) अनेक इयत्तांमध्ये प्रवेश देण्याची पद्धत स्वीकारण्याबरोबरच अंशकालिक शिक्षणाचे व्यापक कार्यक्रम विकसित करणे.

(ड) स्थानिक यंत्रणा आणि साहित्य यांचा वापर करून इमारतींवरील खर्च कमी करणे.

(ई) शाळेत अभ्यासाच्या वेळी सर्व मुलांना पाठ्यपुस्तके आणि अध्यापन-अध्ययन साहित्य यांचा मोफत पुरवठा करून या बाबींवरील खर्च कमी करणे.

हे उपाय योजिल्यास या कार्यक्रमासाठी एकूण खर्च राष्ट्रीय उत्पन्नाच्या दोन ते अडीच टक्क्यांपर्यंत खाली आणणे शक्य आहे. एवढा पैसा उपलब्ध करणे सोपे नसले तरी शक्य होण्यासारखे आहे.

१५. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या कार्यक्रमासाठी लागणारा सर्व पैसा उपलब्ध करणे कोणत्याही राज्य शासनाला शक्य नसल्यामुळे या खर्चाच्या सम-प्रमाणामध्ये केंद्र सरकारने अनुदान देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१६. सार्वजनिक शिक्षणासाठी समान शालेय पद्धत निर्माण केली पाहिजे. तसेच, प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवर परिसर शाळेची संकल्पना स्वीकारण्यात आली पाहिजे.

१७. सामाजिक आणि आर्थिक विषमता कमी करण्यासाठी याच काळात प्रत्यक्ष मोहीम सुरू केली तर सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम यशस्वी होण्याची शक्यता अधिक वाढेल. त्यासाठी आपल्या सर्व योजनांमध्ये किमान गरजांच्या पूर्ती कार्यक्रमाला सर्वात महत्त्वाचे स्थान मिळाले पाहिजे.

१८. स्थूलमानाने येथे सुचविलेल्या तत्त्वांच्या आधारे, येत्या दहा वर्षांमध्ये सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद करता यावी यासाठी प्रत्येक राज्य शासनाने राज्य पातळीवरील आणि जिल्हा पातळीवरील योजना आखण्याकरिता कार्यगट नेमावा.

१९. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद करण्यासाठी येथे सुचविण्यात आलेल्या नव्या कार्यपद्धतीला जास्तीत जास्त प्रसिद्धी देऊन तिला शिक्षक, प्रशासक आणि जनता यांचा पाठिंबा मिळविला पाहिजे.

२०. या कार्यक्रमाची कसोशीने कार्यवाही होत आहे हे पाहण्यासाठी केंद्रीय, राज्य आणि जिल्हा पातळ्यांवर खास यंत्रणा स्थापन केल्या पाहिजेत.

❧ ❧



# संदर्भ सूची


अध्यापन साधने ९६
अध्यापन मूल्यमापनविषयक नवी तंत्रे ९६
अभ्यासक्रमाची पुनर्रचना ९६
अनुत्तीर्णता व गळती ५७
अनुसूचित जाती आणि जमाती १०
अनेक इयत्तांमध्ये प्रवेश घेण्याची मुभा
४२, ४५, ४६, ५१, ५५
अनौपचारिक शिक्षण २, ३८, ५६,
१९-२५ वयोगटातील युवकांसाठी १, २,
अंशकालिक कार्यक्रमाच्या व स्वाध्याय
कार्यक्रमांच्या द्वारा ४२, ४५
अव्यावसायिक शिक्षक ५४
आचार्य विनोबा भावे १५, ४०, ८०
आदर्श व्यावसायिक वर्तनाची
संहिता आणि शिक्षक ४
आंध्र प्रदेश १०
आंबेकर ८२
इंग्लंड ८१
उत्तरप्रदेश १०, ३३
उत्पादक कार्ये ६२
उत्पादकतेशी निगडित शिक्षण ३४, ४१
उद्योगीकरण १३
एक तासाच्या शाळा ३८
एकाच इयत्तेमध्ये प्रवेश ४९, ५६
एलिमेंटरी एज्युकेशन इन इंडिया :
द अन्‌फिनिश्ड टास्क ७५
ओरिसा १०
औपचारिक शिक्षणपद्धती १, ३१, ५५
अंशकालिक अध्यापन २
अंशकालिक शिक्षण २, १९, ४३, ४४, ४५,
४६; इंग्लंडमधील ५८; शिक्षणाची सोय ५२;
गरीब कुटुंबातील वाढीव वयाच्या मुलांसाठी
५७, ५८; ११-१४ वयोगटातील
विद्यार्थ्यांसाठी ६०; दोन पातळ्या ५८;
नवी पद्धती ५९; श्रमजीवी मुलांसाठी
५२, ५३, ५५, ६०;
शिक्षक (स्थानिक) ५५.
कल्याण सेवा १३
कर्वे ८२
कार्यानुभव ४५, ४६, ८३, ८४, ८५, ८६
कार्योपयोगी साक्षर ४२, ५९, ६१
साक्षरता ४२, ४३, ५८, ५९
कुटुंबनियोजनाचे शिक्षण २
केरळ २४, २५, २६, २७
कोचीन २५
कृतिसत्र कार्यक्रम ८९
खेर, बाळ गंगाधर ८, ४७
गळती ६०
गांधी, महात्मा ७, १५, ३१, ३२, ८०, ८३
गुणवत्तेचा विकास ४, ५
गुणात्मक सुधारणेचे कार्यक्रम ६१
गोखले, गोपाळ कृष्ण ७, १५, १६, १७, १८,
१९, ४७, ८०, ८१
गोखले-परूळेकर नमुना १५, १८, ३१, ३५
गोल्डस्मिथ ३१
ग्रामोद्योग ४०
जपान २७
जम्मू आणि काश्मीर
राज्यातील शिक्षणाचा विकास ६२;
जे. पी. नाईक ७५
झाकीर हुसेन ६१
त्रावणकोर २४

दादाभाई नौरोजी ७, ८०
नागरिकत्वाचे शिक्षण २
नावनोंदणी ( १ ते ८ इयत्ता ) १०
नियोजन मंडळ ९, ७९
निरक्षरता निर्मूलन १७, १८, १९
निरक्षरता निर्मूलनासह प्रौढशिक्षण १
नैतिक विकास १७
नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल
रिसर्च अँड ट्रेनिंग २४
परिसर शाळा ४०, ४१, ४४, ४५, ४६,
७५, ७६
परिसर शाळेची संकल्पना ६
परूळेकर, रा. वि. १५, १८, १९, २१, २२,
२७, २९, ४७, ८०
पर्यवेक्षणातील सुधारणा ६४
पश्चिम बंगाल १०
पाऊलो फ्रिअरी यांचा जाणीवजागृती कार्यक्रम ७०
पाचव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा ९, ४४
पारंपरिक औपचारिक पद्धतीचे विशेष ३८
पारंपरिक नमुन्यामध्ये अत्यावश्यक मूलगामी
परिवर्तन ४९, ५५
पूर्ण वेळेचे अध्यापन ५२; अभ्यासक्रम ५६;
औपचारिक शिक्षणपद्धती ४०; व्यावसायिक
शिक्षक २, १३; संख्यात्मक शिक्षण १३, १४;
शाळा ३०, ५२; शाळातील नावनोंदणी ५७;
शिक्षण ४४
पंचवार्षिक योजना ९०
प्रत्येक विद्यार्थ्यावरील तौलनिक खर्च :
केरळ व अखिल भारत २६
प्रशासक महाविद्यालय ७९
प्रशिक्षण मंडळ ७९, ८०
प्राथमिक अभ्यासक्रम १९
प्राथमिक किंवा शाळापूर्व शिक्षणाचा प्रसार १
प्राथमिक शाळा ५५; प्रमाणपत्र परीक्षा ५१
प्राथमिकपूर्व शाळा किंवा पाळणाघरे ५४, ५५
प्राथमिक शिक्षण
सार्वत्रिकीकरण ३; सार्वत्रिक तरतूद ७, २६, ३०;
नावनोंदणी ९; उद्दिष्टे (लिहिणे, वाचणे व
अंकज्ञान) १६; सार्वत्रिक खर्च १८,२७,४४,
४५, ४९, ६८;
शिक्षकांवरील खर्च २०; सरासरी शिक्षक-
विद्यार्थी प्रमाण २०, २१; प्रत्येक
विद्यार्थ्यावर होणारा खर्च २०, २६; इमारत वा
अन्य शैक्षणिक साहित्य यावरील भाडे, पुस्तके,
उपकरणे, अध्यापनसाहित्य, दुपारचे जेवण
वा आरोग्यसेवा यांचा मोफत पुरवठा
यासारख्या पूरक कार्यावरील खर्च २०;
प्रसार ३०;
पारंपरिक उद्दिष्टे ३२; पारंपरिक नमुना
४५, ४७; गळती ५२; चांगली पद्धती
कृतिकार्यक्रम ४७; दर्जा ५३; गुणवत्ता
सुधारण्याचे कार्यक्रम : अभ्यासक्रमातील
सुधारणा; पाठ्यपुस्तकांतील अन्य अध्यापन–
अध्ययन साहित्यातील सुधारणा ६२;
परीक्षापद्धतीत सुधारणा ६२; सर्वसाधारण
शिक्षणात आणि शिक्षकांच्या प्रशिक्षणात
सुधारणा ६३; पर्यवेक्षणातील सुधारणा ६३;
शाळांना आणि शिक्षकांना उपक्रमशीलता
आणि प्रयोगशीलता अंगिकारण्याबद्दल
प्रोत्साहन ६३; संख्यात्मक नियोजन ६३;
अर्थकारण ७०; पूर्ण वेळेच्या उच्च
प्राथमिक शाळेतील ७३; मंडळ ८०; स्थायी
समिती ८०
प्राथमिक शिक्षकांची संघटना ९५
प्रौढांसाठी एक तासाचा वर्ग : श्रवणवर्ग ३९, ४०
प्रौढ साक्षरता ६०



प्रौढशिक्षणाची उद्दिष्टे : ६९, ७०
बहिःस्थ परीक्षा ६६
बालशिक्षणाच्या पद्धतीचा अवलंब ५३
बिहार १०
भारत सरकार ९३
मद्रास ( तामीळनाडू ) ३५
मध्य प्रदेश १०
मार्क्सचा जाहिरनामा ९५
माध्यमिक आणि विद्यापीठीय पातळीवरील
शिक्षणाबाबत मूलगामी धोरण ३; माध्यमिक
शाळा : मध्यवर्ती ६६; वार्षिक तपासणी ९३;
मुख्याध्यापकांचा वेगळा गट ९५; शिक्षकांच्या
वेगळ्या संघटना ९५
मास एज्युकेशन इन इंडिया १९, २९
मुंबई प्राथमिक शिक्षण नियम ( १९२४ ) २८
मुंबईतील सर्वसामान्य प्राथमिक शिक्षक २८
मूलोद्योग शिक्षण ७, ३१, ३२
मूलोद्योग शिक्षणाचा आकृतिबंध ३३
मूलोद्योग शिक्षण – माध्यमिक शाळांतील ३३;
शिक्षणविषयक विचारांचे परिवर्तन
३४; संकल्पना ३४, ३५, ८० ; प्रसार
३३; कार्यवाही ३४; कार्यक्रमाची
असमाधानकारक प्रगती ३४; पद्धतीस
जनतेचा विरोध ३४; पद्धतीच्या अपयशास
कारण असणारे तांत्रिक घटक : सूत कातणे
व विणणे ३५; आणि शेती ३५;
अनौपचारिक पद्धतीचे शिक्षण ३८;
त्यावरील खर्च ४०; महात्मा गांधींची
कल्पना ४७, ८३
मोडक, ताराबाई ५४
राजगोपालाचारी १५, ३५, ३६, ३७, ८०
राजगोपालाचारी प्रयोग ३५
राजस्थान १०
राज्य शिक्षणशास्त्र संस्था ८०, ९०
राष्ट्रीय उत्पन्न २१, ४४, ४५
राष्ट्रीय व सामाजिक सेवा ३४
राष्ट्रीय विकास कार्यात सहभाग ३
राष्ट्रीय सेवा कार्यक्रम ६
राष्ट्रीय शिक्षक सल्लागार मंडळ ९४
राष्ट्रीय शिक्षणपद्धती ७
रोजगाराभिमुख अभ्यासक्रम ४
लिटरसी इन इंडिया १९
विद्यापीठाची पदवी आणि बेकारी यांचा संबंध ४
व्यावसायिक कौशल्ये २
व्यावसायिक शिक्षण ४, ३६; ( पारंपरिक )
३७; शिक्षक ५६
सक्तीचे शिक्षण १८, ८१; कायदा ७, १८;
शिक्षणाचा कालावधी १३
समाजकल्याणाचे कार्यक्रम ३६
सहावी पंचवार्षिक योजना ११, ४४, ६४
सामाजिक आणि आर्थिक विषमता ७७
सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मता ४१
सामाजिक प्रश्नांसंबंधी चर्चा ६५
सार्वजनिक शिक्षणपद्धतीचा परंपरागत नमुना
१३, १४
सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण १८, २७
सार्वत्रिक नावनोंदणी किंवा हजेरी ६१
सार्वत्रिक शिक्षण १५, १७, २१ ; (४–५
वर्षांचे ) उपलब्ध करून द्यावयाची मोहीम
१८ : प्रसार १४; तरतूद ७; २६, ३०
सेवांतर्गत प्रशिक्षण ५, ६५ , पत्रद्वारा ६३;
आकाशवाणी व दूरदर्शनद्वारा ६३
सेवापूर्व प्रशिक्षण ६३; प्रशस्तिपत्र वा
पदविका ६४
संघटित शिक्षकवर्ग ९४
संख्यात्मक नियोजन ६६, ६७, ८९, ९२

संख्यात्मक संरचना ९६
स्थानिक अध्यापनसाधनांचा उपयोग ५३, ५५
शारीरिक श्रम १, १५, ३१, ३२, ३४, ४६, ६२
शाळा तपासनीस ८७
शाळा तपासनीसांचे प्रशिक्षण ३३
शाळा–समूह ६४, ६६, ९२, ९३, ९६
शाळेची इमारत, उपकरणे ४२
शिक्षण : ५ व्या पंचवार्षिक योजनेतील ९
शिक्षण : १४ वर्षे वयानंतरचे ( माध्यमिक आणि उच्च ) ३
शिक्षण आयोग ( १८८२ ) ७
शिक्षण आयोग (१९६४–६६) २१, ४०, ४१, ४५, ५९, ८०, ८३, ९२, प्रा. शिक्षणाचा नवा नमुना ४० ; प्रा. शिक्षणातील आशय ४१ ; मूलोद्योग शिक्षण ४१, ४५, व्यावसायिक शिक्षणाऐवजी कार्यानुभवाचा अंतर्भाव ४१, ४४, विज्ञान, तंत्रशास्त्र यांवर आधारलेल्या समाजोपयोगी उत्पादक कामांत विद्यार्थ्यांचा सहभाग ४१ , अर्थकारण ४४
शिक्षण : मोफत आणि सक्तीचे ( १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांना ) २७
शिक्षण आणि कौशल्यप्राप्ती ३२
शिक्षणाची आर्थिक बाजू ३२
शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन १, राष्ट्रीय विकास १, जनताभिमुखता १
शिक्षणाची गुणवत्ता ११, १९, २०
शिक्षणाचे नियोजन व विकास ९४, ९६
शिक्षणाचा प्रसार : प्राथमिक किंवा शाळापूर्व १
शिक्षण मंत्रालय ७९, ९३
शिक्षणावरील खर्च ५३, ५७, ७४
शिक्षण व संशोधन यांवरील खर्च २२
शिक्षणविषयक योजना ९४
शिक्षणविषयक योजनांची आखणी आणि त्यांची अंमलबजावणी ९६
शिक्षणविषयक विचार : विनोबा ४०
शिक्षकांचा अध्यापन दर्जा ६५
शिक्षक–विद्यार्थी प्रमाण : १९, २०, २१, २२, २५, ३५, ७२, ७३, प्रमाणातील वाढ २९
शिक्षकांचा व्यावसायिक दृष्टिकोण २९, व्यावसायिक संघटना ४, विषयवार ९६
शेती ८४
शैक्षणिक कार्यक्रम ४, खर्च : दरमाणशी २१, नियोजन : आराखडा आणि अंमलबजावणी ८८, नियोजन ७९, नियोजन आणि विकास ८८,
नियोजनाची रचनापद्धती ९६, नेतृत्व ५
पुनर्घटना ६
शिक्षक, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक यांचा घनिष्ठ सहभाग ६५,
मूलगामी आणि समताधिष्ठित कार्यक्रम ५
शैक्षणिक प्रशासन ५, अकार्यक्षमता ५, आमूलाग्र परिवर्तन ५
शैक्षणिक प्रगती १०
शैक्षणिक विकासाची युद्धोत्तर योजना (१९४४) ८
शैक्षणिक संरचना १
शोषणमुक्त आणि समताधिष्ठित समाजाची निर्मिती ३२
हरयाणा १०
हस्तव्यवसाय ८३, ८६